म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८९२

# भवितव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक ९८५
पुस्तकाचें नांव संस्कृतीचें भवितव्य
लेखक साने पां. स.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवू नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006364

— साने गुरुजी

पा.मु.
६२१४

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प २९ वें

# कल्की अर्थात् संस्कृतीचें भवितव्य

डॉ. राधाकृष्णन् यांच्या

**Kalki or The Future of Civilization**

नामक ग्रंथाचा अनुवाद

REFBK-0006364

अनुवादक

श्री. साने गुरुजी, एम्. ए.

ऑक्टोबर १९४३ ] [ मूल्य १ रुपया

प्रकाशक
रघुनाथ गणेश जोशी,
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या
विश्वस्त मंडळाकरितां.
१२ टिळक रोड, पुणें २

●

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

●

मुद्रक
श्री. र. राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०५ नारायण, पुणें २

# अनुक्रम


| प्रकरण | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ प्रास्ताविक | ... | ... | ५ |
| २ सर्वत्र नकार | ... | ... | ११ |
| ३ प्रश्न | ... | ... | ३२ |
| ४ पुनर्रचना | ... | ... | ४७ |

६२१४

# प्रास्ताविक : : १

मानवी संस्कृति आज संकटांत आहे. मधुनमधून असे प्रसंग तिच्यावर नेहमींच येत असतात. जग आज जुनीं वस्त्रे फेकून देत आहे. एका पिढीपूर्वी जे आदर्श, जीं ध्येयें, ज्या संस्था वगैरे प्रमाण म्हणून मानलीं जात, त्या सर्वांना आज आह्वान आहे. त्या सर्वांत बदल होत आहे. जुन्या प्रेरणा दुबळ्या झाल्या आहेत. नवीन शक्ती निर्माण होत आहेत. जो जो कोणी आजच्या युगाच्या अंतरंगांत डोकावून पाहील, त्याला त्याला असें दिसून येईल कीं आज सर्वत्र एक प्रकाराची अस्वस्थता आहे. निश्चितता कशालाच नाहीं. आजच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीविषयीं कोणालाच समाधान नाहीं. आणि एकादी नवी व्यवस्था जन्माला यावी म्हणून सारे उत्सुक झाले आहेत. विचारांचा आज गोंधळ उडाला आहे. ध्येयांची सुस्पष्ट कल्पना नसल्यामुळें त्यांच्याबद्दलचा वाटणारा जिव्हाळा व उत्साह हीं तात्पुरतीं असतात. या सर्व परिस्थितीवरून मानवजात लवकरच एकादें नवीन पाऊल टाकील असें वाटतें.

आज जी ही एक प्रकारची सारीच अनिश्चितता वाटत आहे, तिला मुख्य कारण म्हणजे आजचें शास्त्र होय. शास्त्र आजच जन्माला आलें असें जरी नसलें, तरी त्याची प्रगति अर्वाचीन काळांत कल्पनातीत झपाट्यानें होत आहे. शास्त्राचें क्षेत्र वाढत आहे, तें सर्वत्र घुसत आहे. शास्त्राच्या गतीबरोबर संसार

टिकत नाहीं. शास्त्राच्या प्रगतीबरोबर भराभरा परिस्थितीहि नीट रीतीनें बदलणें होत नाहीं. आपण एखाद्या प्राण्याला त्याच्या नेहमींच्या वातावरणांतून एकदम उचलून जर अगदीं अपरिचित अशा वातावरणांत नेऊन सोडलें तर त्या प्राण्याला कसें तरी वाटतें. तो प्राणी बेचैन होतो. त्या नवीन परिस्थितीशीं जमवून घेईपर्यंत त्याला अस्वस्थ वाटत असतें. "कांहीं काळ शास्त्रानें आतां सुटी घ्यावी" असें एक थोर बिशप म्हणाले. त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ काय? भावार्थ इतकाच, कीं शास्त्र फार झपाट्यानें पुढें जात आहे. नवीन शोध रोज मिळत आहेत. परंतु या शास्त्रीय शोधांचा उपयोग करून घेणारा मानव-प्राणी तितक्याच झपाट्यानें सुधारत आहे असें नाहीं.

बाह्यतः तरी सारें जग आज एका ठशाचें होत आहे. युरोप आणि अमेरिका, आफ्रिका व आशिया सारीं एकाच दिशेनें जात आहेत. फरक इतकाच कीं आशिया व आफ्रिका जरा मंद गतीनें जात आहेत, तर युरोप व अमेरिका घोडदौडीनें जात आहेत. अर्वाचीन युगाचीं चिन्हें म्हणजे मोटारी, विमानें, बोलपट. हीं चिन्हें अत्यन्त मागासलेल्या देशांतहि दृष्टोत्पत्तीस पडतात. मनुष्याची प्रगति आतां सारखी होत जाणार; कारण निसर्गावर त्याला सत्ता मिळत आहे, निसर्गांतील साधनांचा तो स्वामी होत आहे; आणि ही श्रद्धा दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे.

हिंदुस्थान नि चीन हीं या वातचक्रांत खेचलीं जात आहेत. आज पौर्वात्य देशांत अशांति कां आहे, अस्वस्थता कां आहे? त्यांना स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली आहे, जगांतील इतर राष्ट्रें साहसानें, उद्योगानें, संघटना-शक्तीनें साऱ्या पृथ्वीचा ताबा घेत आहेत. अशा वेळेस आपला विनाश व्हावयास नको असेल, ओढवणारें मरण टाळायचें असेल, तर आपणहि त्यांच्या बरोबरीनें उभें राहिलें पाहिजे ही जाणीव आज पौर्वात्य देशांना तीव्रतेनें झाली आहे. पूर्व ती पूर्व व पश्चिम ती पश्चिम, असें जे कोणी म्हणतात त्यांत फारसें तथ्य नाहीं. पूर्व नि पश्चिम यांच्यांत इतके तीव्र भेद आहेत असें नाहीं. पूर्व व पश्चिम कधींच एकत्र येणार नाहींत असें नाहीं. उलट, आज तीं एकत्र आणलीं जात आहेत. भौतिक शास्त्रें, आध्यात्मिक शास्त्रें, नवीन नवीन विचार व कल्पना, नवीन नवीन स्थापत्यतंत्रें, नाना राज्यशासनाचे प्रकार, कायद्यांचीं बंधनें, आर्थिक संस्था, राज्यकारभारांतील अनेक व्यवस्था या

सर्वांमुळें नाना संस्कृतींचे लोक एकत्र जोडले जात आहेत. एकमेकांचा एकमेकांवर परिणाम होत आहे. सारें जग जणुं एक विराट् पुरुष बनून काम करूं पाहत आहे.

जग बाह्यतः एकरंगी होत चाललें असलें तरी त्यामुळें आंतरिक एकता झाली आहे असें नाहीं. जरी आपण एकमेकांच्या जवळ ओढले गेलों तरी तेवढ्यावरून सुखसमाधान वाढलें आहे, स्पर्धा कमी झाली आहे, असें नका समजूं. आपण एकमेकांना प्रेमानें भेटावें, एकमेकांनीं गुण्यागोविंदानें राहावें असें आपणांस अद्याप कोठें वाटूं लागलें आहे? बाह्यतः जवळ आलों, परंतु मनानें दूरच आहोंत. मॅक्झिम गॉर्कीनें एक अनुभव नमूद करून ठेविला आहे. एकदां शेतकऱ्यांच्या परिषदेंत तो बोलत होता. शास्त्रांचा महिमा तो सांगत होता. नवीन नवीन शोध सांगत होता. उद्योगधंद्यांतील चमत्कार सांगत होता. परंतु त्याचें व्याख्यान संपल्यावर एक शेतकरी म्हणाला "पक्ष्यांप्रमाणें आपण उडायला शिकलों; माशांप्रमाणें पाण्यांत तरायला शिकलों; परंतु पृथ्वीवर कसें नीट नांदायचें तें मात्र आपण अद्याप शिकलों नाहीं!"

ही पृथ्वी फार मोठी आहे असें नाहीं. या लहानशा पृथ्वीवर नाना जाती, जमाती, नाना धर्म, नाना राष्ट्रें जवळजवळ नांदत आहेत. परंतु जीवन सुंदर होण्यासाठीं लागणारा बंधुभाव त्यांच्याजवळ नाहीं. आपण एकमेकांचे शत्रू आहोंत, प्रतिस्पर्धी आहोंत असेंच उलट त्यांना वाटतें. मानवजातीनें बाह्यतः एक शरीर धारण केलें असलें तरी आंतील आत्मा एक आहे असें नाहीं. आंतील प्रेरक विचार एक आहे असें नाहीं. मानवजातीचें मन आज समान नाहीं.

स्पेंग्लर या सुप्रसिद्ध लेखकानें "पश्चिमेचा ऱ्हास" म्हणून एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत तो म्हणतो, "निरनिराळ्या राष्ट्रांची निरनिराळी संस्कृति असते. त्या संस्कृतीहि निरनिराळ्या ध्येयांना जन्म देत असतात." स्पेंग्लरनें मांडलेली ही विचारसरणी मोठी धोक्याची आहे. एक सर्वसामान्य अशी मानवी संस्कृति निर्माण करण्याची आशा अशा विचारप्रसारांत नष्ट होते. "प्रत्येक जात, प्रत्येक संस्कृति जन्मास येते, वाढते व नष्ट होते. हें रहाटगाडगें सारखें सुरू आहे" असें स्पेंग्लरनें गृहीत धरलें आहे. परंतु स्पेंग्लरचें हें म्हणणें ऐतिहासिक सत्याला धरून आहे असें नाहीं. भूतकाळांत कदाचित्

त्या त्या भागांत स्थानिक व प्रादेशिक संस्कृती एका पाठोपाठ एक जन्माला आल्या असतील, वाढल्या असतील, नष्ट झाल्या असतील. आपल्या मरणानंतर त्यांनीं आपली सांस्कृतिक पुंजी नवीन तरुण पिढीच्या स्वाधीन केली असेल. परंतु आजच्या काळांत अशा प्रादेशिक संस्कृतींना वाव नाहीं. प्रादेशिक संस्कृतींचा काळ संपला. आणि मानवजातीचा इतिहास प्रथम एका अखंड प्रवाहानें जात होता, परंतु मागून एकमेकांचीं वैशिष्टयें व पृथकत्वें दिसून आल्यामुळें अलग अलग असे त्याचे तुकडे झाले असेंहि निश्चितपणें मानणें योग्य होणार नाहीं.

उलट, इतिहासाच्या अध्ययनावरून असें दिसतें कीं भिन्न भिन्न संस्कृती आपापल्या विकासनियमानुसार बऱ्याच काळापर्यंत निरनिराळ्या रीतींनें वाढल्या. आणि नंतर हळुहळू एकमेकींच्या जवळ येऊं लागल्या. आणि आतां तर एकत्र येऊन त्या सर्वांचा एक महान् संयुक्त संस्कृतिप्रवाह बनेल असें स्वच्छ दिसत आहे. स्पेंग्लर म्हणतो कीं, " नियतिनियमानुसार युरोप आपल्या वृद्धावस्थेंतून जात आहे. आणि युरोपला वांचवणें म्हणजे वेडेपणा आहे." त्याच्या म्हणण्यांत एक सत्य आहे. परंतु तें सत्य स्पेंग्लरच्या ध्यानांत आलें नाहीं. युरोप जगापासून अलग राहून आपली विशिष्ट संस्कृति राखूं पाहील तर तें आतां जमणार नाहीं. आतां जीवनाच्या कलेंत आपण प्रादेशिक प्रयोग करीत नाहीं बसणार. आतां जागतिक प्रयोग करूं. हें एक महान् सत्य स्पेंग्लरच्या विचारसरणींत आहे. कोणत्याहि एका विशिष्ट प्रादेशिक संस्कृतीला वा सभ्यतेला संपूर्णपणें विश्वव्यापक होतां येणार नाहीं. प्रत्येक संस्कृति म्हणजे त्या त्या मानववंशांतील जिवंत शक्तीचें प्रकट स्वरूप. आपणांस या सांस्कृतिक गोष्टींचा विचार करतांना इतिहासालाच फक्त प्रमाण मानून चाललें पाहिजे. इतिहास हेंच आपलें तर्कशास्त्र आणि इतिहासाला केवळ वस्तुस्थितिनिरपेक्ष असा विश्वात्मक परिपूर्ण मानव माहीत नाहीं. आणि म्हणूनच कोणतीहि संस्कृति केवळ स्वतःपुरतें पाहून परिपूर्ण होणार नाहीं, विश्वव्यापक होणार नाहीं. भावी संस्कृतीनें मानवी जीवनाची सर्वव्यापक अशी कल्पना घेऊन उभें राहिलें पाहिजे. मनुष्याची दृष्टि संकुचित न ठेवतां भावी संस्कृतीनें ती विश्वाकार केली पाहिजे. प्रादेशिक संस्कृतींनीं मानवजातीचें खरें कल्याण सदैव केलेलें आहे असें नाहीं. भूतकाळांत पहा किंवा आजहि पहा; संकुचित संस्कृतींनीं धार्मिक,

राजकीय व जातीय अशीं विशिष्ट वर्चस्वें स्थापिलीं. पुरुषांची स्त्रियांवर सत्ता, श्रीमंतांची गरिबांवर सत्ता, असले प्रकार त्या संस्कृतींतून निर्माण झाले. अशा प्रकारांना त्या त्या स्थानिक संस्कृतींनीं पाठिंबा दिला. सर्व मानवजातीला शोभेल अशी शाश्वत व स्थिर संस्कृति निर्मिण्यापूर्वीं प्रत्येक संस्कृतीनें आपल्या उणीवा व आपल्या मर्यादा ओळखणें जरूर आहे. कोणतीहि एकच संस्कृति मानवजातीचें ध्येय होऊं शकणार नाहीं, हें सर्वांनीं नम्रपणें ध्यानांत घेणें अगत्याचें आहे.

यांत्रिक शोधांतील विजयांमुळें भावी संस्कृतीला एक सर्वसामान्य असा पाया मिळत आहे. या पायावर आध्यात्मिक ऐक्याची इमारत उभारण्यासाठीं परंपरागत आलेल्या दुष्ट विचारसरणींचा, नाना भ्रामक कल्पनांचा व दुष्ट आचारांचा नायनाट झाला पाहिजे. सर्व राष्ट्रांतून या गोष्टीला आरंभ झालेला आहे. विशेषतः दुसऱ्याच्या हातांतील बाहुलीं होण्याचें नाकारणाऱ्या तरुणांत ही नवीन दृष्टि येत आहे. आज विचाराला जोराची चालना मिळाली आहे. ज्या कल्पना, जे विचार, जीं ध्येयें आजपर्यंत उराशीं बाळगलीं, त्यांत कांहीं तरी कमी आहे, त्यांत कांहीं तरी असमाधानकारक आहे, असें सर्वांना वाटूं लागलें आहे. नवीन मूल्यांचा शोध करण्यासाठीं धडपड होऊं लागली आहे. वातावरणांत 'इन्किलाब'ची गर्जना घुमत आहे. मोडतोड करूं पाहण्याची वृत्ति बळावत आहे. धर्मांचीं पुरातन रूपें कोलमडून जात आहेत. रूढींचे डोलारे ढांसळूं बघत आहेत. प्रत्येक देशांतील व प्रत्येक धर्मपंथांतील विचारवंतांच्या मनांत कांहीं तरी नवीन जन्माला येणार अशी उत्सुकता वाढत आहे. ते आशेनें, अपेक्षेनें बघत आहेत.

माथेफिरूंची गोष्ट सोडून देऊं. आपलेंच म्हणणें खरें असें हटवादानें म्हणणाऱ्या धर्मवेड्यांची गोष्ट सोडून देऊं. अशांजवळ चर्चा करण्यांत अर्थहि नसतो. परंतु प्रत्येक संस्कृतीच्या विचारवंत पुरस्कर्त्यांना आज एक गोष्ट स्पष्टपणें पटूं लागली आहे कीं, मानवजात अलग नसून अखंड आहे. तिच्या सर्व इतिहासांत, तिच्या सर्व घडामोडींत केवळ पृथकत्व नाहीं. ही अखंड मानवजात सारखी पुढें जाईल. तिच्या प्रगतीला कोण रोधील, कोण मर्यादा घालील? दिवसेंदिवस मानवजातीचें हें वैभव वाढत आहे व त्या वाढत्या वैभवाकडे आदरानें व भक्तीनें ती जात आहे. थोर इटॅलियन कवि डान्टे म्हणाला होता,

"या संस्कृतीसाठीं एक ध्येय व त्या संस्कृतीसाठीं दुसरें, असें असूं शकणार नाहीं. परंतु सर्व मानवजातीची म्हणून जी संस्कृति आहे तिला एकच एक ध्येय असूं शकतें." सर्वांची म्हणून जी संस्कृति तिचें जरी एकच गन्तव्य व प्राप्तव्य असलें तरी त्याचा अर्थ असा नाहीं, कीं सारे एकच भाषा बोलतील, सारे एकाच धर्मांचे असतील; सारे एकाच राज्यतंत्राखालीं असतील, किंवा सर्वांच्या चालीरीती एकाच ठरीव सांच्याच्या असतील. सांस्कृतिक ऐक्य बाह्य सारखेपणांत पाहायचें नसून विविधतेंतील अविरोधांत पाहावयाचें आहे. भिन्न-भिन्न ध्येयांचे व प्रकृतींचे लोक एकत्र आले, एकमेकांत मिसळले व त्या मिश्रणांतूनच कोणतीहि महान् संस्कृति निर्मिली गेली असा इतिहास आहे. मिसर देश घ्या किंवा बाबिलोन घ्या; चीन घ्या कीं हिंदुस्थान घ्या; ग्रीस घ्या कीं रोम घ्या; सर्वांच्या संस्कृतींच्या इतिहासांतून हेंच एक सत्य प्रतीत होत आहे. सांस्कृतिक ऐक्य घडवूं पाहणाऱ्यांचें क्षेत्र आज अधिक विस्तृत झालें आहे. आज सारें जग समोर उभें करावें लागतें. आपणांला एकमेकांत विलीन व्हायचें नसून एकमेकांशीं सहकार करावयाचा आहे; आपल्या बंधूंचें अनुकरण करायचें नसून त्यांना वाव द्यायचा आहे; आपलेंच म्हणणें खरें असें मानायचें नसून दुसऱ्यांना सहानुभूति दाखवायची आहे. अशा तऱ्हेची वृत्ति असणें, अशी वृत्ति उत्पन्न होणें, हीच भविष्यकाळाची आशा; हीच भविष्यकाळाची श्रद्धा.

★

नि ०८४.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६२१४
२३६४
शाखा (ठाणे)

# सर्वत्र नकार :: १

## धर्म

पश्चिमेकडे काय किंवा पूर्वेकडे काय, धर्मक्षेत्रांत फारच गुंतागुंत झाली आहे. सर्व धर्मांचीं धर्मशास्त्रें ढांसळत आहेत. शास्त्रें वाढत आहेत. मानसशास्त्र, समाजशास्त्र, प्राणिशास्त्र, मानवशास्त्र वगैरे शास्त्रें परंपरागत चालत आलेल्या सनातनी धार्मिक कल्पनांना खो देत आहेत. धार्मिक असे जे विविध अनुभव नमूद केले जातात, त्या अनुभवांवरून, त्या वृत्तांतांवरून ईश्वर म्हणजे एक भ्रान्त कल्पना आहे, तो एक मनाचा खेळ आहे, मानवी हृदयाचें तें एक गोड स्वप्न आहे, असें म्हणण्याची पद्धत रूढ होऊं पाहत आहे. परलोक आहे वगैरे सांगणाऱ्या धार्मिक विभूतींना वेड्यांच्या इस्पितळांत पाठवावें, त्यांचीं मनें विकृत असावींत, त्यांच्या मनोरचनेचा अभ्यास केला पाहिजे, असें लोक म्हणूं लागले आहेत. ते जुनाट मुद्दे आजच्या मनाचें काडीइतकेंहि समाधान करूं शकत नाहींत. प्रत्येक कार्याला जर कारण असेल, तर ईश्वरालाहि कोणी तरी कारण असलें पाहिजे. जर ईश्वराला कारणाची आवश्यकता नसेल तर सृष्टीला तरी कां असावी? हें विश्व किती सदोष, किती अपूर्ण! सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् प्रभूनें का हें विश्व निर्माण केलें? शक्यच नाहीं. ईश्वर म्हणून कांहीं आहे हें इतिहासावरून सिद्ध होत नाहीं. लॉइझी म्हणतो, "इतिहासकारानें देवाला इतिहासांतून घालविलें असें नाहीं; तर त्याला देव मुळीं कोठें तेथें दिसलाच नाहीं." कोठें तरी परलोक असेल, तेथें न्याय असेल, समता

असेल, तेथें अश्रू पुशिले जातील, जखमा बऱ्या होतील, असें आपणांस वाटतें. त्याचा अर्थ फक्त इतकाच कीं हें जग वाईट आहे. या जगांत अन्याय आहे. "तो पहा तेथें देव आहे, हा पहा इकडे आहे" असें निःशंकपणें सांगण्याइतका कोणताहि पुरावा आपणांस मिळत नाहीं. कोठें आहे ईश्वर तो दाखवा, दाखवा त्याच्या खाणाखुणा, असें मानवजात पुकारीत असतां त्या देवानें मौन धरून बसावें, यावरूनच देव नाहीं असें सिद्ध होतें. असें असूनहि ईश्वरावरील श्रद्धेला जे धडपडत जोराजोरानें चिकटून राहतात, त्यांच्याविषयीं आश्चर्य न वाटतां उलट वाईट मात्र वाटतें. त्यांची कींव करावीशी वाटते. बुडणाऱ्या माणसानें एकाद्या काडीला धरण्यासाठीं धडपडावें तसेंच हें. स्वार्थी धर्मवेत्ते कांहींहि म्हणोत, ही श्रद्धा कुचकामाची व भंगुर आहे यांत शंका नाहीं.

साऱ्या धार्मिक विचारप्रक्रिया मानवाच्या भोळेपणावर जगतात. नाना प्रकारच्या दंतकथा व भारुडें निर्मिलीं जातात. त्यांचा देव रागावतो, तो सूड घेऊं बघतो. हा देव कधीं कधीं स्वतःच्या शत्रूशींहि देवाण-घेवाण करतो, तडजोड करतो. हा क्रोधी देव मानवजातीला कधीं खोल दरींत फेकतो, कधीं अनंत नरकांत लोटतो. परंतु त्याची लहर लागली तर कधीं कधीं दया करतो, एकादा कृत्रिम उपाय योजतो. आणि हा देव हें सारें कां करतो? तर जग निर्मिण्यापूर्वीं त्यानें तसें आधींच ठरवून ठेवलें होतें म्हणून! जगाच्या बाल्यावस्थेंतील या कल्पित कथा आहेत. आजचे प्रश्न सोडवतांना पूर्वींच्या पोथ्या फारशा उपयोगी पडणार नाहींत. प्राचीन धार्मिक ग्रंथांतून आजच्या काळाला अनुरूप अर्थ शोधून काढण्याचे कोणी कोणी प्रयत्न करितात. आपण भूतकाळाबद्दल अशा प्रयत्नांनीं आदर व्यक्त करतों. परंतु अशा गोष्टींत बौद्धिक प्रामाणिकपणा नसतो. लहान मुलांप्रमाणें ज्यांचीं मतें आहेत त्यांनीं धर्माच्या पाठीमागें लागावें. परंतु निर्भय असे जे विचारस्रष्टे आहेत, त्यांना धर्माशीं कांहींएक कर्तव्य नाहीं. देवबीव सब झूट आहे. निर्दय, कठोर, भावनाशून्य अशा नियतीच्या हातांतील आपण बाहुलीं आहोंत. त्या नियतीला सद्गुणांशीं कांहीं करावयाचें नाहीं, दुर्गुणांशीं कांहीं करावयाचें नाहीं. या नियतीच्या हातून सुटणें म्हणजे शेवटीं सारें शून्य होणें.

कांहींचें वर सांगितल्याप्रमाणें मत आहे, तर दुसरे कांहीं असें म्हणतात कीं, देवाच्या अस्तित्वाविषयीं पुरावा जरी न मिळाला तरी देव नाहींच असेंहि

निश्चितपणें म्हणतां येणार नाहीं. आपण कशाचाच आग्रह धरूं नये. असेल असेंहि म्हणूं नये, नसेल असेंहि म्हणूं नये. कांहीं होकारूं नये, कांहीं नाकारूं नये. धर्माविषयीं ज्यांना थोडीशी आस्था वाटते ते म्हणतात कीं संशय जर आहे तर संशयाचा फायदा आरोपीला देणें रास्त आहे. हे लोक देवाला सोडूं इच्छीत नाहींत. देवाला आलेल्या अडचणींत साहाय्य करतात. परंतु कट्टर असा संशयात्मा जो असतो, तो म्हणतो कीं देव कोण व कसा आहे हें जर माहीत नाहीं, तर देव नाहीं असें क्षुद्र मर्त्य माणसानें म्हणणें म्हणजे उपमर्द आहे. नास्तिक व नियतिवादी यांच्यामध्यें हा संशयात्मा उभा राहतो. या संशयात्म्याजवळ त्या उभय वादींचा तो थोर आत्मविश्वास नसतो. हा प्रश्न आपल्या आवांक्याबाहेरचा आहे असें त्याला वाटतें.

देव आहे असें मानल्यानें कांहीं संरक्षण आहे असें उपयुक्ततावादी म्हणतात. धर्म म्हणजे ईश्वरावर विश्वास, त्या अमूर्ताजवळ एकरूप होणें, असें कांहीं ते मानीत नसतात. जीवाच्या मोक्षासंबंधीं आम्हांला कांहींएक कर्तव्य नसून जगांत सुधारणा व्हावी असें आम्हांला वाटतें. जगाच्या सुधारणेसाठीं धर्माचा उपयोग करून घेतां येईल. कारण सामाजिक शांति व सामाजिक सदुन्नति यांना त्याची मदत होईल.

कोणत्याहि धर्मांतील बहुजनसमाज जो असतो, त्याला धर्मापासून आधार हवा असतो. ते अंधपणें श्रद्धा ठेवतात. ते जर विचार करूं लागतील तर धर्मामुळें त्यांना जो ओलावा मिळतो तो नाहींसा होईल. यासाठीं ते विचार करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. ते नेहमीं भूतकाळाकडे बघत असतात. मानवजातीला जे जे अनुभव आले व त्या अनुभवांतून जें जें शहाणपण मिळालें, तें सारें भूतकाळांत समाविष्ट आहे असें त्यांना वाटतें. आज जे जिवंत आहेत, त्यांच्यावर अशा प्रकारें मृतांची खरी सत्ता आहे. ते मृतच खरोखर जिवंत आहेत. कोणी कोणी आध्यात्मिक मोक्षाची तहान असलेले केवळ व्यक्तिवादी बनतात. कोणी मुमुक्षू निसर्गवादी बनतात. कोणाला साशंक-वादांतच समाधान वाटतें, तर कोणी कांहींच नाहीं असें म्हणतात. असा साराच गोंधळ धर्मक्षेत्रांत माजला आहे.

## कौटुंबिक जीवन

आज जी एक सामाजिक नीति म्हणून मानली जात असे, तिच्याविषयीं

अनास्था उत्पन्न झाली आहे. मागचें महायुद्ध झालें व एक प्रकारचा सर्वत्र विस्कळितपणा आला. आर्थिक अडचणीमुळें लग्नें उशीरां करण्याची पद्धत पडूं लागली. स्वतःच्या व्यक्तित्वाचा कोंडमारा होतां कामा नये असें उत्कटपणें वाटूं लागलें. आईबापांचें मुलाबाळांवरील नियंत्रण ढिलें पडलें. अर्धवट लैंगिक ज्ञानामुळेंहि घोटाळे झाले. फ्राइड वगैरे मानसशास्त्रज्ञांनीं लैंगिक वासनाच सर्व व्यवहारांच्या मुळाशीं असतात असें प्रतिपादिलें. संततिनियमनाचीं साधनें उपलब्ध झाल्यामुळें विषयभोग भोगूनहि त्याचे परिणाम भोगावयास न लागण्याची सोय झाली. अशा या अनेक कारणांमुळें पूर्वींचीं ध्येयें व दृष्टि यांना तितकेंसें महत्त्व राहिलें नाहीं. पुरुषांना एक कायदा व बायकांना मात्र निराळा ही गोष्ट अतःपर स्त्रिया सहन करावयास तयार नाहींत. आणि तें रास्तहि आहे. पुरुष तो पुरुष व स्त्री ती स्त्री, असे मूलभूत भेद पाडून उभारलेलीं ध्येयें आज कोणी मानायला तयार नाहीं. अक्षतयोनित्वाचें, निर्मळ कौमार्याचें जें ध्येय स्त्रियांच्या गळीं उतरविण्याची पूर्वीं पुरुष खटपट करीत, तें ध्येय आज धुळींत गेलें आहे. त्या ध्येयाचा मनावर फारसा पगडा हल्लीं राहिला नाहीं. पुरुष काय किंवा स्त्रिया काय, त्यांना रोजच्या चाकोरींतील जीवनापेक्षां स्वैर सुंदर जीवनच आवडतें असें सांगण्यांत येत आहे. चंचल वासना-विकारांनीं नटलेले प्राणी म्हणजे हे मानव. पुरुष वा स्त्रिया यांच्यांत श्रेष्ठकनिष्ठपणा दाखवण्याची जरूर नाहीं. दोघेहि वासनांचे गोळे. पुरुष चंचल असतात नि स्त्रिया नसतात असें थोडेंच आहे? आणि स्त्रिया तेवढ्या पतिनिष्ठ असतात आणि पुरुष पत्नीनिष्ठ नसतात असें थोडेंच आहे? गुणदोष दोघांत आहेत. मानवजात जन्माला आली त्या वेळेपासूनच लैंगिक स्वैरता रूढ आहे. परंतु त्या स्वैरतेला आज गोड गोंडस नांव दिलें गेलें आहे. ही स्वैरता नाहीं. त्या त्या व्यक्तीचें आंतरिक स्वरूप प्रकट करण्याचा हा मार्ग आहे. हें व्यक्तीचें अंतराविष्करण आहे. चांगल्या चांगल्या कादंबऱ्यांतूनहि ही जी नैतिक शिथिलता ती गौरविली जात आहे, ती आदर्श म्हणून पुढें मांडली जात आहे. वरिष्ठ वर्गांतून ही लैंगिक स्वैरता स्वीकारली जात [1] आहे. जी स्त्री आर्थिक अडचणीमुळें

१ न्यायाधीश लिंड्से यानें " आजच्या तरुणांचें बंड " म्हणून एक पुस्तक लिहिलें आहे. त्यांत तो लिहितो " चौदा ते सतरा वर्षांच्या मुली जर आपण घेतल्या तर असें दिसेल कीं, दर दहा मुलींपैकीं एकीनें लैंगिक बाबतींत गुन्हा केला आहे. सतरा ते एकवीस

पाप करते, तिला तिच्या या धंद्यांतून लैंगिक सुखाचा आस्वाद घेऊं पाहणाऱ्या नव युवती घालवून देत आहेत. स्वतःची वासना तृप्त करून घेत असतांहि ती आपली सदसद्विवेकबुद्धि शाबूत ठेवूं पाहते. पुष्कळ स्त्रिया केवळ वासनांना बळी पडून व्यभिचार करतात असें नाहीं; तर विवाहित स्त्रीचे प्रियकर असलेच पाहिजेत असें त्यांना वाटतें! लैंगिक स्वैरतेची आवश्यकता आहे, तें एक कर्तव्यच आहे असेंहि म्हणण्यापर्यंत कांहींची मजल गेली आहे! सामाजिक निर्बंध स्त्रियांपुरते तेवढे असतात व पुरुषांना मात्र मोकळीक असते, ही गोष्ट मान्य करायला स्त्रिया तयार नाहींत. स्त्रियांनाहि मोकळीक कां नको? ही स्त्रियांवरचीं बंधनें कितीहि पक्षपाताचीं असलीं, अन्यायाचीं असलीं तरी तीं बंधनें झुगारून देणें कठिण आहे व धोक्याचेंहि आहे. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य पाहिजे आहे. वैवाहिक बंधनापासून मोकळीक पाहिजे आहे. मातृत्वाची जबाबदारी त्यांना नको आहे. पुष्कळशा चुणचुणीत व तरतरीत अशा तरुणींची ही अशी महत्त्वाकांक्षा आहे. काडीमोड वाढत आहेत. मुलांची आईबापांमध्यें ढकलाढकली चालली आहे. आणि हे आईबाप आपापल्या वकिलांमार्फत एकमेकांशीं बोलणेंचालणें करीत असतात.

स्त्रीपुरुषांच्या या संबंधांत चार भिन्न अशीं मतें प्रदर्शिलीं जातात. नियतिवादी म्हणतात कीं आपण पूर्वापार पद्धतीनेंच पुढें जाणें बरें. प्रेमहीन विवाह जर वाईट असेल, तर विवाहहीन प्रेम केवळ पृथ्वीवरील नरकच होय. प्रेमाचा प्रकाश असला तरी जेथें धार्मिक विधि नाहीं तो विवाह गर्ह्यच होय. आणि प्रेमाचा गंध नसलेलाहि विवाह जर तो धार्मिक असेल तर तो स्तुत्य होय.

आदर्शवादी म्हणतात कीं, ज्या अर्थी जग हें बदलत असतें, त्या अर्थी

वर्षांपर्यंतच्या मुली घेतल्या तर हें प्रमाण अधिकच आढळतें. तरुण व तरुणी वनभोजनांस जातात, नाचांना जातात, मोटारींत बसून फिरायला जातात. परंतु त्यांच्यांतील शेंकडा नव्वद तरी एकमेकांस मिठ्या मारतात, एकमेकांचीं चुंबनें घेतात आणि शेंकडा पन्नास चुंबन-आलिंगनाचीहि मर्यादा ओलांडून पलीकडे जातात." न्यायाधीश लिंड्से अमेरिकेंतील डेव्हर शहरीं न्यायाधीश होता. तो म्हणतो, "जी गोष्ट मी डेव्हर शहरासंबंधीं म्हणून सांगत आहें, ती गोष्ट अमेरिकेंतील प्रत्येक शहर व नगर यांना अधिकच यथार्थतेनें लागू आहे." कदाचित् न्यायाधीश लिंड्से याचें लिहिणें थोडें अतिशयोक्तिपूर्ण असेल व परिस्थिति इतकी बिघडली असेल असें मानलेंच पाहिजे असें नाहीं.

कोणतीहि स्मृति सार्वकालीन असणें शक्य नाहीं. बदलत्या काळाबरोबर नियम व विधीहि बदलले पाहिजेत. केवळ उच्च ध्येयांच्या शिखरांवर दृष्टि खिळवण्यांत अर्थ नाहीं. व्यवहाराच्या भूमीवर उतरून आपण पाहिलें पाहिजे आणि व्यावहारिक जगांत एकदां आलेत म्हणजे मोठीं मोठीं तत्त्वें व प्रत्यक्ष आचार यांच्यांत किती विसंगति असते तें दिसून येईल. आपलीं जीं सनातन मतें आहेत, जी पूर्वापार चालत आलेली विचारसरणी आहे, त्यामुळें पुष्कळशा स्त्रियांना खरा विषयानंद भोगणें दुरापास्त झालें आहे. त्यांना लैंगिक भूक नीट शमवितां येत नाहीं. त्यांना समाधान लाभत नाहीं. उदाहरणार्थ ग्रेट बिटन घेऊं. ग्रेट बिटनमध्यें पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या वीस लक्षांनीं अधिक आहे. धर्मावरची श्रद्धा कमी होत असल्यामुळें स्त्रियांची ही जादा संख्या निरनिराळ्या धार्मिक संस्था, मठ वगैरे आपल्यांत मिळवून घेऊं शकत नाहींत. मग या स्त्रियांचें काय करावयाचें? अशा परिस्थितींत एका पुरुषाला एकच बायको असावी असें जर आपण म्हणूं तर बाकीच्या स्त्रियांनीं का ब्रह्मचर्य पाळावयाचें? परंतु सक्तीचें ब्रह्मचर्य याला कांहींच अर्थ नाहीं. जुन्या रूढींना ज्यांचे बळी पडतात, त्यांना वैषयिक सुखांना आपण आंचवावें असें मनांतून वाटत असतें का? नाहीं. आपल्या वासनांची भूक शमवण्याची त्यांनाहि इच्छा असते. परंतु तसा वाव न मिळाल्यामुळें कांहीं स्त्रिया वेड्या होतात. कारण अतृप्त भावना म्हणजे परम कठिण वेदना होत. त्यामुळें जिवाची तगमग होते. माणसाला कांहीं सुचेनासें होतें. ज्यांना लग्न करणें अशक्य असतें, त्या दुसऱ्या साधनांचा अवलंब करतात व आपली भूक शांतवूं बघतात; आणि त्यांच्या या अनिर्बंध वर्तनाकडे आपणांस काणाडोळा करणें भाग असतें. एका पुरुषाला अनेक बायका असणें हें जरी बेकायदेशीर असलें, तरी व्यवहार तर सर्रास तसा चालू आहे. आणि अशा ह्या व्यवहारामुळें रोग फैलावत आहेत, वंचना होत आहेत, अश्लीलता वाढत आहे. शिवाय तरुण-तरुणी आमरण एकमेकांस प्रेमानें बिलगून बसतील असें सांगणेंहि फोल आहे. असल्या आशा दाखवण्यांत काय अर्थ? कायमचा परस्परांना जखडून टाकण्याचा करार न केला तरच प्रेम सुरक्षित राहण्याचा संभव आहे. आज जी सामाजिक अशांतता आहे, तिच्यावर एकच उपाय आमच्या मतें आहे. तो उपाय म्हणजे "प्रायोगिक विवाह."

संशयवादी म्हणतात, "भूतकाळाकडे पुन्हां वळणें योग्य नाहीं." परंतु आजची परिस्थिति पाहून त्यांचें मन खचतें. घटस्फोट वाढत आहेत. कौटुंबिक घटक न्यायमंदिरांतील निकालानें अलग अलग होत आहेत. नवीन पती जोडले जातात, नवीन पत्न्या मिळविल्या जातात. मुलांची ओढाताण होते. बाप पहिला तर नवीन आई, आई पहिली तर बाप नवीन, अशी सृष्टि मुलांसमोर असते. त्यांची कोणी काळजी घेत नाहीं आणि त्यांच्यावर आई-बापांचें नियंत्रणहि नीट राहत नाहीं. कुटुंबांतील तें हितकर व कल्याणकर असें वातावरण नष्ट झालेलें असतें. मुलांवर सत्संस्कार होत नाहींत. हें सारें पाहून हे साशंकवादीहि निराश होतात व हात चोळीत बसतात. तरणोपाय काय तें त्यांना समजत नाहीं. जसें व्हायचें असेल तसें होईल; असें म्हणून ते स्वस्थ बसतात. ते प्रवाहाबरोबर जातात. प्रवाहाबरोबर कसें तरी वाहत जाणें म्हणजे निश्चित प्रगति नव्हे. कांहीं तरी यांतून निष्पन्न होईल अशी वाट ते पाहत असतात.

दुसरे निर्भय विचारकर्ते असें उद्घोषितात कीं, जगणें हेंच जीवनाचें ध्येय. ज्यांना मस्तपणें नीट जगावें असें वाटत नाहीं अशा भितुरड्यांची कींव करावी. जीवनांतील आनंद भोगावे, एक प्रकारची गोड प्रक्षुब्धता अनुभवावी. जीवनांतून ते डोळे मिटून जातात. जीवनाकडे डोळे उघडे ठेवून ते बघत नाहींत. हे पुरुषार्थी पापें करतात व दुर्मीळ आनंद अनुभवितात. वासना-विकार जीवनांत असणारच. कुरकुरण्यांत काय अर्थ? शारीरिक सुखें म्हणजे कांहीं अपराध नव्हे. त्यांनीं आत्मा बाटत नाहीं, विटाळत नाहीं. ज्यांच्याशीं आपलीं बौद्धिक समधर्मिता आहे, ज्यांच्याकडे आपलें मन ओढतें, त्यांच्या देहांशींहि आपण परिचय करून घेतला तर त्यांत काय बिघडतें? आपण माणसें अमुक चांगलें व अमुक वाईट असें म्हणतों. परंतु निसर्गाला सारें सुंदरच वाटतें. यांचा नास्तिकवाद निसर्गमूल आहे. सारें सृष्टीच्या नियमानुसार चाललें आहे. सृष्टींतील कांहीं शक्ती एकत्र आल्या व हा मानवी आकार जन्माला आला. पुन्हां या शक्ती दूर होतील व हा मानवी आकार जगांतून नाहींसाहि होईल. म्हणून जोंपर्यंत हा मानवी देह आहे, तोंपर्यंत सुख भोगावें. जास्तींत जास्त सुख भोगण्याची खटपट करावी. जर जीवनाचा परिपूर्णपणें अनुभव घ्यावयाचा असेल, जीवनांत साहस अनुभवायचें असेल, सौंदर्य चाखावयाचें असेल,

सर्वांशानें जगायचें असेल, तर मरण येण्यापूर्वीच या पेल्याचा मनमुराद आस्वाद घेतला पाहिजे. आपल्या वासना-विकारांना लपविणें, आपल्या क्षुद्र सुखांच्या क्षुधांवर पांघरूण घालणें वरील विचारसरणीच्या लोकांना आवडत नाहीं. ही लपवालपवी व छपवाछपवी शिष्टतेचें किंवा सदभिरुचीचें लक्षण आहे असेंहि ते समजत नाहींत. कोणत्याहि वृत्तींना उगीच दाबूं नका, कोंडूं नका. होऊं दे सारें खरें स्वरूप प्रकट. लपंडावाची काय गरज? जीवन म्हणजे साहस, बेफिकीर वागणें. या जगांत आपल्या उत्साहाला स्वैर वाव द्या. मस्तपणें राहणें यांतच मौज. कशाची दिक्कत नाहीं, कशाची पर्वा नाहीं. जोरदारपणें, बेगुमानपणें जगा. जुनाट नीतिशास्त्राचें तुणतुणें वाजवणारे बुळे असतात, त्यांचें रक्त सळसळत नसतें, म्हणून त्यांना मिळमिळीत व गुळमुळीत जीवन आवडतें. बहुजनसमाजाच्या भावना कशा पटकन प्रक्षुब्ध होतात, वृत्ती कशा उत्तेजित होतात, तें या बावळटांना व मेषपात्रांना काय कळे! आपला दुबळेपणा व भित्रेपणा नीतीच्या नांवाखालीं ते छपवूं पाहतात, दुसरें काय? असे हे स्वैर व स्वच्छंद व्यक्तित्वाचे धीट पुरस्कर्ते आहेत. स्वतःच्या वासनांवर कोणताहि अंकुश चालविण्यास ते तयार नाहींत. आपल्या मोकाट व भरमसाट जीवनाला कोणी अडथळा केला तर तो त्यांना खपत नाहीं. नैतिक संयम म्हणजे एक जुनाट बावळटपणाची कल्पना आहे असें ते मानतात. पावित्र्याच्या व धर्मश्रद्धेच्या गोष्टी म्हणजे भोळसटपणा आहे. ज्याला व्यभिचार म्हणतात तो व्यभिचार नसून आंतरिक स्वातंत्र्याचें तें बाह्य प्रतीक आहे. दृढमूल झालेल्या नाना धार्मिक संस्था म्हणजे जीवनाचे शत्रू आहेत. या सर्व धार्मिक संस्था तुडवल्या पाहिजेत. एरव्हीं नवीन सामाजिक रचना उभारतां येणार नाहीं.

## आर्थिक संबंध

आर्थिक बाबतींत सरकारनें ढवळाढवळ करायची नाहीं हें तत्त्व आतां मागें पडलें. "कारखानदार व कामगार परस्परांशीं करारमदार करावयास स्वतंत्र आहेत; स्पर्धेचें स्वातंत्र्यहि सर्वांस हवें; ज्या कांहीं भानगडी उत्पन्न होतील त्या आपोआप शमतील;" असले विचार अतःपर राहिले नाहींत. आपली घडी आपोआप नीट बसवून घेईल अशा प्रकारचें यंत्र समाज नव्हे हें आतां कळूं

लागलें आहे. आर्थिक बाबतींत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य दिल्यानें दोन वर्ग निर्माण झाले. मूठभर अशा चंदुलालांचा एक वर्ग व दारिद्र्य आणि दुःख यांत खितपत पडलेल्या श्रमजीवींचा, कोट्यवधि कष्टाळूंचा दुसरा वर्ग. ही अशी स्थिति निर्माण होणें अपरिहार्य आहे असें नाहीं. ज्यांच्यावर आपण नियंत्रण ठेवूं शकत नाहीं, ज्या आपल्या हातीं नाहींत, अशा कांहीं बाह्य शक्तींनीं व्यक्ती व समाज बनत असतात असें आज सहसा कोणी मानीत नाहीं.

यंत्रांमुळें कंटाळवाणें तेंच तें बैलासारखें काम करणें कमी होईल व मनुष्याला कलात्मक व सांस्कृतिक असें जीवन अनुभवायला अधिक अवसर मिळेल अशी अपेक्षा होती. आज मानवी श्रम यंत्रांमुळें कमी झाले आहेत यांत शंका नाहीं. परंतु त्यांनीं कामांत कंटाळवाणेपणा मात्र अधिक उत्पन्न केला आहे. आजच्या यांत्रिक उत्पादनाचा पाया श्रमाच्या आत्यंतिक विभक्तीकरणांत आहे. एकादी मोटार तयार करायची असली तर तिचे हजारों भाग निरनिराळ्या खात्यांत तयार होत असतात. तीच एक वस्तु, तोच एक भाग त्या त्या कामगारानें मरेपर्यंत करावयाचा. यामुळें कामगाराच्या जीवनांतील कारागिरी नष्ट झाली आहे. कामगार म्हणजे एक यंत्रच बनला आहे! यंत्रासमोर तोहि यंत्राप्रमाणें उभा असतो व ते ते ठराविक भाग, त्या त्या ठराविक वस्तू यंत्रांतून बाहेर काढीत असतो! आज औद्योगिक कारखान्यांत सौंदर्य, पावित्र्य, आनंद यांना स्थान नाहीं. कारागीर, जास्त मोठ्या प्रमाणावर उत्पादन व्हावें म्हणून एक यंत्र चालवणारा कामगार बनला आहे. कामगाराला कामांत आनंद वाटत नाहीं, तेथें मनाला करमणूक नाहीं. शरीर मात्र थकून जातें. पूर्वीं कारागीर आपल्या वस्तूंच्या निर्मितींत आनंद मानीत असे. त्याच्या बुद्धीचा व चारित्र्याचा त्याच्या कर्मांत विकास होत असे. परंतु आज बौद्धिक विकासासाठीं, चारित्र्याच्या संवर्धनासाठीं दुसऱ्या गोष्टींची जरूर पडते. कामगारांना कामाबाहेर आनंद बघावा लागतो. उद्योगमंदिरच आनंदमंदिर होत नाहीं. कारखानाच कलात्मक जीवनाचा अनुभव देऊं शकत नाहीं. आणि म्हणून कामगार अधिक मजुरी मागतो. कामाचे कमी तास असावेत, अशी मागणी करतो. कारण त्याला दुसरें कांहीं शिकावेसें वाटतें; मनाची करमणूक त्याला करून घ्यावयाची असते; त्याला स्वतःचा विकास करून घ्यायचा असतो; थोडा मोकळा वेळ त्याला पाहिजे असतो. परंतु चळवळी

करून कामगारवर्गानें जी थोडीफार फुरसत मिळविली तिचा विनियोग कसा केला जातो? कांहीं उत्तेजक करमणुकींत ती फुरसत खर्चिली जाते. कामगारांचा फुरसतीचा वेळ जावा म्हणून नानाप्रकारच्या मोहक करमणुकी उभ्या असतात. खिसा रिकामा होतो आणि रोजचें कारखान्यांतील तें जड जीवन, तें शून्यमय जीवन, त्यापासून थोडा वेळ तरी अलग झाल्यासारखें वाटतें. थोडा वेळ तरी त्या नीरस, प्राणहीन व यांत्रिक जीवनाचा विसर [1]पडतो. काम करीत असतांना आपल्या ज्या उदार व उच्च वृत्ती दाबल्या गेलेल्या असतात, कोंडल्या गेलेल्या असतात, त्यांना समाधान देण्यांत फुरसतीचा वेळ कोणी दवडीत नाहीं. म्हणून कामाचे तास कमी होऊन फुरसत मिळाली, परंतु फायदा काय झाला शंकाच आहे. ही फुरसत आशीर्वाद समजावी कीं शाप? कारखान्यांतून कामें करणारे ओंगळ व गलिच्छ वस्तींत राहतात. त्यांचा वेळ दारूच्या गुत्त्यांत व चहाच्या दुकानांत जातो. त्यांच्या आत्म्यांचें पोषण अशा ठिकाणीं होत असतें. एक म्हण आहे कीं, " जेथें तुझा ठेवा तेथें तुझें मन." ही म्हण समुदायांना व व्यक्तींनाहि लागू आहे. व्यक्ती किंवा समुदाय कोणत्या वस्तूंना महत्त्व देतात हें समजून घ्यायचें असेल, तर आपला फुरसतीचा वेळ तीं कसा दवडतात तें त्यांना विचारावें. हा जो मानवी जीवनाचा ऱ्हास होत आहे, भयंकर विनाश होत आहे, तो पाहून मन उद्विग्न होतें. श्रम, विश्रांति व पूजा या मानवाच्या तीन आवश्यक गरजा आहेत असें प्रत्येक धर्म सांगतो. श्रमामुळें आपण इतरांशीं संबद्ध होतों. आपण सारे एकमेकांसाठीं काम करीत आहोंत ही बंधुभावाची भावना वाढते. आपण एकमेकांस अधिक यथार्थतेनें जाणतों. आणि सर्वांच्या सुखस्वास्थ्यांत भर घालण्याची आपली वृत्ति जागृत राहते. विश्रांतीमुळें आपण आपणांस जाणतों. त्या वेळेस आपण आपले असतों. आपलें वैचारिक स्वातंत्र्य त्या वेळेस आपण अनुभवतों. त्या वेळेस आपण आपले नियन्ते असतों. आपण आपले राजे असतों. आणि पूजेमुळें या विश्वाचा आत्मा आपण जाणूं पाहतों; या सर्व विश्वाचा हेतु समजून घेतों. परंतु आज

१ वुइल्यम आर्चर " ज्ञान आणि चारित्र्य " या पुस्तकांत लिहितो, " जीवनांतील कंटाळवाणेपणा दूर करावयास दुर्गुण हें एक साधन होतें. निराश मनुष्य व्यसनी होतो. कंटाळवाणें काम करून कंटाळलेल्या व थकलेल्या मेंदूला दुर्गुण व व्यसनें जरा तरतरी देतात. रिकाम्या मेंदूंतील शून्यतेची जड भावना व्यसनामुळें थोडा वेळ नष्ट होते."

काय झालें आहे पहा. श्रमानें मनुष्य एकमेकांच्या जवळ येण्याऐवजीं एक-मेकांपासून दुरावत आहे; त्याची सामुदायिक सामाजिक वृत्ति मारली जात आहे. विश्रांतीच्या वेळीं मनाचे डोळे आंधळे केले जातात, आत्मारामाचें मंदिर बंद असतें; आणि क्षुद्र मूल्यांचा स्वीकार करून आपल्या दैवी वृत्ती निस्तेज व निर्जीव करण्यांतच पूजेची इतिकर्तव्यता दिसून येते. जरा एकटें राहणें आज केवळ अशक्य झालें आहे. श्रमाचे वेळीं, विश्रांतीचे वेळीं, किंवा पूजेचे वेळीं एकटें असणें म्हणजे लोकांना जणुं दुर्भाग्य वाटतें! कारखान्यांत काम करूं, गर्दींत घुसून मजा मारूं, बाहेर जायचें झालें तरी जमावानें जाऊं, पाप करायचें असलें तरी सर्व मिळून करूं, आणि प्रार्थनाहि सामुदायिक रीत्या करूं! संध्याकाळच्या वेळीं घरीं निवांत बसणें, एकटेंच जरा सृष्टीच्या सान्निध्यांत फिरायला जाणें, आत्म्याचा विकास व आत्मचिंतन, या सर्व गोष्टी आज नीरस व कंटाळवाण्या वाटत आहेत. आजची आपली पिढी म्हणजे धांवपळीची पिढी. ना विश्रांति, ना निद्रा. वास्तविक खरें म्हटलें तर ज्याप्रमाणें जरूर पडली म्हणजे शोध लागतात, गरजेंतून शास्त्र जन्मतें, त्याप्रमाणें विश्रांतीच्या वेळींच कला व साहित्य, तत्त्वज्ञान व धर्म यांचा जन्म होतो. विश्रांति, फुरसतीचा वेळ म्हणजेच सर्व संस्कृतीची जननी. परंतु आजची संस्कृति म्हणजे आपल्याच हातांत सर्व सत्ता घेण्याची संस्कृति. या राक्षसी व सुलतानी संस्कृतींत मनाच्या उच्च विकासाला अवसरच नाहीं. खरोखरचें सात्त्विक चिंतन करायचें असेल तर एक प्रकारची शांति, एक प्रकारची स्तब्धता व एकाग्रता, एक प्रकारचा अलिप्तपणा यांची जरुरी असते. परंतु आजच्या संस्कृतींत या गोष्टी आहेत कोठें? आजची संस्कृति या अशा गोष्टींची शत्रु आहे. आज ज्ञान वाढलें असलें, तरी शहाणपण वाढलें असें नाहीं.

आणि आजच्या या औद्योगिक युगानें, या यांत्रिक युगानें आपणांस पैशाचे पुजारी बनविलें आहे. द्रव्य म्हणजेच देव! श्रीमंत होऊं तरच सुईच्या भोकांतून पार जाऊं असेंच आज निश्चित वाटतें आहे. पैसा म्हणजे स्वर्गांतील राज्याचा सदर परवाना. कोणत्याहि मार्गानें व वाटेल ती किंमत देऊन व्यवहारांत यशस्वी होणें हेंच आजचें ध्येय आहे. पैशामुळें मान, पैशामुळें स्थान. पैसा मिळविण्याची कला ज्याला साधली किंवा सुदैवानें ज्याला पैसा लाभला त्याला समाजांत सर्वोच्च स्थान आज दिलें जातें. श्रेष्ठकनिष्ठपणा मोजण्याचें पैसा



१२७४

हें साधन झालें आहे. हें यांत्रिक युग येण्यापूर्वी समाजांतील मानपान मोजण्याचीं निराळीं साधनें होतीं. संत, विद्वान् लोक, कवी, तत्त्वज्ञानी यांना समाज अग्रपूजेचा मान देई. जे ज्ञानानें व चारित्र्यानें श्रीमंत असत तेच लोकनायक बनत. त्यांच्याजवळ मालमत्ता किती आहे या गोष्टीकडे कोणी बघत नसे. परंतु ते दिवस गेले. गरिबींतहि निर्मळ, निरागस व स्वाभिमानी राहण्याचे ते दिवस गेले. पैसे मिळविणें हा आजच्या जगांतील एक अत्यंत आवडता व लोकप्रिय धंदा झाला आहे !

या यांत्रिक उद्योगधंद्याच्या काळांत आणखी एक महत्त्वाचा परिणाम झाला आहे व तो म्हणजे घर नाहींसें होणें. अमेरिकेंत व रशियांत ही गोष्ट दिसून येत आहे. ज्या कुटुंबांतील प्रत्येकास आर्थिक स्वातंत्र्याची स्पृहा असते, तेथें कौटुंबिक संबंध व कौटुंबिक बंधनें शिथिल होतात. स्त्रिया व पुरुष घराबाहेर कामें करतात आणि मुलें जर घरीं झोंपलेलीं नसतील तर शाळेंत किंवा कॉलेजांत किंवा क्रीडांगणावर, किंवा बोलपटगृहांत कोठें तरी आपला वेळ दवडतात. “जीवनाचा प्रश्न” या आपल्या पुस्तकांत ट्रॉट्स्की रशियाविषयीं लिहितो “पुरातन पद्धतीची जी कुटुंबपद्धति तिच्यावर फार महत्त्वाच्या व प्रचंड अशा आपत्ती आज आल्या आहेत. महायुद्ध व क्रांति यांनीं ही जुनाट कुटुंबपद्धति कोलमडूं पाहत आहे... आपण अधिक समाजवादी आर्थिक सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. नानाप्रकारचीं कामें कुटुंबांतील मंडळींना करावीं लागतात. त्यांना सतत काळजी व चिंता वाटत असते. यांपासून आपण त्यांना मुक्त केलें पाहिजे. जर नवीन आर्थिक सुधारणा करूं तरच हें शक्य होईल. धुणें वगैरे सार्वजनिक धोबीखान्यांत केलें पाहिजे. जेवणखाण सार्वजनिक भोजनालयांत झालें पाहिजे. शिवणकाम सार्वजनिक कारखान्यांत केलें पाहिजे. मुलांचें शिक्षण बालसंगोपनगृहांत सार्वजनिक शिक्षकांकडून झालें पाहिजे व हे शिक्षकहि असे हवेत कीं ज्यांना ह्या कामाची खरोखर आवड आहे. असें आपण करूं तरच पति व पत्नी यांना जखडून टाकणारे बंध ढिले होतील. बाह्य परिस्थितीमुळें व प्रासंगिक आणि आकस्मिक कारणांमुळें जीं बंधनें निर्माण होतात तीं नष्ट होतील. पतिपत्नी परस्परांचें जीवनशोषण करणार नाहींत.” याचा अर्थ थोडक्यांत हा कीं, पुरुषालाहि घरांत स्थान नाहीं, स्त्रीलाहि नाहीं; घर ही वस्तु नाहींशीच झाली !

हें यंत्रमय औद्योगिक युग नवीन नवीन गरजा उत्पन्न कराव्या असें मानतें. जें जें भोगावें त्यानें भूक वाढतच जाते. गिऱ्हाइकाच्या भुकेला जें मिळतें त्यानेंच ती भूक वाढते. भौतिक प्रगतीचा मार्ग म्हणजे अधिक मागणें, अधिक मिळविणें हाच होय. अशा उत्तेजक व प्रक्षोभक स्पर्धेमुळें जीवनांतील शून्यता व निष्फळता आपण लपवूं बघत असतों. हें यंत्रयुग मनुष्याच्या सर्वसाधारण गरजा भागवतें, परंतु व्यक्तीच्या विशिष्ट इच्छेला येथें स्थान नाहीं. कला हद्दपार झाली, ती कोंपऱ्यांत बसली.

## राजकारण

लोकशाहीची तर आज सत्त्वपरीक्षा चालली आहे. राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीनें लोकशाही तितकीशी प्रिय आज नाहीं. इटलींत ती कोलमडली. स्पेन-मध्यें तेंच झालें. रशिया व चीनमध्येंहि तिच्याविषयीं फारसें चांगलें मत नाहीं. पूर्व युरोपच्या कांहीं भागांत व दक्षिण अमेरिकेंत प्रातिनिधिक लोकशाहीचें स्वरूप थोडेंसें दिसतें. परंतु तेथेंहि श्रद्धा डळमळूं लागली आहे, संशय निर्माण झाला आहे. स्विट्झर्लंड, स्वीडन, नॉर्वे अशा लहान राष्ट्रांतच खरी लोकशाही जगूं शकेल, अन्यत्र नाहीं, असें लॉर्ड ब्राइस म्हणाले होते.

अनियंत्रित सत्तेपासून बचाव म्हणून लोकशाहीची आपण कांस धरिली. परंतु आज लोकशाहीचा जो व्यवहार दिसत आहे तो समाधानकारक नाहीं. राज्यशासन म्हणजे तंत्रमय अशी एक कला आहे व तिच्यांत तज्ज्ञ असणारेच सत्ताधारी होतात ही गोष्ट आज आपल्या अनुभवास येत आहे. लोकशाहीचा प्रत्यक्ष कारभार पाहूं तर असें दिसेल कीं खरोखर अत्यंत योग्य व कार्यक्षम अशीं जीं माणसें तीं क्वचितच राज्यकारभार चालवतात. तीं माणसें पुढें येऊं शकत नाहींत. उत्कृष्ट माणसें लोकशाहीला जणुं नको असतात.

उद्योगधंद्यांतच आज यंत्रयुग आहे असें नाहीं, तर राजकारणांतहि तेंच आहे. लोकशाहीच्या नांवाखालीं कोणी तरी पुंजीपति उभा राहतो, तोच मागें उभा राहून सर्व राज्ययंत्र चालवतो. सारी कळ त्याच्या हातांत असते. निवडून आलेल्या प्रतिनिधींना स्वातंत्र्य नसतें. ते पुढारीपण घेऊं शकत नाहींत. आपल्या स्फूर्तीनें कांहीं करूं शकत नाहींत. प्रतिनिधी म्हणजे बाहुलींच असतात. एका प्रचंड यंत्रांतील तीं लहानमोठीं चाकें असतात. आपल्या मतदारसंघांतील

मतदारांचें मत काय असेल याचा विचार प्रतिनिधी फारसा करीत नाहींत. सभागृहांतील चर्चांकडे त्यांचें लक्ष नसतें. स्वतःचीं प्रामाणिक मतेंहि ते दूर ठेवतात. मत कोठें द्यावयाचें तें त्यांना आगाऊच सांगितलेलें असतें. यामुळें या साऱ्या चर्चा व हे वादविवाद केवळ भ्रमरूप व मायावी असतात. पक्षोपपक्ष करण्याची जरूरच नसते. लोकशाही केवळ एक नांव आहे झालें.

लोकशाही-युगांत व्यक्तीचें स्वातंत्र्य तरी नीट राहिलें का? तसेंहि नाहीं. युरोप व अमेरिका म्हणजे लोकशाहीचीं पूजक असें मानतात. व्यक्तित्वाला तेथें मान आहे असें समजतात; परंतु वास्तविक व्यक्तीच्या जीवनाला आज तेथें काडीचीहि किंमत नाहीं. वैयक्तिक जीवनाची कोणी कदर करीत नाहीं. स्वातंत्र्याच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या या भूमींतून 'हम करे सो कायदा' हेंच तंत्र आहे. अन्य संस्कृती व अन्य मानववंश यांच्यावर सूड घेणें व हल्ले चढविणें सुरू आहे. विरुद्ध मताच्या राजकीय पक्षांना दहशत बसावी म्हणून तेथें संघटना आहेत. व्यक्तींचें जीवन सुरक्षित नाहीं. वैयक्तिक सूडहि घेतला जातो. कशानें तरी प्रतिस्पर्धी दूर करायचा. आज साम्यवादी रशियांतहि आपण काय करावें हें ठरविण्याचा व्यक्तीला अधिकार नाहीं. यांत्रिक व तांत्रिक परिणाति हें ध्येय असल्यामुळें जशी जरूर असेल त्याप्रमाणें तीं तीं माणसें तेथें पाठवलीं जातात. त्या त्या कामांत त्यांना तरबेज करण्यांत येतें. आचारस्वातंत्र्य, कर्मस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य यांना तेथें स्थान नाहीं.

या लोकसत्तात्मक म्हणून मिरवणाऱ्या देशांत अज्ञान बोकाळलें आहे, शिथिलता शिरजोर झाली आहे. सदभिरुचीला स्थान नाहीं, संयम व शिस्त नष्ट झालीं. तेथील वृत्तपत्रें पहा म्हणजे वरील गोष्टींचा पुरावा मिळेल. लोकसत्तात्मक राष्ट्रांतील बहुजनसमाज मुख्यत्वेंकरून काय वाचतो? वर्तमानपत्रांत कोणता मजकूर असतो, कोणत्या गोष्टींना स्थान असतें? घटस्फोटांच्या हकिगती, खून, नाचरंग, गुप्तपोलिसांच्या गोष्टी, कोर्टांच्या आवारांतील हकिगती, हें सारें तेथें आढळतें. या खाद्यावर पुष्ट होणारी लोकशाही कशी असेल बरें? कितीशी सुसंस्कृत ती असेल बरें? कसें असेल तिचें अंतरंग? शिक्षणाच्या सोयी जरी पुष्कळांना अनुकूल असल्या, तरी संस्कृतीचा दर्जा वाढला असें झालें नाहीं. कॉलेजांत जाणें सोपें झालें आहे, परंतु सुसंस्कृत होऊन, खऱ्या अर्थानें सुशिक्षित होऊन बाहेर पडणें दुष्कर झालें आहे.

वाचायला आपण शिकतों, परंतु विचार करायला शिकत नाहीं. आणि वृत्तपत्रें, नियतकालिकें, बोलपट, नभोवाणी हीं जीं लोकशिक्षणाचीं साधनें, त्यांनीं कोणतें शिक्षण देण्याचें ठरविलें आहे? लैंगिक अर्धवट ज्ञान, संततिनियमनाची माहिती, फ्रॉइड व जंग यांच्या मानसशास्त्राची मोडकीतोडकी हकिगत, मनोविश्लेषणाच्या नांवानें पाणचट व चटोर गोष्टी हें सारें पुरवलें जात आहे. जे समंजस आहेत, शिकवण्याची ज्यांना पात्रता आहे, ज्यांना अधिकार आहे ते भीतीनें बाजूला उभे राहतात आणि बहुजनसमाजाच्या विचारांशीं व मनाशींच एकरूप होतात. आज साराच गोंधळ माजला आहे. अधिकारवाणीनें कोण सांगणार? पवित्र परंपरा तीहि मेली. बहुजनसमाजाच्या वृत्तींना वळण कोण देणार, त्यांच्या शक्तीला व उत्साहाला मार्ग कोण दाखवणार? त्यांच्या भावनांना विचारांची वेसण कोण घालणार? आज वृत्ती स्वैर झाल्या आहेत. भावना उच्छृंखल होत आहेत. वर्गद्वेष पसरत आहे. प्रक्षोभ वाढत आहे. आपणासमोर जे महान् प्रश्न आहेत त्यांना तोंड देण्याची कोणांतहि हिंमत नाहीं; त्या प्रश्नांचें स्वरूप समजून घेण्याची पात्रता नाहीं; आणि वेळहि नाहीं. किंवा समतोल विचार करणारे असे जे द्रष्टे आपणांत कांहीं आहेत त्यांच्यावर श्रद्धा व विश्वास ठेवण्यास आपण तयार नाहीं. बहुजनसमाजाचें मत तेंच प्रमाण. संख्येला महत्त्व. आरडाओरडीला मान. विचारवंतांच्या मताला किंमत नाहीं. विचाराच्या पेढीवर आज प्रमाणबद्ध, मनःपूर्वक बनवलेल्या मताला किंमत नाहीं; तर घाईघाईनें बनवलेलीं मतें, ना ज्यांना ताळ ना तंत्र, तींच आज तेथें स्वीकारलीं जात आहेत.

कारखान्यांतून जसा एका सांच्याचा माल बाहेर पडतो, त्याप्रमाणें सर्वांच्या मनांतून ठराविक विचार व ठराविक कल्पनाच बाहेर पडाव्यात, अशी वृत्ति लोकशाही देशांतून दिसून येते. आपलीं मनें स्वतंत्र विचार करीत नाहींत, यांत्रिक रीतीनें विचार करितात. मनाचें यंत्र झालें कीं सारी सर्जनशक्ति नष्ट झाली असें समजावें. स्वतंत्र निर्माणशक्तीला वावच नाहीं. परमोच्च अशी जी निर्मिति होत असते ती ठराविक सांच्याप्रमाणें विचार करणाऱ्या मनांतून कधींहि होत नाहीं. ज्याच्याजवळ वस्तूच्या अंतरंगांत शिरणारी प्रज्ञा असते, जो कठोरपणें व अनासक्तपणें विचार करूं शकतो, जो आजुबाजूच्या लोकांपेक्षां जरा उंच जाऊन बघतो व शांतपणें मनन व चिंतन करतो, तोच जगाला नवीन असें कांहीं

देऊं शकतो. तोच जगाला नवीन सृष्टि दाखवील, नवीन दृष्टि देईल. आणि खरोखर खोल जर आपण पाहूं, तर नांव लोकशाहीचें जरी असलें तरी तिच्या प्रत्यक्ष व्यवहारांत एकशाहीच दिसून येईल. हें म्हणणें विरोधात्मक भासलें तरी खरें आहे. लोकशाहीचा आत्मा कशांत आहे? व्यक्तीला स्वातंत्र्य असणें, व्यक्तीला मान असणें, हाच तो आत्मा. इब्सेन म्हणतो "मनुष्या, तूं तूं अस." परंतु आजच्या लोकशाहींत व्यक्तित्वाला वाव कोठें आहे? एका ठराविक नमुन्याचे आपण सारे बनत आहोंत. आपलें आंतरिक स्वतंत्र जीवन आज मेलें आहे. आपले सर्वांचे विचार जर एकरूप झाले, एका ठशाचे झाले तर प्रगति खुंटलीच म्हणायची.

जेथें इतकी आर्थिक विषमता आहे, तेथें राजकीय समता कोठून असणार? नवीन, अधिक चांगली अशी समाजरचना निर्मिण्यासाठीं आपल्या हातांत सर्व सत्ता घेण्याची खटपट श्रमजीवी लोक करीत। आहेत. समाजसत्तावादी व साम्यवादी संघटना राज्यतंत्र आपल्या हातीं घेऊं पाहत आहेत. राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांचे बांध ढांसळत आहेत व वर्गविग्रहावर भर दिला जात आहे. देशभक्तीचें खूळ भांडवलवाल्यांनीं निर्मिलें आहे. राष्ट्रभक्ति व देशभक्ति असल्या भ्रामक कल्पनांच्या भुतांपासून श्रमजीवी वर्ग मुक्त केला पाहिजे. "माझा वर्ग म्हणजे माझा देश" असें साम्यवादी म्हणतो. आणि वर्ग नष्ट केल्याशिवाय, अस्तित्वांत असणारे वर्गविग्रह दूर केल्याशिवाय, खरी लोकसत्ता अस्तित्वांत येणार नाहीं असें तो म्हणतो.

ज्या मानानें स्वतंत्र विचारसरणीचे व स्वतंत्र इच्छेचे लोक समाजांत असतील, त्या मानानें त्या समाजांत राजकीय जीवन आहे असें समजावें, समाजाचें स्वास्थ्य नीट राहावयास हवें असेल तर विचार व आचार यांचा मोकळा खेळ सुरू असला पाहिजे. परंतु आजच्या लोकशाहींत कोठें आहे हें? आजच्या समाजरचनेंत आहे का हें शक्य? मतदानाच्या पेटींत मतें टाकण्याच्या जुगारापेक्षां दुसरी कोणती तरी अधिक चांगली पद्धति शोधून काढली पाहिजे. मानवी व्यवहार जिनें अधिक सुरळीत व सुंदर रीतीनें चालतील अशी पद्धति शोधून काढण्यासाठीं पराकाष्ठा केली पाहिजे.

## आंतरराष्ट्रीय संबंध

मानवजातीवर प्रेम करणारा आजची आंतरराष्ट्रीय परिस्थिति पाहून

सुखावणार नाहीं. राष्ट्रें शांतिसूक्तें गातात व युद्धाची सिद्धता करीत असतात! युद्धाला जन्म देणारी मनोरचना सोडावयास तीं तयार नाहींत. दुसरे आहेत तसें आपण अजून नाहीं म्हणून ईश्वराचे ते आभार मानीत असतात. आपली जात सर्वोत्कृष्ट व अति पवित्र, आपला धर्म म्हणजे जगाची आशा, आणि आपलें राष्ट्रच जगाचें नेतृत्व करण्यास पात्र, असें सर्वांस वाटत असतें. ल्हानपणापासूनच दुसऱ्यास तुच्छ व स्वतःस उच्च समजणाऱ्या या संकुचित राष्ट्रधर्माची शिकवण मिळत असते. निशाणें फडकविलीं जातात, शिंगें फुंकिलीं जातात, देशभक्तीचीं व द्वेषाचीं गीतें गायिलीं जातात. मागील युद्धांत गुंतलेल्या प्रत्येक राष्ट्रास वाटत असे कीं, आपण लढाईत पडलों ते केवळ संस्कृतीच्या संरक्षणासाठीं! संस्कृतीच्या नांवाखालीं प्रत्येक राष्ट्रानें वाटेल तें केलें व त्याचें समर्थन केलें. कत्तली केल्या, जाळपोळी केल्या, सारें उध्वस्त केलें, परंतु संस्कृतीसाठीं म्हणून केलें! शिकारी कुत्रे सशावर किंवा कोल्ह्यावर ज्या क्रूरतेनें तुटून पडतात, त्या क्रूरतेनें माणसें माणसांवर तुटून पडावींत, क्रूरता माणसांत येऊन माणसानें पशू बनावें, यासाठीं आधीं द्वेषाचे मंत्र कानीं—कपाळीं ओरडले जात असतात. आपण विजयी झालें पाहिजे व इतरांना धुळींत मिळविलें पाहिजे, ही उत्कट तीव्रता माणसाच्या मनांत आधीं उत्पन्न करावी लागते. माणसाचें मन द्वेषाग्नीनें प्रज्वलित करून ठेवावें लागतें. यासाठीं अर्धवट सत्यें प्रसृत केलीं जातात. असत्य गोष्टी प्रसिद्धिल्या जातात. दुसऱ्या राष्ट्रांविषयीं व दुसऱ्यांच्या संस्कृतीविषयीं हेतुपुरस्सर विपर्यास सदैव केला जात असतो. आणि अशा रीतीनें माणसाला जंगली जनावर केलें जातें. एकादा वक्ता रस्त्यांत उभा राहतो. मोठ्या कुशलतेनें हेतुपुरस्सरपणें नाना गोष्टी व घडामोडी तो आपल्या व्याख्यानांत गुंफतो. आणि सीझरचा रक्तरंजित अंगरखा जनतेला दाखवून अँटनी ज्याप्रमाणें बोलला त्याप्रमाणें हे वक्ते "केवढें भयाण व करुण दृश्य! भीषण देखावा! सूड! खून! जाळा, मारा!" असें बोलूं लागतात. कत्तली करणारे सैनिक एके काळीं माणसें होतीं. परंतु एकदां लष्करांत भरती झालीं कीं त्यांना स्वतंत्र इच्छा नाहीं; त्यांना मन नाहीं, आत्मा नाहीं, आशा नाहीं, कांहीं नाहीं. एका मोठ्या यंत्रांतील ते छोटे भाग बनतात व यंत्र फिरवील तसें त्यांना फिरावें लागतें. त्या यंत्रासमोर नमावयास त्यांना शिकविलेलें असतें व इच्छेनें वा अनिच्छेनें त्या यंत्राला ते प्रणाम

करितात. बुद्धिप्रधान माणसांस अशा रीतीनें स्वेच्छाहीन गुलाम बनविण्यांत येतें. युद्धाचें एकदां रणशिंग वाजलें कीं संस्कृतीच्या गप्पा दूर राहतात आणि मनुष्य जणुं अगतिक होऊन पशू होतो. युद्ध म्हणजे मानवजातीला मिळालेला भीषण शाप होय. युद्ध म्हणजे मानवजातीवरचा अत्यंत क्रूर असा अत्याचार. शेतेभातें उध्वस्त होतात. शहरें बेचिराख होतात. लाखों लोक ठार होतात. लाखों अपंग होतात. कोणाचे हात तुटतात, कोणाचे पाय. लाखों स्त्रिया निराधार होतात. त्यांची विटंबनाहि होते. मुलांना कोण सांभाळणार, कोण खायला देणार? सर्वत्र दुष्काळ व मरण. जिकडे तिकडे द्वेषाचें मारक वातावरण. कारस्थानें सदैव चाललेलीं. कुटिल डावपेंच चाललेले असें हें युद्ध असतें. जोंपर्यंत अशा या सैतानी नाचाचा, या भीषण भुतेरी नृत्याचा आपणांस वीट येत नाहीं, तोपर्यंत आपण सुधारलेलें आहोंत व सुसंस्कृत आहोंत असें कोणत्या तोंडानें म्हणावयाचें? हा दंभ किती वेळ आपण दाखविणार? जोंपर्यंत तोफा डागून लक्षावधि माणसांची कत्तल आपण करीत आहोंत, विषारी धूर सोडून हालहाल करून लोकांना, नागरिकांना मारीत आहोंत, म्हातारे असोत कीं मुलें असोत, स्त्रिया असोत कीं आजारी असोत, सरसकट आगीचा वर्षाव वरून करीत आहोंत, तोंपर्यंत प्राण्यांना क्रूरता दाखवूं नये म्हणून कायदे केलेत किंवा प्रचार केलेत, आजाऱ्यांसाठीं दवाखाने घातलेत, किंवा निराश्रितांसाठीं अनाथालयें उघडलींत तरी काय उपयोग? तेवढ्यानें तुम्ही खरोखर सुधारलेले असें सिद्ध होणार नाहीं. आणि हीं युद्धें, या कत्तली कशासाठीं? देवाच्या वैभवासाठीं! राष्ट्राच्या गौरवासाठीं!

युद्धें अजिबात बंद करतां येत नाहींत म्हणून निदान त्यांना नियमित तरी करूं या, तशी खटपट करूं या, असें कांहीं म्हणतात. कांहींचे तसे प्रयत्न चालले असतात ही गोष्ट खरी आहे. परंतु तो प्रयत्न यशस्वी होणें शक्य नाहीं. दोन परस्परविरुद्ध अशा राष्ट्रांतील स्पर्धेचें व संघर्षाचें मूर्तरूप म्हणजे युद्ध. युद्ध म्हणजे मनांतील वैराचें बाह्य प्रतीक. या स्पर्धेचा शेवट, वैराचा निकाल शक्तीनें लावायचा असतो. एकदां बळाला कवटाळलेत, प्रतिस्पर्ध्याला चीत करण्यासाठीं शक्ति हाच उपाय असें एकदां ठरवलेंत, म्हणजे मग त्यांत वाईट-चांगलें काय ठरवणार? दोन्ही पाशवी शक्तीच. ही पाशवी शक्ति अधिक सुसंस्कृत, ती कमी सुसंस्कृत अशी निवडानिवड कशी करतां येईल? एकदां

शक्तीच्या जोरावर सारें करायचें ठरलें, म्हणजे असेल नसेल ती सारी शक्ति आपण संघटित करतों व प्रतिपक्ष्याला धुळींत मिळवूं बघतों. दंडा व खड्ग यांत तसें फारसें अंतर नाहीं. तोफा-बंदुकांची दारू व विषारी धूर यांत कांहीं विशेष फरक नाहीं. जोंपर्यंत प्रतिस्पर्ध्याला दडपून टाकण्याचें शस्त्र हें साधन म्हणून मानलें जात आहे, तोंपर्यंत प्रत्येक राष्ट्र आपापलीं हिंसामय शस्त्रास्त्रें अधिकाधिक वाढविणार. तीं शस्त्रें अधिक प्रभावी करण्याची खटपट करणार. युद्ध दुसरा कायदा ओळखीत नाहीं. युद्धमान राष्ट्रें एक युद्धाचा कायदा ओळखतात; युद्धांत विजयी होणें म्हणजेच परमोच्च सद्‌गुण मानतात. प्रत्येक राष्ट्राला अशा प्रकारें या भीषण व मरणाच्या रस्त्यावरून जाणें भाग पडतें. युद्ध ही वस्तु गर्ह्य नाहीं, फक्त तिची पद्धत सुधारली पाहिजे असें म्हणणें म्हणजे लांडगा कोंकराला खातो हें वाईट नाहीं, फक्त त्यानें नीट पद्धतशीर रीतीनें खावें असें म्हणण्याप्रमाणेंच आहे. युद्ध म्हणजे युद्ध. तो कांहीं खेळ नाहीं. खेळांत आपण नियमाप्रमाणें खेळतों. परंतु युद्धांत सारेंच क्षम्य ठरतें!

आंतरराष्ट्रीय वृत्ति वाढत आहे ही गोष्ट खरी. अर्थशास्त्रज्ञ सांगत आहेत कीं युद्धानें फायदा नाहीं. युद्ध म्हणजे शेवटीं आंतबट्ट्याचा व्यवहार. युद्धानें दिवाळें निघण्याचीच पाळी येते. कांहीं लोक धोरण म्हणून तरी शांतता-वादाचा पुरस्कार करूं लागले आहेत. तशी त्यांची प्रामाणिक निष्ठा असते असें नाहीं. आंतरराष्ट्रीय वृत्ति अद्याप खरी आंतरिक झाली नाहीं. ती ओठांवर आहे, पोटांत नाहीं. मागच्या महायुद्धांत प्रत्येक राष्ट्रांतील कांहीं मूठभर लोक आंतरराष्ट्रीय ध्येयाला चिकटून राहिले, त्या तत्त्वांना धैर्यानें त्यांनीं जवळ धरिलें. परंतु बाकीच्या बहुतेकांनीं राष्ट्राच्या स्थंडिलावर आंतरराष्ट्रीय धर्माचा बळीच दिला! मोठमोठे शांतिधर्मावर प्रवचनें देणारे धर्मोपदेशकहि शेवटीं दांभिकच ठरले. त्यांनीं ईश्वरासाठीं चर्चें व मंदिरें उभारलीं, परंतु ईश्वराच्या आदेशाचा तुच्छतेनें तिरस्कार केला. चर्चें रिक्रूटभरतीचीं स्थळें झालीं. जो तो आपणास जय मिळावा म्हणून ईश्वराची प्रार्थना करूं लागला. आपल्या बाजूला देव आहे असें सारे म्हणत. धर्मोपदेशक आपापल्या राष्ट्राच्या शिपायांना आशीर्वाद देत होते. विजयी व्हा म्हणत होते. ईश्वर गोंधळून गेला असेल बिचारा. जे. सी. स्क्वायर या कवीनें त्या वेळची स्थिति मोठ्या मार्मिकपणें वर्णिली आहे :

युद्धास गुंतले देश। चढला त्यांना रणावेश
त्यांच्या प्रार्थना जगदीश। ऐकता झाला ॥
देवा, इंग्लंड हें सांभाळीं। देवा, राजा आमुचा प्रतिपाळीं
देवाच्या कानींकपाळीं। नाना प्रार्थना आदळती ! ॥
देवा, तूं आमचा। देवा, तूं नाहीं त्यांचा
देवा हें करी, तें करी, ऐशी वाचा। सारीं राष्ट्रें गर्जती ॥
देव म्हणाला मनांत। 'देवाची नाहीं धडगत !
देवाचें कार्य मिळविती धुळींत। किमर्थ ओरडती कळेना' ॥

राष्ट्रसंघ वगैरे स्थापन झाले. सारें खरें. परंतु प्राणांशिवाय कुडी काय कामाची ? राष्ट्रसंघ म्हणजे सांगाडा आहे. त्यांत आत्मा नाहीं. खरी सद्भावना कोणाच्याच ठायीं नाहीं. राष्ट्रसंघांतलि घटक सदैव परस्परांविषयीं साशंकच असतात. अविश्वास व असादिच्छा यांचेंच प्राबल्य आहे. खरी आंतरराष्ट्रीय वृत्ति फारच थोड्या लोकांजवळ आहे. अद्याप सर्वसामान्य मानवी मनाची ती अभिजात वृत्ति झाली नाहीं. १९१४ च्या ऑगस्ट महिन्यांत आकाश काळेंकुट्ट होतें. महायुद्ध संपून तह झाले. तह होऊन दहा वर्षें होऊन गेलीं. परंतु आकाश निर्मळ झालें आहे का ? पूर्वींहून स्वच्छ झालें आहे का ? नाहीं, आकाशांत अद्याप अंधारच आहे. गेल्या महायुद्धाच्या आरंभीं जितकें सैन्य युरोपांत होतें, त्याच्यापेक्षां आज युरोपांत कितीतरी पटानें अधिक सैन्य आहे. आपण इतरांपेक्षां श्रेष्ठ, आपण जगाची पुनर्रचना व पुनर्घटना करणारे, आपण देवाचे प्रेषित, या भावना आजहि कोणी सोडिल्या आहेत असें नाहीं. अशा अहंकारांतूनच युद्धें जन्मतात. असले अहंकार आपल्या राष्ट्रांत नसावेत अशी नम्रता दाखवण्यास कोणीहि तयार नाहीं. प्रत्येक राष्ट्र म्हणत आहे कीं, आम्ही काय ते खरे. तो खरा देशभक्त जो फक्त स्वतःच्या देशापुरतेंच पाहील. थिऑडॉर रूझवेल्ट एकदां म्हणाला कीं, " पत्नीला द्यावयाच्या प्रेमांत पतीनें जर दुसऱ्या एखाद्या स्त्रिस भागीदार केलें तर तें जसें अश्लील व असभ्य आहे, त्याप्रमाणें नागरिकानें जें प्रेम संपूर्णपणें आपल्या देशालाच द्यावयाचें

त्यांत जर इतर राष्ट्रेंहि भागीदार केलीं तर तें अयोग्य व अधर्म्य होय." अशा प्रकारें स्वतःच्या राष्ट्रावर प्रेम म्हणजे दुसऱ्या राष्ट्रांचा द्वेष असें झालें आहे. राष्ट्राराष्ट्रांमधील हे द्वेष, राष्ट्राराष्ट्रांच्या परस्परांस मारक अशा महत्त्वाकांक्षा, यामुळें शांति दुरावली आहे. शांततेचा काळ म्हणणे तात्पुरती लढाई थांबल्याचा काळ. खरी शांति नाहींच. चाणक्यनीतीच सर्वत्र मानली जात आहे. कपटी कारस्थानें व डावपेंच म्हणजेच राजकारण झालें आहे. राष्ट्रें निःस्वार्थ बुद्धीनें सहकार्य करण्यास तहानलेलीं नसून स्वार्थांध होऊन दुसऱ्यांवर सत्ता गाजविण्यासाठीं अधीर झालीं आहेत.

★

# प्रश्न : : ३

तत्त्वज्ञान म्हणजे काय? व्यापक अर्थानें पाहिलें तर ज्या अमूर्त व अदृश्य पायावर संस्कृतीची इमारत उभी असते तो पाया म्हणजे तत्त्वज्ञान. तत्त्वज्ञान असा पाया देत असतें. तत्त्वज्ञान म्हणजे जणुं संस्कृतीचा आत्मा. हा आत्मा आपल्याभोंवतीं हळुहळूं संस्कृतीचें शरीर उभारतो. त्या त्या समाजांतील लोकांना त्या त्या समाजांत परंपरागत चालत आलेल्या रूढींवरून, निरनिराळ्या संस्थांवरून कोणत्या वस्तू महत्त्वाच्या मानावयाच्या, नैतिक मूल्यें म्हणजे काय तें सारें कळत असतें. जीवनाचा अर्थ काय, हेतु काय, हें आपण आपल्या समाजांतील रूढ व सर्वमान्य अशा आचाराविचारांवरून ठरवीत असतों, त्यावरून समजून घेत असतों. ज्या वेळेस एकाद्या संस्कृतीची आपण स्तुति करतों किंवा निंदा करतों, त्या वेळेस त्या त्या संस्कृतींत कोणत्या गोष्टींस किती किंमत दिली जाते हीच गोष्ट आपल्या डोळ्यांसमोर असते. मूल्यश्रेणींवरून त्या त्या संस्कृतीची परीक्षा घेतां येते.

'पिंडीं तें ब्रह्मांडीं' असें भारतीय ऋषी म्हणत. ग्रीक तत्त्वज्ञानीहि ही गोष्ट मानीत. मनुष्य म्हणजे एक लहानसें विश्वच होय. खनिज वस्तूप्रमाणें, जड धातू वगैरेप्रमाणें माणसाच्या देहाला मोजमाप आहे; वनस्पतींप्रमाणें या देहांतील रचना आहे; पशूप्रमाणें या देहाला हालचाल आहे व इंद्रियज्ञान आहे; आणि याशिवाय बुद्धि व आध्यात्मिक आकांक्षा आहे. मनुष्य म्हणजे शरीर, मन व आत्मा यांचा त्रिवेणीसंगम होय. आपलें हें बाह्य शरीर माकडाच्या

शरीरापेक्षां फारसें निराळें नाहीं. वनस्पती व प्राणी यांतूनच उत्क्रांत होत हें शरीर आलें असावें. वनस्पती व पशू हे आपले पूर्वज होत. आचार्य इलियट स्मिथ सांगतो कीं, चिंपँझी जातीच्या मनुष्यसदृश वानरजातींच्या मेंदूची रचना व माणसाच्या मेंदूची रचना सारखी आहे. आपल्या कांहीं वृत्तींवरून प्राण्यांशीं असलेलें आपलें नातें स्पष्ट होतें. उपजत आलस्यवृत्ति, एके ठिकाणीं राहण्याची इच्छा, त्या त्या स्थानाबद्दल, भूमीबद्दल वाटणारें प्रेम, क्रोध, भीति वगैरे दुर्दम्य विकार यांवरून ही गोष्ट सहज ध्यानांत येईल. त्याबरोबरच दुसऱ्याहि कांहीं गोष्टी आपणांत आहेत. अमूर्त व अदृश्य गोष्टींसाठीं उत्कट इच्छा, आध्यात्मिक वृत्ति, पशुत्वांतून वर जाऊन उच्चतर जीवन मिळविण्याची धडपड, या गोष्टीहि आपल्या जीवनांत आहेत. आपलीं वाङ्मयें, आपल्या कथा, आपलीं तत्त्वज्ञानें, आपले धर्म, या दुसऱ्या प्रकारच्या वृत्तींतून जन्मलीं आहेत. मानवी संस्कृति सारखी उत्क्रांत होत चालली आहे. मानवजात सारखी पुढें जात आहे. मानवजातीचा आपण सारा प्रवाह जर पाहूं तर आपणांस असें दिसून येईल, कीं मनुष्याची आध्यात्मिक भूक ही सदैव जागी आहे. उच्च जीवनाची तळमळ त्याची सारखी सुरू आहे. आदर्श जीवनाकडे तो डोळे लावून बघत आहे. ही त्याची आध्यात्मिक वृत्ति प्रथम ओबडधोबड स्वरूपांत प्रकट झालेली दिसेल; परंतु ओबडधोबड व भोळ्याभावड्या गोष्टी व कथा यांतून ही वृत्ति विकसित होत होत, शेवटीं उच्च तत्त्वज्ञानांत ती परिणत झाली. या स्थूल वृत्तींतूनच सूक्ष्म विचार करणारीं दर्शनें निर्माण झालीं. नीतिप्रधान अशा संस्कृती उत्पन्न झाल्या.

आपण बरेचसे जरी पशूंचे वारसदार असलों, पशुत्वाचा अंश जरी परंपरेनें आपणांत आला असला, तरी मनुष्यप्राणी हा इतर प्राण्यांपेक्षां मनुष्यप्राणी या दृष्टीनें सुद्धां निराळा आहे. मनुष्यप्राण्याचे गुण वा दुर्गुण हे मनुष्यांतच आढळतील. आपण विषयसुख हें जीवनाचें ध्येय केलें, तर आपण पशुत्वाकडे गेलों असें मानलें जातें. परंतु असा कोणता मानवेतर पशु आहे, कीं जो विषयसुख हें ध्येय ठरवून सारखा त्याच्या पाठोपाठ जातो? असें करणें हें या विशिष्ट मनुष्यप्राण्यालाच शक्य आहे. पुन्हां अशा कांहीं गोष्टी आहेत कीं ज्यांत पशू माणसापेक्षां अधिक नेटकेपणें वागतात. कांहीं गोष्टी पशूंत स्वाभाविक आहेत. माणसाला त्या हेतुपुरस्सर प्रयत्नानें व संयमानें अंगीं आणाव्या

लागतील. पशू केवळ प्रजोत्पत्तीसाठींच रमतील. या बाबतींत मागासलेले व रानटी म्हणून ज्यांना आपण समजतों तीं माणसेंहि पशूंप्रमाणेंच वागतात. परंतु मनुष्य जसजसा सुधारतो तसतशी त्याची विचारशक्ति वाढते. तो तुलना करूं लागतो. कुरूप-सुरूप पाहूं लागतो. आवड-नावड उत्पन्न होते. पसंती-नापसंती येते. यामुळें माणसांत अशी क्षमता येते कीं, तो जर मनांत आणील तर महात्मा होईल किंवा अधःपाताच्या खोल दरींतहि पडेल. जेव्हां आपण म्हणतों कीं, अमका अमका पशुत्वाच्या पायरीला गेला, त्या वेळेस आपण अलंकारिक बोलत असतों. त्या म्हणण्याचा अर्थ इतकाच असतो कीं, मनुष्यानें आपल्या स्वातंत्र्याचा नीट उपयोग केला नाहीं; मनुष्य व पशु या दोघांना समान असणाऱ्या ज्या गरजा, त्यांच्या बाबतींत कितपत आसक्ति धरायची तें त्याला नीट समजलें नाहीं; त्या गरजा तृप्त करून घेतांना मनाला कितपत मोकळें सोडायचें त्याचें तारतम्य त्याला साधलें नाहीं.

मनुष्यांतील पशुता स्वतःच्या तृप्तीसाठीं सदैव तडफडत असते. आपल्यांतील सर्वच वासना-विकारांची जर नीट तृप्ति झाली, तर आपल्यांतील पशुतेचा पूर्ण विकास झाला असें समजतां येईल. हें शरीर म्हणजेच आत्मा, व या देहाचें कोडकौतुक म्हणजेच जीवितकार्य, असें जर आपण मानलें तर आपण रानटी आहोंत असें मानण्यांत येतें. पाशवी शक्ति पूजिणें, इंद्रियांच्या तृप्तीलाच ध्येय मानणें, हें मनुष्याला शोभत नाहीं असें म्हणतात. आपण जर केवळ शरीरा-कडेच लक्ष देऊं, शरीरच पुष्ट व तुष्ट करीत बसूं, तर आपल्या आत्म्याची शक्ति क्षीण होईल. आपल्या उच्च व उदार स्वभावाचा नाश होईल. त्या ज्या आध्यात्मिक भुका आहेत त्यांचे हक्क आपण हिरावून घेतले असें होईल. केवळ शारीरिक बळाची पूजा करणें, त्या बळाचीच प्रतिष्ठा मानणें हें रानटीपणाचें चिन्ह आहे. मागासलेल्या रानटी समाजांत पुरुष स्त्रियांची पै किंमत करतो व त्यांचा भोक्ता बनतो. कारण स्त्रिया दुबळ्या असतात. आणि स्त्रियाहि जे पराक्रम करतात, शौर्य गाजवतात, शक्तिमान् असतात त्यांच्यावर अनुरक्त होतात; त्यांच्या गळ्यांत पडतात.

जो समाज केवळ शरीराकडे न बघतां, केवळ जगण्याकडे न बघतां मनाला महत्त्व देतो, तो समाज अधिक सुसंस्कृत होय. परंतु मन शब्द फार व्यापक अर्थानें मात्र घेतलेला असला पाहिजे. नैतिक परिपूर्णता, कलात्मक विकास या

सर्व गोष्टी मन या शब्दांत अंतर्भूत असल्या पाहिजेत. मन म्हणजे आत्माच म्हणाना. म्हणजे जोंपर्यंत आत्म्याला महत्त्व नाहीं, तोंपर्यंत संस्कृतीच्या खऱ्या ध्येयाप्रत आपण पोंचलों असें म्हणतां यावयाचें नाहीं. आपलें ज्ञान वाढलें असेल, परंतु जोंपर्यंत त्या ज्ञानाचा उपयोग केवळ शारीरिक सुखासाठीं होत आहे, जगण्यापलीकडे कांहीं आहे असें जोंपर्यंत वाटत नाहीं, जगणें हेंच त्या ज्ञानाचें इतिकर्तव्य, तोंपर्यंत संस्कृतीचा गाभा सांपडला आहे असें म्हणतां येणार नाहीं. आपल्या गरजा नेहमीं वाढत असतात. त्या गरजा तृप्त करणें, त्या गरजा तृप्त करून घेण्याचीं साधनें जमविणें, मालमत्तेचें धनी होणें हेंच शेवटीं आपलें जीवितकर्तव्य होत असतें. आपलें आंतरिक वैचारिक जीवन फारच कम-दर्जाचें असतें. महान् सारस्वतांत आपण डुंबणार नाहीं. परमोच्च कलेंत रमणार नाहीं. भावनांना क्षणभर उन्माद आणणाऱ्या गोष्टी आपणांस गुदगुल्या करतात. बुद्धीला क्षणभर उत्तेजित करणाऱ्या गोष्टी आपणांस गुंगवतात. थोडा वेळ मन जरा नाचतें, थोडा वेळ आपण सौंदर्यसाधक गोष्टींत दंग होतों. असा हा सारा क्षणिक व तात्पुरता रस चाखण्यांत आपण धन्यता मानतों. हें उच्च जीवन नसून क्षुद्र जीवन आहे. कृत्रिम संविधानकें असलेल्या कथा, गुप्त-पोलिसांचीं गूढें, शब्दांचीं कोडीं या आपल्या बौद्धिक करमणुकी होऊन बसतात. या क्षुद्र वस्तू आपणांस मोह पाडतात. याहून अधिक थोर आनंद चाखण्याची पात्रताच जणुं आपणांत नसते, क्षमताच जणुं नसते. उंच उड्डाण करण्याची शक्ति जणुं नष्ट झालेली असते. चिखलांतच मग बुड्या मारायच्या व क्षणभर जरा वर उडी बेडकाप्रमाणें मारायची! या अवस्थेंतील मनुष्य कधीं स्वतः विचार करीत नाहीं. जसे इतर वागतात तसा तो वागतो. जी एक चाकोरी पडलेली असते, तींतून तोहि जातो. स्वतःच्या बुद्धीचा उपयोग तो करीत नाहीं. त्याचें जीवन डोळस नसतें. तें आंधळें मेंगरूळपणाचें असतें. त्याची नैतिक दृष्टि स्थूल, वरवरची असते. त्याच्याजवळ विवेक व विचार नसतो. शास्त्रपूत अशी दृष्टि नसते. कांहीं आवडीनावडी, कांहीं पूर्वग्रह, कांहीं वास्तव कल्पना, हीच त्याची वैचारिक व नैतिक पुंजी. रूढीप्रमाणें तो आपल्या जीवनाला आकार देतो. बरें दिसतें, बरें वाटतें, हेंच एक वर्तनाचें प्रमाण. शिक्षणाची किंमत जर तें आजकालच्या स्पर्धेंत यशस्वी होण्यास मदत करणार असेल तरच असते. शास्त्राला किंमत कां? तर तें उपयोगी पडतें म्हणून, नाना

सुखसोयी देतें म्हणून, संघटितपणा वाढून यंत्रें उभारून उत्पादन झपाट्यानें करतां येतें म्हणून. परंतु बाह्य संचयानें आंतरिक सुसंस्कृतता वाढली आहे असें मात्र होत नाहीं. यंत्रें आलीं परंतु युद्धें आहेतच. फरक इतकाच कीं पूर्वीं हातघाईचीं युद्धें होत, आतां यांत्रिक युद्धें होतात. मनुष्याची विनाशक शक्ति आज सहस्रपटीनें वाढली आहे. आणि जोंपर्यंत आपण आपल्या लोभास मर्यादा घालीत नाहीं तोंपर्यंत संहार होणार; या वाढत्या विध्वंसक शक्तीनें पूर्वींपेक्षां अनंतपटीनें होणार. आपण सारे रूढींचें दास बनल्यामुळें आपलीं मतें गुलामी वृत्तीचीं झालीं आहेत. स्वतंत्र विचार व्यक्ति करीतच नाहीं. आपली संस्कृति सर्वांत श्रेष्ठ, आपली राज्यशासनपद्धतीच काय ती चांगली असें कांहीं म्हणूं लागतांच, प्रत्येक व्यक्ति तेंच बोलते व तदर्थ युद्धासहि सिद्ध होते. जीवनशास्त्रांतील आजचें महान् सूत्र म्हणजे 'शक्तिर्देवो भव.' पाशवी शक्तीवर श्रद्धा, तिच्यावर सारा भर! एका धर्मानें अन्य धर्मांचा छळ करावा, यांत दुसरें काय दिसतें? अशा या समाजांतूनहि क्वचित् कोणी उदारात्मे निघतात. अरे, सारी वसुधाच कुटुंब माना, मानवजात एक माना, असें ते प्रतिपादितात. सर्वांचें हितकल्याण पाहावें असें ते सांगूं लागतात. लोकांचीं मनें वळवावीं, सोट्यानें नव्हे तर त्यांना पटवून, असें ते बोलतात. एकाच प्रेममय परमेश्वराचीं आपण लेंकरें, मग आपण सर्वांनीं प्रेमानें एकत्र कां नांदूं नये, असें ते विचारतात. परंतु अशा उदार विचारांच्या लोकांना नास्तिक व देशद्रोही ठरविण्यांत येतें. त्यांच्यांतील भित्रे असतात, त्यांना गप्प बसविण्यांत येतें. जे निर्भय असतात त्यांना गोळ्या घालण्यांत येतात! समाजाच्या या स्थितीला आर्थिक किंवा बौद्धिक रानटीपणा हें नांव शोभेल. कारण अशा या समाजांत सुखविलास म्हणजेच संस्कृति समजली जाते, रूढि म्हणजेच नीति मानली जाते. धर्म म्हणजे जुन्या चाकोरींतून जाणें व राजकारण म्हणजे जगाच्या बाजारपेठा काबीज करणें व दुसऱ्यांस गुलाम करून त्यांची पिळवणूक करणें अशा त्यांच्या व्याख्या असतात.

जो समाज केवळ शरीराचा उपासक आहे, जगणें हेंच ज्याचें ध्येय, आर्थिक व शारीरिक सुस्थिति यापलीकडे ज्याला कांहीं दिसत नाहीं, शास्त्रांच्या संशोधनानें यांत्रिक क्षमता मिळविणें व पैदास वाढविणें हाच ज्याचा धर्म, तो समाज खऱ्या अर्थानें सुधारला व सुसंस्कृत झाला असें कसें म्हणावें? जेथें

उदार ध्येयांना वाव नाहीं, उच्चतर अशा अखिल मानवजातीला कवटाळणाऱ्या विचारांना अवसर नाहीं, आत्म्याचे पंख जेथें छाटलेले आहेत, उच्च मतांचा जेथें कोंडमारा आहे, तो समाज का सुसंस्कृत? शरीर, मन व आत्मा या तीन वस्तू पृथक् असल्या तरी त्या अलग करतां येणार नाहींत. या तिहीं मिळून एक अविभाज्य अशी वस्तु बनलेली आहे. या तिहींचा नीट विकास म्हणजेच खरी संस्कृति. मानवी स्वभाव सर्वत्र सारखाच आहे. शरीर, मन व बुद्धि यांच्यांत विरोध आला तर तो मिटविणें हेंच महत्त्वाचें काम आहे. या तिहींतील विरोध पाहून वाईट वाटून घेण्याची जरुरी नाहीं. त्या तिहींतील कुरबुरी मोडून टाका. निर्दोष मनुष्यत्वासाठीं सुंदर शरीर आधीं हवें. शरीर निरोगी हवें, धडधाकट हवें. तसेंच सुखासमाधानाचा संसार चालवण्यासाठीं काहीं सामाजिक व आर्थिक संघटनाहि हवी. परंतु एवढ्यानेंच सारें संपलें असें नाहीं. केवळ आपल्यांतील पशुत्वाचा पूर्ण विकास केल्यानें परिपूर्ण मानवता झाली असें नाहीं. सत्य, शिव व सुंदर यांची पूजा करूं पाहणाऱ्या मानवी प्राण्यांना निर्मिण्यासाठीं सृष्टीनें कितीतरी दुःख सहन केलें आहे; असा मनुष्यप्राणी जन्मावा म्हणून विश्वांत किती प्रयत्न झाले, धडपडी झाल्या. अर्धवट सुधारलेले व संपूर्णपणें सुधारलेले यांच्यांत कोणता बरें फरक असतो? जो स्वतः-चेंच फक्त पाहतो, स्वतःच्याच वैयक्तिक, क्षुद्र व संकुचित वर्तुळांत रमतो, मीच काय तो खरा, मी कसा जगूं, माझें समाधान, या मी मी पलीकडे ज्याच्या विचारांची मजल जात नाहीं तो अर्धवट सुधारलेला. आणि जो स्वतःला शून्य करून सर्वभूतहितांत रमतो तो संपूर्णपणें सुधारलेला. व्यक्तीनें विश्वात्मक दृष्टीचें होणें, आपलें दैनंदिन जगणेंहि चिरशाश्वत सत्याशीं जोडणें आणि अशा प्रकारें खरोखर मानव होणें म्हणजे संस्कृति. असें वाढत जाणें सोपें नाहीं. त्यासाठीं महान् त्याग लागतो. खूप किंमत द्यावी लागते. परंतु एकदां का ही दृष्टि आली, एकदां कां आपली सारी वृत्ति सर्वांचा विचार करणारी झाली, एकदां का हें आपलें व्यक्तित्व विश्वाच्या ध्येयाशीं समरस करण्याचें जमलें तर मग पुढें सारें सोपें जातें. एक विशिष्ट दिशा देण्याचेंच अवघड असतें. एकदां ती दिशा लागली म्हणजे मग जोखड जड वाटत नाहीं, भार कठिण होत नाहीं. आपण सारें ओझें सहज ओढीत नेतों. अशी दृष्टि आली म्हणजे मानवी जीवन निराळें होईल. आज आहे त्यापेक्षां निराळी विचारसरणी, निराळी वृत्ति

दिसूं लागेल. पशूचें जीवन व पाशवी वृत्ति जाऊन मानवी जीवन व मानवी मन यांचा साक्षात्कार होऊं [1] लागेल.

मानवी समाजाचा इतिहास पाहिला तर अमुक एका काळीं संपूर्णपणें रानवटपणा होता किंवा अमुक एका काळीं केवळ रामराज्य होतें असें दिसून येत नाहीं. कोणताहि समाज केवळ जंगली किंवा केवळ निर्दोष असा आढळून येणार नाहीं. कोणत्याहि काळांतील व कुठलाहि मानवसमाज घ्या. त्यांनीं आपल्या विशिष्ट स्वभावाचा विकास केला, धार्मिक आचारविचार निर्माण केले, सामाजिक नियमनें निर्मिलीं. सत् व असत् यांच्यांतील फरक ज्यांना कळला नाहीं, नीति व कला यांची तोंडओळखहि ज्यांना कधीं झाली नाहीं, असे लोक कोठेंहि तुम्हांला सांपडणार नाहींत. रानटीपणा जितका प्राचीन आहे तितकाच सुसंस्कृतपणाहि प्राचीन आहे. एस्किमो, रेड इंडियन, बसूटो किंवा फिजी बेटांतील लोक यांना आपण रानटी समजतों. कारण एवढेंच कीं, सुधारलेल्या समाजाची आपली जी कल्पना ती अद्याप त्यांच्यांत आली नाहीं. शाळा, दवाखाने, न्यायमंदिरें, पोलिसचौक्या वगैरे सुधारणेच्या खुणा त्यांच्यांत दिसून येत नाहींत. परंतु या संस्था नसल्या तरी त्यांच्याहि जीवनांत स्वतंत्र विशिष्टत्व दिसून येतें. पुढारलेल्या ग्रीक व रोमन लोकांत किंवा आजच्या इंग्रज व जर्मन लोकांत ज्याप्रमाणें त्यांचें वैशिष्टय प्रकट होतें, त्यांच्या विशिष्ट चालीरिती, विशिष्ट कल्पना दिसून येतात. त्याचप्रमाणें ज्यांना आपण रानटी म्हणतों त्यांच्यांतहि दिसून येतात. सामाजिक व्यवस्था निराळ्या स्वरूपाची असली, सृष्टीचें ज्ञान जरा कमी असलें, हत्यारें व अवजारें प्राथमिक अवस्थेंतील असलीं, एवढ्यावरून एकाद्या समाजाला रानटी म्हणणें बरोबर नाहीं. आजकाल राजकीय दृष्ट्या मागासलेल्या राष्ट्रांनाहि अर्धवट सुधारलेलीं, अर्धवट रानटी असें म्हणण्याची प्रथा पडली आहे. जणुं राजकीय वर्चस्व हीच सुधारणेची कसोटी! आर्थिक प्रगति, दुसऱ्याची पिळणूक व मानवांचा संहार करण्यांतील-अभिज्ञता म्हणजेच संस्कृतीचा आत्मा! जपाननें रशियाचा पराजय

१ हिंदूंची परिभाषा वापरायची झाली तर असें म्हणतां येईल, कीं केवळ पाशवी शक्तीची पूजा करणारा समाज हा तमोगुणी समाज. स्वतःचीं इंद्रियसुखें तृप्त करूं पाहणारा व तदर्थ धडपडणारा हा राजस समाज आणि आत्मिक स्वातंत्र्य व आत्मविकास यांचें ध्येय ठेवून जाणारा तो सात्त्विक समाज.

करतांच त्याला एकदम सुसंस्कृत पदवी मिळाली! परंतु हीच कसोटी लावावयाची असें ठरलें, तर ज्या तातेरांनीं चीनचा पराजय केला व शुंग घराणें उधळून लावलें तें तातेर चिनी लोकांपेक्षां अधिक सुधारलेले होतें असें मानावें लागेल! आणि ज्या रानटी टोळ्यांनीं रोमन साम्राज्य खिळखिळें केलें त्यांना सुसंस्कृत मानवजातीचे आदर्श म्हणून वंदावें लागेल!

अत्यंत प्राचीन जातीजमातींताहि संस्कृतीचे स्थूल का होईनात आरंभ दिसून येतात, तर आजच्या सुधारलेल्या समाजांतूनहि पुष्कळसा जंगलीपणा दिसून येतो. पूर्वींच्या हूण, गॉथ, व्हॅन्डाल, तुर्क वगैरे लोकांना आपण रानटी मानतों. परंतु अधिक सुसंस्कृत अशी भावी काळांतील एकादी पिढी आजच्या विसाव्या शतकांतील आपल्या संस्कृतीलाहि रानटी मानणार नाहीं असें नाहीं. ही आपली संस्कृति त्यांना राक्षसी, भ्रामक कल्पना उराशीं घेऊन बसणारी अशी वाटेल. त्यांना या आपल्या संस्कृतीचा वीट येईल व अशी कशी ती संस्कृति असें आश्चर्यानें व तिरस्कारानें ते म्हणतील. आपण प्राचीन रोमन लोकांतील परस्परांस ठार मारूं पाहणारे ते खेळ रानटी समजतों. तद्वतच आपल्या आजच्या साठमाऱ्या, मस्तावलेल्या प्राण्यांच्या झुंजी, मुष्टियुद्धाच्या शर्यती वगैरे ज्या आपल्या आनंदाच्या व करमणुकीच्या गोष्टी, त्या पुढील काळांतील पिढ्यांस रानटीपणाच्या वाटतील; आणि आपण ज्याला युद्ध म्हणतों त्यांतील सुसंस्कृत खाटिकपणासंबंधीं तर बोलायलाच नको!

संस्कृति व सुधारणा हीं बाहेर नसून आपल्या अंतरंगांत आहेत. तुमच्या नैतिक कल्पनांत, तुमच्या धार्मिक विचारांत, समाजाकडे पाहण्याच्या तुमच्या दृष्टिकोनांत संस्कृति भरलेली असते. आगबोटी आहेत व आगगाड्या आहेत, टंकलेखक आहेत व टेलिफोन आहेत, एवढ्यावरून आपण सुधारलों असें म्हणतां येणार नाहीं. माकड दुचाकीवर बसायला शिकलें, दारूचा पेला तोंडाला लावूं लागलें, चिरूट ऐटीनें ओढण्यांत तरबेज झालें, तरी शेवटीं तें माकडच! यांत्रिक सुधारणा म्हणजे कांहीं नैतिक सुधारणा नव्हे. बडा कारखाना चालवतां आला एवढ्यावरून मनहि मोठें झालें, असें नाहीं म्हणतां येणार. आजच्या काळापेक्षां प्राचीन भारतवर्षांतील व ग्रीस देशांतील किंवा मध्ययुगीन इटलींतील भौतिक शास्त्रांचें ज्ञान जरी कमी असलें, किंवा यांत्रिक उद्योगधंदे त्या वेळीं त्या देशांतून आजच्या एवढे अवाढव्य नसले, तरी त्या लोकांना

आध्यात्मिक मूल्यांची अधिक यथार्थ कल्पना होती, जीवनाची कला आपल्यापेक्षां त्यांना अधिक सत्यतेनें कळली होती यांत शंका नाहीं. नवीन नवीन वस्तूंसाठीं पिसाटाप्रमाणें धडपड करणें, पैशासाठीं प्राणघेणी स्पर्धा करीत राहणें म्हणजे जर संस्कृति नसेल, तर आपणांस प्राचीन ग्रीक लोकांपासून किंवा हिंदी नि चिनी लोकांपासून जीवनाच्या कलेंत किती तरी कल्याणकारक गोष्टी शिकतां येतील. चीन, हिंदुस्थान किंवा ग्रीस यांच्यामध्यें दोष नव्हते असें नाहीं. ग्रीस देशांतील नागरिक सुसंस्कृत होते, कलावान् व ज्ञानवान् होते. परंतु स्वतःचा हा विकास करून घेण्यास त्यांना कोणी दिली फुरसत? त्यांच्या देशांतील गुलामांनीं! जीवनाला आवश्यक असणाऱ्या शेंकडों गोष्टी निर्मिण्यासाठीं जे अहोरात्र राबत व कष्टत त्यांना नागरिकत्वाचे हक्क या ज्ञानकलासंपन्न होणाऱ्या ग्रीकांनीं दिले नाहींत. श्रमणाऱ्या लोकांच्या गुलामगिरीवर ग्रीकांची संस्कृति उभी होती. भारतीय संस्कृति जरी सर्वांचा संग्रह करीत होती, त्या त्या लोकांच्या स्थानिक आचाराविचारांना सहानुभूतीनें वागवीत होती, नाना जातीजमातींना एकत्र आणून जरी तिनें एकत्व निर्मिलें, तरी तिच्यांत एक महान् दोष दिसून येतो. ज्ञानाचा दिवा तिनें सर्वत्र नेला नाहीं. शूद्रांना ज्ञानाचा अधिकार दिला नाहीं. मागासलेल्या लोकांना तसेंच अज्ञानांत ठेवण्यांत आलें. भारतीय संस्कृतींतील महान् ध्येयें कितीहि सुंदर व उदात्त असलीं तरी तीं समाजाच्या खालच्या थरापर्यंत गेलीं नाहींत. आणि पुढें पुढें तर अनियंत्रित राज्यसत्ता तेथें स्थापन झाल्यापासून तीं महान् ध्येयेंहि दूरच राहिलीं. हुकूमशहांच्या कारकीर्दींतून मानव्याचा मोकळेपणें विकास होणें बंदच झालें.

आजची संस्कृति म्हणजे आर्थिक क्षेत्रांतील जंगलीपणा. आजची संस्कृति सत्ता व संपत्ति मानते; आत्मा व आध्यात्मिक पूर्णता यांना झुगारते. जगाचा आदि काय व अंत काय हें आपणांस कळणें शक्य नाहीं. "कस्त्वं? कुत आयातः?" हे प्रश्न कधींहि सुटावयाचे नाहींत. म्हणून आपल्या सभोंवतीं काय आहे तेवढेंच पहावें, हातीं घेतलेलें काम नीट करावें, आपला उद्योगधंदा पहावा, व्यवहार सांभाळावा; जीवनाचें बाह्य स्वरूप नीटनेटकें करण्यासाठीं अशी अहोरात्र धडपड चालली आहे. बाहेरून रंगरंगोटी चालली आहे. सृष्टिसत्तेवर ताबा मिळवावा, जगाची औद्योगिक पाहणी करावी, संसार सुधारावा,

मनुष्याचें जीवन अधिक सुखी करण्यासाठीं नैसर्गिक शक्तींवर विजय मिळवावा; या भौतिक जगावर, या बाह्यजीवनावर आपल्या मनानें आज सत्ता मिळविली आहे. मानवी बुद्धि सृष्टीची राणी होत आहे. परंतु शरीर, संसार व मनोबुद्धि यांच्यावर आत्म्याचें प्रभुत्व अद्याप स्थापन झालें नाहीं. जीवनावर व शरीरावर ताबा ठेवतां येईल, कारण त्यांचीं तंत्रें आपणांस कळलीं आहेत. त्यांच्या शक्या-शक्यता समजल्या आहेत. शास्त्रांच्या प्रगतीचे विजयध्वज नाचूं लागतांच तत्त्वज्ञान कोंपऱ्यांत सारलें गेलें, विचाराचा उपहास होऊं लागला व धर्माला फांशी देण्यांत आलें! आपण आपल्या पूर्वजांपेक्षां अधिक शास्त्रसंपन्न असूं; त्यांच्यापेक्षां थोड्याफार गोष्टी आपणांस अधिक माहीत असतील; परंतु तेवढ्या-नें पूर्वजांपेक्षां आपण अधिक माणुसकी असलेले, कमी पशुत्व असलेले आहोंत असें म्हणतां येणार नाहीं. शिक्षणानें आज बुद्धीचीं बंधनें गळलीं असें नाहीं. शिक्षण आज चेतवितें परंतु शांतवीत नाहीं. आपण काव्य वाचतों; कादं-बऱ्यांवर आपल्या उड्या पडतात; बोलपटांना आपण सदैव उपस्थित असतों. आणि हें सारें केल्यामुळें आपणांस वाटतें कीं, आपण सुधारलेलें आहोंत! आपण सारे स्वतःला आज बुद्धिप्रामाण्यवादी समजत असतों. परंतु हा दंभ आहे. आपल्या वासना-विकारांना पाठिंबा देण्यापुरती आपली बुद्धि उभी राहत असते. आपणांस जें करावेसें वाटतें त्याच्यासाठीं आपली बुद्धि पळवाटा शोधते. आपणांस जें मत मानवतें त्याच्या समर्थनार्थ आपली बुद्धि कारणें शोधून काढते. आपण "भलें करीत कोठें तरी जात आहोंत" असें आपणांस वाटत असतें. परंतु वास्तविक "भलें करणें" दूर राहून, आपण "कोठें तरी जात असतों" एवढेंच काय तें खरें! आपण केवळ बहिर्दृष्टि झालों आहोंत. वरवर पाहणारे झालों आहोंत. मानवजातीच्या ध्येयांविषयीं तोंड भरून बोलतों. ठराविक वचनें व म्हणी ओठांवर खेळवितों. परंतु त्या ध्येयांविषयीं ना प्रेम, ना जिव्हाळा! तीं ध्येयें जीवनांत आणण्यासाठीं ना त्याग, ना तप! संयमाचें नांवहि आपणांस माहीत नाहीं. अर्वाचीनांत व प्राचीनांत फारसा फरक नाहीं. अर्धवट, लहरी, कशावर तरी भरंवसा व विश्वास ठेवणारे, असेच आपणहि आहोंत. कधीं कधीं आपण परमोच्च वीरता प्रकटवितों, तर पुष्कळ वेळां क्रूरतेची कमालहि करतों. हा अर्वाचीन मनुष्य इतकी अमानुषता, इतकी निर्दयता दाखवितो तरी कशी असें मनांत येतें. मनुष्य अद्याप रानटी पशूच आहे. तो

एकदम अंगावर येतो, गुरगुरतो. मनुष्य अद्याप फारसा माणसाळलेला नाहीं. आर्थिक यशस्विता हें आपलें परमोच्च ध्येय! आपल्या बहुतेक युद्धाचीं कारणें आर्थिक असतात. अर्थशास्त्र म्हणजे धर्म. साम्राज्य म्हणजे बडा धंदा. व्यापार वाढण्यासाठीं, प्रदेश जिंकण्यासाठीं, वसाहती मिळविण्यासाठीं आपण लढतों. व्यापारधंदे वाढावे, जगाच्या बाजारपेठा हातीं याव्यात, यासाठींच बौद्धिक स्वातंत्र्यहि हिरावण्यांत आलें. जर लोक स्वतंत्रपणें विचार करतील तर या युद्धांविषयीं त्यांना संशय येईल. मागासलेल्या देशांविषयीं व कामगारांविषयीं त्यांची सहानुभूति वाढेल. अशी सहानुभूति वाढूं लागली तर पिळवणुकीचें यंत्र निष्ठुरपणें व निःशंकपणें कसें चालवतां येणार? रक्तशोषणाच्या कामांत हात कदाचित् थोडा ढिला पडायचा! आपली संस्कृति विजिगीषु आहे. व्यक्ती व वंश यांच्या स्पर्धांवर, युद्धाच्या गौरवावर, विजयप्राप्तीच्या आनंदावर ती उभारलेली आहे. आजच्या संस्कृतींत साहस आहे, वेग आहे; प्रक्षोभ आहे, उन्माद आहे; धांवपळ आहे, गोंधळ आहे. तींत ना शांति, ना विश्रांति. सारखी धडपड व धडपड. कधींहि तृप्त न होणारी अशी वासना आजच्या संस्कृतीनें उराशीं बाळगिली आहे. आणि अतृप्त राहणें हेंच त्या वासनेच्या नशिबीं आहे.

यंत्राचे गुणधर्मच आजच्या संस्कृतीचेहि झाले आहेत. आपले सद्गुणहि यांत्रिक झाले आहेत. वेग, संख्या, सारखेपणा, बाह्य वस्तूंत रंगणें हेच आजचे गुण. याचा परिणाम असा झाला कीं, आंतरिक जिव्हाळा नाहींसा झाला. आध्यात्मिक ओलावा सुकून गेला. ती जी आंतरिक एकता व एकसूत्रता ती आज नष्ट झाली आहे. एक प्रकारचें मानसिक अराजक निर्माण झालें आहे. मनोराज्यांत कोणी स्वामीच नाहीं. तेथें ना ताळ, ना तंत्र. स्वातंत्र्य व सौंदर्य, प्रेम व सद्गुण अशांनीं नटलेलें जें सुंदर मानवी जीवन, तेंच आम्हीहि मानतों, असें अज्ञपणें केवळ शारीरिक जीवनांत रंगलेले, शरीराच्या गरजा व वासनाविकार यांच्या तृप्तींत गुंतलेले, क्षुद्र मनोवृत्तीचें, विषयभोगाचें जीवन जगण्यांत पुरुषार्थ मानणारे, केवळ उपयुक्ततावादाचा व्यवहारधर्म मानणारे असे जे लोक, ते म्हणत असतात. आजच्या सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जीवनांत अति स्थूल, अत्यंत असंस्कृत, सदभिरुचीस न शोभणारा असा रानटीपणा आढळून येतो. शरीरापलीकडे जणुं कांहीं नाहींच. पंचविषय म्हणजेच परब्रह्म.

शारीरिक सुखोपभोगांविषयीं आज निराळीच एक भावना उत्पन्न झाली आहे. "निष्पाप विषयभोग", "दैवी आग", "तें खोल आंतरिक मंदिर", "उदात्त रानटीपणा", "मूळ प्रकृतीचा आवाज" असे शब्दप्रयोग रूढ होत आहेत. जी जी वृत्ति उठेल ती ती पवित्र मानली जात आहे. अविवेकाला पावित्र्याचें स्वरूप दिलें जात आहे.

जगाच्या इतिहासांत केवळ आंधळेपणा नाहीं. ऐतिहासिक तर्कशास्त्र म्हणून कांहीं वस्तु आहे. लॉर्ड ॲक्टन बजावतात, "केवळ अर्वाचीन चारशें वर्षांच्या पायावर तुम्हांला तत्त्वज्ञान उभारतां येणार नाहीं. पूर्वींचीं तीन हजार वर्षें वगळून चालणार नाहीं." गत संस्कृतीचे उदयास्त जर आपण परीक्षूं तर आपणांस असें दिसून येईल कीं, ज्या ज्या संस्कृतींनीं राजकारण, देशाभिमान, परस्परांचें उच्चाटन, यांवर सारा भर दिला, त्या त्या संस्कृती अंतर्गत वा बाह्य कारणांनीं नष्ट झाल्या. पाषाणयुगांतून युरोपनें वर डोकेंहि काढलें नव्हतें तेंव्हां मिसर, बाबिलोन, असीरिया, क्रीट, खाल्डिआ वगैरे किती तरी पुढें गेलेलीं होतीं. शंभर वर्षें म्हणजे एक मिनिट असें ठरवून गेल्या सहा हजार वर्षांचा इतिहास घड्याळावर जर आपण मांडला तर कसें बरें चित्र दिसेल? डॉ. अलेक्झांडर आयर्व्हिन यांनीं मोठ्या गमतीनें परंतु परिणामकारक रीतीनें तें दाखविलें आहे. दोन्ही कांटे बारावर आहेत असें समजूं या व सहा हजार वर्षांपासूनचा इतिहास सुरू झाला असें मानूं. आतां पहा हं. ईजिप्त व बाबिलोन कांटे बारावर असतां उभीं असतात. बारा वाजून पांच मिनिटें होतांच क्रीट पुढें येतें. बारा वाजून दहा मिनिटें झालीं व असीरिया चमकला. सव्वाबारा वाजतां खाल्डिआ खडा राहतो. बारा वाजून वीस मिनिटें झालीं असतां हिंदुस्थान, चीन व मीडिया येऊन उभीं राहतात. (डॉक्टर अलेक्झांडर आयर्व्हिननें अर्थात् हिंदुस्थान व चीन यांच्या संस्कृतींच्या प्राचीनत्वाविषयीं जें पाश्चिमात्य मत आहे तें येथें घेतलें आहे.) बारा वाजून पंचवीस मिनिटें झालीं, पर्शिया पुढें येतो. साडेबारा वाजतां ग्रीसचा गौरव. बारा पसतीस झाले, तो पहा अलेक्झांडर नकाशावरील कांहीं साम्राज्यें पुसून टाकीत आहे. आणि बारा वाजून चाळीस मिनिटें होतांच रोम राज्य करूं लागलें. पाऊण वाजतां अर्वाचीन युरोपियन राष्ट्रांचा उदयकाळ दिसूं लागतो. पुढें दहा मिनिटें तर सारी घाईच आहे. एक राज्य जातें, दुसरें येतें. एक साम्राज्य संपतें, दुसरें

जन्मतें. अशा गोष्टी प्रत्येक मिनिटाला होतांना दिसतात. आणि एकाला थोडेसे सेकंद असतांना १९१४ मधील महायुद्धाची तोफ वाजते! हें असें सहा हजार वर्षांचें चित्र आहे.

आशियांतील संस्कृती टिकल्या यावरूनच मानवी व आध्यात्मिक मूल्यें जीवनदायी आहेत ही गोष्ट स्पष्टपणें दिसून येते. आशियांतहि युद्धें होतीं, युद्धप्रिय राजे-महाराजे होते. परंतु युरोपियन राष्ट्रांत युद्धांतील साहसांबद्दल व पराक्रमांबद्दल जी एक गौरवाची भावना आजहि दिसून येते, तशी इकडच्या लोकांत फारशी नव्हती. युरोपनें युद्धाभोंवतीं तेजोवलय निर्मिलें आहे. तसें आशियानें कधीं केलें नाहीं. असीरियानें लष्करी सत्तेच्या जोरावर सारें जग जिंकण्याचें ठरविलें. आणखी पुढें, आणखी पुढें, अशा महत्त्वाकांक्षेनें असीरिया बेहोष झाला. आणि शेवटीं त्याचा चुराडा उडाला. अतीमुळें माती झाली. प्राचीन ग्रीक लोकांना तर युद्धाचा कायमचाच जीर्णज्वर जडला होता. आणि त्यानेंच ग्रीस मेला. रोमनें सर्व ज्ञात जग जिंकलें. पूर्वेकडून व पश्चिमेकडून रोमला अप्रतिहत खंडणी मिळत होती. रोमनें सारें जग मिळविलें, परंतु रोमनें आत्मा मात्र गमावला! ऐषआरामांत रोम लोळूं लागलें. वैवाहिक नीति भ्रष्ट झाली. रोमचा अधःपात म्हणजे वैषयिक पराकाष्ठा. एका पुरुषानें तेविसावी बायको मिळविली, तर एका स्त्रीनें एकविसावा पति मिळविला असें नमूद आहे. विवाह म्हणजे करार. हे करार वाटेल तेव्हां रद्द केले जात, किंवा ते करार पुन्हां मुक्रर केले जात. जणुं बाजारांतील देवघेवच ती! उच्चतर जीवनाचें रोममध्यें दिवाळें उडत आहे, आध्यात्मिक जीवन संपुष्टांत येत चाललें आहे अशी धोक्याची सूचना कांहीं विचारवंत देत होते. इतिहासकार लिव्ही म्हणाला, “आमचे दुर्गुण आम्हांला झेंपणार नाहींत. त्या दुर्गुणांवर उपाय करणेंहि आतां शक्य नाहीं. दुर्गुणांचा रोग आतां बरा होण्याच्या पलीकडे गेला आहे.” टॅसिटसनें तर त्या वेळच्या हतपतित संसाराचें फारच भेसूर चित्र रेखाटलें आहे. जुव्हेनालनें अत्यंत बोचक व खोचक उपहास केला आहे. परंतु लोकांनीं ही वाणी ऐकिली नाहीं. आणि रोमचें तें वैभव, तें अस्तंगत झालें. जगावर सत्ता गाजविण्याच्या अमर्याद महत्त्वाकांक्षेनें पछाडलेलीं अशीं साम्राज्यें एकामागून एक धुळींत गेलीं. आध्यात्मिक दिवाळखोरीमुळें संस्कृतींपाठीमागून संस्कृती नष्ट झाल्या. हिंदूंच्या विष्णुपुराणाचा

कर्ता एके ठिकाणीं म्हणतो, "विचार करा. लवकरच नवा अवतार येईल, कल्कीचा अवतार होईल. आणि मग काय होईल? ज्याच्याजवळ संपत्ति तो मोठा मानला जाईल. तोच अभिजनवान्, तोच खरा सद्गुणी. स्त्री-पुरुषांत कामविकार हेंच एक बंधन राहील. अनृत हाच व्यवहारहेतु होईल. विषय-सुखाहून अन्य आनंद राहणार नाहीं. विषयसेवन हाच एक आनंद. गळ्यांत जानवें म्हणजेच ब्राह्मणत्व. रतिसुख म्हणजेच जणुं गृहस्थाश्रम. बाह्य टिळेमाळा हेंच धर्माचें स्वरूप होईल. धर्माचा आत्मा नष्ट [1]होईल." असें हें वर्णन आहे. जर रानटीपणाचें क्षुद्र ध्येय अद्यापहि आपण सोडणार नाहीं, त्यालाच चिकटून बसूं, तर आपल्या जीवनाचा विकास थांबेल. तें सडेल, झडेल. आपली संस्कृति स्वतःच्या पापाच्या वजनानेंच ढांसळून पडेल. ती नाहींशी होईल. सर्व गोष्टी उघड आहेत. इतिहासाचा कायदा निर्दय आहे. जें पेराल तें उगवेल. तेथें पसंती नापसंती मग नाहीं. जे हातीं तरवार घेतील ते तरवारी-नेंच मरतील. एकादी संस्कृति विजयी होते तेव्हां ती वास्तविक तरवारीनें होत नसून तिच्यांत जी कांहीं आध्यात्मिक शक्ति असते तिचा तो प्रभाव असतो. आणि जेव्हां तिच्यांतील ही शक्ति संपते, ही जीवनदायी– प्राणदायी वस्तु नाहींशी होते, तत्क्षणीं त्या संस्कृतीचें प्रेत होऊन पडतें. जोंपर्यंत तरवारीवर हात आहे व तरवार हीच आशा आहे, तोंपर्यंत भविष्य भयाण आहे, अंधारमय आहे. जोंपर्यंत आत्म्याच्या आधारानें कारभार चालवावयास आपण तयार होत नाहीं तोंपर्यंत भविष्याची आशा नाहीं. ज्या संस्कृतीचा स्पर्धा हा पाया आहे, जी संस्कृति कांहीं विरोध उत्पन्न झाला असतां शक्तीनेंच त्या प्रश्नाचा सोक्षमोक्ष लावूं पाहते, शक्तीलाच जी न्यायाधीश करते, शक्ति हेंच जिचें उपास्यदैवत, ज्या संस्कृतीचा अभिमानी समाज एक अर्थशास्त्र फक्त जाणतो, ज्या संस्कृतींत उथळ विचारालाच महत्त्व मिळतें, कला केवळ वासना-विकारात्मक असते, ज्या संस्कृतींत नीति शिथिल होते, संयमाला स्थान नसतें, ती संस्कृति रजोगुणात्मक आहे. ती सत्त्वगुणात्मक नाहीं. आणि म्हणून ती टिकूं शकणार नाहीं. विनाशाच्या दरीकडे दुनिया झपाट्यानें

१ अर्थ एक अभिजनहेतुः, धनमेवाशेषधर्महेतुः, अभिरुचिरेव दाम्पत्यसंबंधहेतुः, अनृतमेव व्यवहारहेतुः, स्त्रीत्वमेवोपभोगहेतुः, ब्रह्मसूत्रमेव विप्रत्वम्, लिंगधरणमेव आश्रमहेतुः ( विष्णुपुराण ४–२४–२१ )

जात आहे. अशा वेळेस आध्यात्मिक पायावर पुनर्रचना, पुनर्घटना करूं तरच तरणोपाय आहे. पैगंबरांचे शब्द अशा वेळेस आठवतात:

"अरे, नका रे मरूं. मागें वळा, मागें वळा. कां उगीच मरतां?"

हेगेल या थोर तत्त्वज्ञान्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे "मानवजात इतिहासापासून कांहींएक शिकत नाहीं, ही एक गोष्ट मात्र आपण इतिहासापासून शिकतों." हेगेलचें हें म्हणणें आपण खोटें पाडणार, का त्यांच्या म्हणण्याला आपण आपल्या कृतीनें आणखी पुरावा पुरविणार? संस्कृतीचें भवितव्य, अखिल मानवजातीचेंच भवितव्य संकटांत आहे. ह्या भवितव्याला अजूनहि आपण मनांत आणूं तर वांचवूं. अजून तुकडे पडण्याइतकें तें कठिण नाहीं झालें. अजून तें आकार देतां येईल असें आहे. अजून ओलें आहे, जरा मऊ आहे. मानवजात वांचेल अशा प्रकारचें जग करणें आपल्या हातांत आहे.

निराश होण्याची जरूर नाहीं. पृथ्वीवर आपण जन्मून कांहीं फार काळ झाला नाहीं. आपण अर्धवट सुधारलेले आहोंत यांत आश्चर्य नाहीं. भविष्य-काळ अनंत समोर उभा आहे. सूर्य अजून एक कोट वर्षें तरी थंड होणार नाहीं. या पृथ्वीवर तोंपर्यंत आपण राहूं शकूं अशी शास्त्रज्ञ ग्वाही देत आहेत. आपण जर प्रगति करीत जाऊं, केवळ भौतिक दृष्ट्या नव्हे, केवळ यांत्रिक दृष्ट्या नव्हे, तर मानसिक व आध्यात्मिक दृष्ट्याहि जर प्रगत होत जाऊं, तर मानव-जातीला उज्ज्वल भविष्य आहे. आजच्या वेदनांतून व उलथापालथींतून कांहीं तरी मंगलच निर्माण होईल असें मानण्याइतका मी आशावादी आहें. परंतु कोणतीहि सुधारणा करण्यापूर्वी निःपक्षपातीपणें निरीक्षण-परीक्षण करणें अगत्य असतें. पृथक्करणाची जरुरी असते. मोकळेपणाची रास्त टीका होणें हिताचें असतें. न हलणारे असे जे आळशी गोटे असतात, अहंप्रज्ञ व अहंपूर्ण असे जड जरठ वृत्तीचे हटवादी असतात, अशांना जर कोणी जोराजोरानें धक्केचपेटे दिले, तर त्या गोष्टीचें अभिनंदनच केलें पाहिजे. रूढींना जे आव्हान देतात, वाढत्या मताच्या मानगुटीस भूतकाळाचें भूत बसविणाऱ्यांवर जे जोरदार हल्ला चढवितात, त्यांचें कौतुक केलें पाहिजे. प्रामाणिकपणें चूक कबूल करणें म्हणजेच सुधारणेचा आरंभ. जरी भविष्यकाळाच्या पोटांत काय आहे हें आपण फारसें पाहूं शकणार नाहीं, तरी जेथपर्यंत विचाराची दृष्टि जाऊं शकते तेथ-पर्यंतचा तरी मार्ग आखतां येणें शक्य आहे.

# पुनर्रचना : : ४

## धर्म

धर्मांची पुनर्रचना करण्याचा मोठा प्रयत्न होण्यापूर्वीं आधीं संशयवादाची प्रचंड लाट येत असते. धर्मांची पुनर्घटना करण्याचे सारे प्रसंग पाहा. त्या त्या वेळेस तुम्हांला या गोष्टींचें प्रत्यंतर मिळेल. श्रद्धेचें पुन्हां नवीन बीं पेरण्यासाठीं परंपरेची जमीन उखळून, नांगरून ठेवावी लागते. एक महान् आंदोलन सुरू होतें, आणि पडापड सुरू होते. अशा या पडापडींत, अशा या सर्व संसार धांडुळला जाण्याच्या वेळींच जें अचल असतें, जें शाश्वत व सत्य असतें, जें कशानेंहि नष्ट होत नाहीं, ध्वस्त होत नाहीं, तें डोळ्यांसमोर उभें राहतें. सर्व अस्थिराच्या पसाऱ्यांत ती स्थिर वस्तु समोर दिसते. धर्मावर टीका होऊं नये असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. मनाचा कोंडमारा केल्यामुळें मन सुधारेल अशी आशा करूं नये. मनाला मोकळेपणा द्यावा. यांत्रिक सनातनी धर्म किंवा केवळ धर्मशून्यता यांना भविष्यकाळांत स्थान नाहीं. धर्माची भविष्यकाळांत गरज भासणार नाहीं असें कोणी म्हणतात; परंतु धर्म सदैव राहील. धर्माला दूर करतां येणार नाहीं. ती जी अज्ञात सत्यता, तें जें अननुभूत ब्रह्म त्याच्याशीं संबंध जोडावा असें मानवी हृदयास सदैव वाटत असतें. त्या अमूर्ताशीं बसावें, त्या निराकाराजवळ हंसावें अशी भूक मानवी मनास नेहमीं राहणार. जोंपर्यंत मनुष्य मनुष्य आहे, तो मनन करणारा मानव आहे, जीवनासंबंधीं जोंपर्यंत त्याला जिज्ञासा आहे, आशा आहे, जोंपर्यंत उच्चतर

जीवनाची त्याला आकांक्षा आहे व जीवनाच्या कर्तव्यांची जाणीव आहे, तोंपर्यंत धर्माच्या नाशाची भीति नाहीं. तोंपर्यंत धर्म आहे. धर्माचें स्वरूप फार तर बदलेल. तो नवीन स्वरूपांत मांडावा लागेल. अर्वाचीन ज्ञानाशीं व विचारांशीं, आजच्या शोधक व डोळस बुद्धीशीं ज्या विश्वव्यापक सत्यांचा विरोध नाहीं, तीं सत्यें नवीन स्वरूपांत नवीन पद्धतीनें मांडावीं लागतील. आपलें कार्य दुहेरी आहे. आपणांस रूढीचीं बंधनेंहि तोडायचीं आहेत, परंतु त्याचबरोबर कशांत कांहीं नाहीं असें बेछूटपणें म्हणणारी स्वच्छंदी अराजक वृत्ति, तिच्याशींहि झगडायचें आहे.

प्रत्येक वस्तूला कांहीं तरी कारण असतें, म्हणून कार्यकारणभावात्मक या सृष्टीलाहि कांहीं आदिकारण असेल, या सांखळीच्या सुरवातीला कोणता तरी आरंभीचा दुवा असलाच पाहिजे, असें जर कोणी म्हटलें तर त्याच्या सत्यतेसंबंधीं आपण शंका घेऊं शकूं; परंतु या विश्वाच्या मुळाशीं कांहीं तरी आधारभूत सत् असलें पाहिजे, कांहीं तरी मूळ प्रकृति असली पाहिजे असें जर आपण म्हटलें, तर संशय बराचसा कमी होतो. या विश्वाला आदिकारण आहे कीं नाहीं, या सर्व पसाऱ्याच्या पाठीमागें कांहीं शक्ति आहे कीं नाहीं? कांहीं कांहीं तत्त्वज्ञानी अशा प्रश्नांची टिंगलच करतात. व्हाल्टेअर उपहासानें म्हणे "नाक कशासाठीं? चष्मा ठेवण्यासाठीं!" अशाच प्रकारची ही कारणमीमांसा आहे. परंतु खरोखर का सारें उपहासास्पद आहे? जर कोणी म्हटलें कीं या विश्वाची व्यवस्था, रचना, गति हें सर्व पाहून असें वाटतें कीं याच्या पाठीमागें कांहीं तरी योजना असावी, कोणता तरी हेतु असावा, हें उगीच आपाततः सुदैवानें सारें चाललें आहे असें नाहीं; तर त्याच्या म्हणण्याचा विचार नको का करायला? तें म्हणणें विचार करण्याच्या लायकीचें नाहीं का? या विश्वाकडे शास्त्रीय दृष्टीनें पाहूनहि आस्तिकता राहते. शास्त्रीय दृष्टि नास्तिकच करते असें नाहीं. सत्यार्थानें पाहिलें तर जगाचें शेवटीं काय होणार आहे ह्या मूलभूत प्रश्नाशीं शास्त्राला कांहींएक कर्तव्य नाहीं. जीवनांतील कांहीं स्वरूपांचा शास्त्र विचार करतें, आणि इतर प्रश्न धर्म व तत्त्वज्ञान यांच्यावर तें सोपवितें. या विश्वाच्या विकासासंबंधीं दोन तुल्यबल अशा जर विचारप्रक्रिया समोर मांडण्यांत येत असतील, त्या दोन्हीहि दृष्टी जर सत्य वाटत असतील, तर ज्या विचारप्रक्रियेमुळें, जी दृष्टि घेतल्यामुळें मनुष्यांचा परमोच्च विकास होण्याची

शक्यता दिसेल ती प्रक्रिया, ती दृष्टि आपण कां मान्य करूं नये ? शास्त्रीय दृष्टीशीं जर निष्ठावंत राहावयाचें असेल, तर आपणांस असें कबूल करावें लागतें कीं या विश्वाच्या भौतिक पसाऱ्याच्या पाठीमागें कांहीं तरी आध्यात्मिक सत्यता आहे. त्या सत्यतेचें यथार्थ आकलन होणें कठिण आहे. त्या सत्यतेची व्याख्या नाहीं करतां येणार. परंतु ती सत्यता आहे मात्र खास. वस्तूला चैतन्याची जोड मिळाली व मन, बुद्धि, आत्मा अशा प्रकारें त्यांतून वाढते गुणधर्म प्रकट होऊं लागले. मधुनमधून प्रगति खुंटते, अधःपात होतो, निर्दयता व मूर्खता उत्कटत्वानें प्रतीत होतात. तरीहि पुढें पाऊल पडत आहे. चैतन्ययुक्त प्रकृतीच्या प्रगतीची दिशा सदैव वाढत्या परिपूर्णतेकडे आहे. मनोधर्मांची सुधारणा, सामुदायिक वृत्तीची वाढ, सहन करण्याची शक्ति, निरनिराळ्या भागांचा मेळ घालणें वगैरे जे मोलवान् सद्‌गुण, ते उत्तरोत्तर वाढत आहेत. प्रकृतींत मूळचीच नैतिक गति आहे असें वाटतें. विश्वाच्या विकासाकडे अशा नैतिक व आध्यात्मिक दृष्टीनें बघणें म्हणजे केवळ कल्पना नाहीं. एकाद्या व्यक्तीची ही आवड किंवा लहर नाहीं. व्हाइटहेड, थॉम्सन, ऑलिव्हर लॉज, लॉइड मॉर्गन अशा शास्त्रीय तत्त्वज्ञान्यांच्याहि लेखांतून ही दृष्टि मांडली गेली आहे.

त्या अज्ञात चिरंतन सत्याकडे इतके दिवस आंधळेपणानें आपण धडपडत जात होतों. परंतु शास्त्रीय ज्ञानानें आज नवीन दृष्टि दिली आहे. प्राचीन धर्मांतील सत्यतेवर जरी शास्त्र हल्ला करीत नसलें, तरी त्या जुन्या जरठ हटवादीपणाला तें धक्के दिल्याशिवाय राहत नाहीं. विश्वरचनेच्या पाठीमागें कांहीं तरी शक्ति, ज्ञानमय शक्ति असली पाहिजे असें शास्त्र म्हणतें. परंतु त्याचबरोबर मनुष्यानें आजपर्यंत ईश्वरासंबंधीं ज्या इतर नाना कल्पना उभारल्या आहेत, जें भारूड निर्माण केलें आहे, त्या सर्वांचा शास्त्र उच्छेद करतें. ईश्वर म्हणजे मातीची मडकीं घडवणारा कुंभार, स्वर्गांत बसणारा देवाधिदेव, आपल्या लेंकरांचें कौतुक करणारा बाप, वगैरे ईश्वरासंबंधीं ज्या कल्पना आहेत, त्या कल्पनांशीं विश्वाच्या पाठीमागें असणाऱ्या त्या अनंत शक्तीला कांहींएक करायचें नाहीं. तें सारें काव्य आहे. प्रत्येकाच्या त्या त्या कुलदैवताशीं, त्या नाना मूर्तींशीं व आकाराशीं त्या चिच्छक्तीचा संबंध नाहीं. मग ईश्वर म्हणजे काय ? ईश्वर म्हणजे विश्वव्यापक चैतन्य, विश्वव्यापक जीवन-तत्त्व. तें आपल्यांत आहे, या सर्व चराचरांत आहे. तें तत्त्व या सर्व विश्वाला आधार देतें, या विश्वांत ओतप्रोत

भरून राहातें, विश्वाच्या पलीकडेहि तें सत्ता चालवितें. समुद्रांत मीठ मिसळलेलें आहे, फुलांत सुगंध भरलेला आहे, तसें तें तत्त्व या चरचरांत भरून राहिलें आहे. या विश्वाचा कारभार शाश्वत व निश्चित अशा योजनेनुसार चालला आहे. विश्वविकासाचे नियम आहेत. या किंवा त्या व्यक्तीसाठीं ते नियम थांबणार नाहींत. आपण चूक केली व खड्ड्यांत पडलों तर कोणीहि हात धरून काढायला येणार नाहीं. मोडलेल्या कायद्याबद्दल तेथें दयामाया नाहीं. जें बोललेत ते बोललेत. जें पाऊल टाकलेंत तें टाकलेंत. जें पेरलेंत तें पेरलेंत. भूतकाळ निश्चित झाला, भविष्याचें काय तें पाहा.

असें तें जें परम तत्त्व, त्याचा मानवी मनाला नाना रूपानें साक्षात्कार होतो. हिंदुधर्मांतील देवतांची विविधता पाहा. त्याचप्रमाणें या सर्वांपाठीमागें एक तत्त्व आहे किंवा तें तत्त्व स्थिरचरांत भरूनहि दशांगुळें उरलें, हा विचार पाहा. बुद्धधर्मामध्यें अभंग असा निष्ठुर कायदा आहे. तरी त्या धर्मांतहि कोणी अवतार येतो व वांचवितो, हा विचार आहेच. मिसर, बाबिलोन, ग्रीस वगैरे देशांतील त्या नाना देवदेवतांचे खेळ पाहा. आणि हिब्रूंचा तो कठोर न्यायप्रिय प्रभु. कॅथॉलिकांचा प्रत्यक्ष देव जरी दूर असला, तरी इतर देवदूत हात देण्यासाठीं उभे आहेतच. देवाचे आवडते भक्तहि तेथें आहेत. प्रॉटेस्टंट आपला देव आपल्या मनांत आणतात. मुस्लीमबंधूचा तो एकेश्वरी पंथ. अशा या नानाविध मार्गांनीं त्या अदृश्य शक्तीशीं आपला संबंध जोडण्याचा मानवी मनानें आजपर्यंत प्रयत्न केला आहे. ती शक्ति व्यक्तीपेक्षां महान् आहे, अधिक सत्य, शिव व सुंदर आहे असें सर्वांनीं मानलें आहे. मानवी स्वभाव विविधतेनें नटलेला आहे आणि म्हणून ईश्वराचें स्वरूप विविध असें दिसणें साहाजिक आहे. आपला अनुभव किंवा आपलेंच म्हणणें खरें, असें जर हें सारें म्हणतील तर त्यांची एकवाक्यता कशी घडवायची ? या सर्व विविध कल्पनांच्या मुळाशीं एक अंतिम सत्यता आहे एवढें बरीक खरें. ती अंतिम सत्यता काय आहे किंरूप आहे, तें आजपर्यंत कोणी सांगितलें नाहीं, पुढेंहि कोणी सांगेल असें वाटत नाहीं.

धर्मांतील वैविध्य हें पुष्कळ वेळां विरोधाचें निमित्त केलें जातें. ही विविधता नष्ट करून सर्व मानवांचा एक धर्म व्हावा एतदर्थ प्रयत्न केले गेले, केले जातात. परंतु अशा प्रयत्नांनीं भलें तर झालें नाहींच, उलट जगांतील

अशांति व दुःख हीं मात्र वाढलीं. स्वतःचें मत दुसऱ्यावर लादूं पाहण्याचा धर्मवेडेपणा कांहीं स्वार्थी लोकांचा स्वभावच असतो. सत्य काय तें फक्त आपणांला मिळालें, विश्वाचा अर्थ जो अर्थ करूं तोच काय तो खरा, असें मानणें अहंकार आहे. अहंकारामुळें अशी भूल मानवाच्या हातून होते. त्या त्या धर्मांतून त्या त्या लोकांचा आत्मा प्रकट होतो. त्या त्या लोकांच्या आंतरिक जीवनाचें स्वरूप त्या त्या धर्मांत प्रतिबिंबित होतें. प्रत्येक जाति किंवा वंश आपापल्या आंतरिक धर्माप्रमाणें विकास करून घेतात. दिव्यत्व सर्वत्रच आहे. त्या त्या ठिकाणीं त्या त्या विशिष्ट रूपांत तें प्रकट होतें. ज्या वेळेस दिव्यत्वाचे असे दोन भिन्न आविष्कार समोरासमोर येतात, त्या वेळेस ते एकमेकांवर परिणाम करितात. दोघांतहि नव्यता व भव्यता येते. दुसऱ्यांजवळून जसेंच्या तसें घेऊं नये. त्याचें कलम करावें. तें आपणांत मिळवून घ्यावें, त्याचें स्वरूप बदलावें. जगाचा एक धर्म करूं पाहण्यांत अर्थ नाहीं. जगाची विविध अशी आध्यात्मिक श्रीमंती, हें बहुविध वैभव त्यामुळें कमी होईल. मन जर वांझोटें व्हावयास नको असेल, मनाचा विकास स्थगित व्हावयास नको असेल, मानवजातीचा आत्मा डबक्यांत पडून राहूं नये असें जर वाटत असेल, तर कोणत्याहि धर्माला नाकारूं नका, कोणत्याहि धर्माला खोडून काढण्याचा खटाटोप करूं नका. राहूं देत हे सारे महान् धर्म. "ईश्वरानें ज्यांना ज्यांना रस्ता दाखविला, ते ते सारे त्याचेच आहेत."

आध्यात्मिक क्षेत्रांत, ज्यानें त्यानें स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला प्राधान्य दिलें पाहिजे. प्रत्येकानें असें स्वातंत्र्य घेणें म्हणजे चुकाहि होणें. परंतु या चुका मुद्दाम केलेल्या नव्हत. या चुका दुःखकारक असल्या तरी सत्यशोधनाचेच ते प्रामाणिक प्रयत्न होत. अधिक खोल असलेल्या गहन-गंभीर प्रश्नांचा संतत अभ्यास करीत राहिल्यानें, या चुका कमी होत जातील. त्या दुरुस्त करतां येतील.

भविष्यकाळांतील धर्म अत्यंत उदार व व्यापक हवा. जे जे धार्मिक प्रवृत्तीचे आहेत त्या सर्वांचा उद्यांच्या धर्मांत समावेश झाला पाहिजे. पंथस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य सर्वांस दिलें गेलें पाहिजे. आपापल्या मनांत काढूं दे विचारचित्रें, खेळवूं दे स्वप्नें. धर्म म्हणजे अतीन्द्रिय वस्तूविषयींची एकादी सांगोपांग

मांडलेली विचारप्रणाली नव्हे. व्यापक अर्थानें पाहिलें तर धर्म म्हणजे मनाची विशिष्ट वृत्ति, प्रत्येकाच्या आत्म्याचा कल.

तुमचीं मतें काय, तुमचे मंत्र कोणते, तंत्र कोणतें यावरून तुमची परीक्षा नाहीं करावयाची. तुमची परीक्षा शेवटीं तुमच्या जीवनावरून केली जाईल. तुम्ही कसे वागतां, तुमचें चारित्र्य काय, याला महत्त्व आहे. कोणत्याहि धर्माचे लोक असोत, जे खरे धार्मिक असतात त्यांची दृष्टि व वृत्ति सर्वत्र तीच दिसून येते. संत कोणत्याहि धर्माचा असो. साऱ्या संतांचें जीवन एकरूपच आढळेल. अशा धर्मात्म्यांची मनःशांति कालत्रयींहि भंगत नाहीं. आपत्तींचे डोंगर कोसळोत, दुर्दैव पाठीस लागो, ते स्थितप्रज्ञच असतात. आणिबाणीच्या वेळींहि जे शांत राहतात, कितीहि संकटें आलीं तरी ज्यांचा आत्मा अजिंक्य राहतो, त्यांच्याजवळच स्वतः मोठेपणा आहे. सर्व आध्यात्मिकतेचें सार तें हेंच. अविचल श्रद्धेचे लोक ज्या जगाला ते जिंकून घेतात, त्या जगाहून मोठे असतात, श्रेष्ठ असतात. गोळ्यांचा वर्षाव होत असला तरी ते सत्यच सांगतील. त्यांना क्रॉसावर चढवा, जाळा, फांशी द्या; सत्यापासून ते परावृत्त होणार नाहींत. व्यापक अशी त्यांची दृष्टि असते. त्यांच्या दृष्टीला स्वार्थ ओंगळ दिसतो. आसक्ति त्यांना शिवत नाहीं. सर्वांच्या हितांत स्वतःचें हित आलेंच, निराळें स्वतःचें हित तें काय पाहायचें, असें ते म्हणतात. त्यांच्या त्यागाला मोजमाप नसतें. तेथें हिशेबीपणा नसतो. त्यांचा त्याग निरपेक्ष असतो. मोबदला मिळावा अशी चुकूनहि त्यांच्या मनांत इच्छा नसते. त्यांचें जीवन असें यज्ञमय झालेलें असतें. तो त्यांचा स्वभावच बनतो. स्वतःला शून्य करणारा हा त्याग, ही धीरवीरता, ही शांति, सर्वसाधारण मनुष्यास शक्य नाहीं, असें म्हणून आपण मोकळे होत असतों. पराभूत झालेल्या गॅलिलीच्या कोळ्यांना अशा त्यागानें समाधान लाभत असेल, दुबळ्या हिंदी मनाला अशा आत्मसमर्पणाचें कौतुक वाटत असेल, परंतु आम्हांला नको हें निर्वाण असें कोणी कोणी म्हणतात. संयमी जीवनावर धर्मानें भर दिला आहे. प्रत्येक धर्मानें त्यागाची शिकवण दिली आहे, स्वतःला विसरायला सांगितलें आहे. धर्म म्हणजे कांहीं एकादी गोरीगोमटी वस्तु नव्हे. फुकाफुकी लाभणारीं समाधानें धार्मिक नव्हत. सदैव सुखोपभोगासाठीं धडपडणें म्हणजेच जीवन असें मानणें अधर्म होय. दुःख ही आकस्मिक गोष्ट नसून जीवनांत ती

ओतप्रोत भरलेली आहे. कष्टानें व त्यागानेंच महत्त्वाच्या वस्तू संपादाव्या लागतात. वेदनांशिवाय वैभव नाहीं. जीवनाचें प्राप्तव्य प्रेयस् नसून श्रेयस् आहे. 'आनंदी जीवन' नि 'जीवनांतील आनंद' ह्या दोन निराळ्या गोष्टी आहेत. त्यागानें, दुःखमय जीवनानें जर ध्येयप्राप्ति होत असेल तर तो त्याग, ते कष्ट आनंददायकच असतात. एकाद्याला सुखाचें जीवन जसें वाटत असेल, तसेंच ध्येयार्थीला हें कंटकमय जीवन आनंदाचें वाटतें. स्वतःच्या ध्येयाचा साक्षात्कार करून देणारें असह्य असें दुःखहि मनुष्य हंसत सहन करतो. महाकवि गटे म्हणतो, "शिखरें मनाला आकर्षितात, तेथें नेणारा रस्ता नव्हे." त्या उच्चतेकडे आपलें लक्ष असतें. मग मार्ग कठिण व सुळक्याचा का असेना. रोजच्या बारीकसारीक गोष्टींतहि हा न्याय दिसून येतो. शरीराला त्रास झाला तरी तो पत्करून बायका नटतील थटतील. पायांना सहन होत नसलें तरी बूट घालतील. सौंदर्यप्रसाधनासाठीं नाना सोस करितील. मनुष्य मनांत आणील तें करतो. स्वतःची इच्छा त्याला प्रमाण असते. स्वतःची इच्छा चालविणें हेंच जीवनांतील पहिलें महत्त्वाचें अंग असतें. जीवनांतील महत्त्वाची जरुरी ती हीच. परंतु ही स्वेच्छा विश्वतंत्राशीं जुळवून घ्यावी. स्वतःची इच्छा व विश्वेश्वराची इच्छा यांत अविरोध निर्माण करावा. परंतु यामुळेंच झगडे उत्पन्न होतात. मनाची धडपड सुरू होते. "रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग" असें म्हणावें लागतें. आपल्या रोजच्या जीवनांत असें हें कुरुक्षेत्र हरघडी दिसून येतें.

प्रत्येक व्यक्ति म्हणजे अविकसित गोळा आहे. सर्वांची वाढ व्हावयाची आहे. पशुवृत्ति आपणांतून सर्वस्वीं गेली आहे असें नाहीं. या पशुवृत्तीला आपण वळण देऊं शकूं, तिचें दुसऱ्या कोणत्या तरी उच्च वृत्तींत पर्यवसान करूं. आत्म्याची मागणी आधीं मान्य करावयास आपण शिकलें पाहिजे. आत्मारामाचा आधीं हक्क. यासाठीं इतर वृत्तींवर नियंत्रण ठेवावें लागेल. अशा तपश्चर्येंतून व संयमांतूनच विकास होत असतो. आपण देहवृत्ति असतों. आपणांस विदेही व्हावयाचें असेल, आत्मसंस्थ व्हावयाचें असेल, तर आपण आपल्या आवडीनावडींना निराळें वळण दिलें पाहिजे. आपल्या आंतर मनाचें नीट विनयन केलें पाहिजे. यालाच निग्रह म्हणतात, वैराग्य म्हणतात. प्रत्येक पायरी चढतांना मोह आडवे येतात. उच्च जीवनाकडे जाणें म्हणजे युद्ध आहे,

खरोखरचा झगडा आहे. परंतु उच्च जीवनाकडे गेलें तर पाहिजे. एरव्हीं आपल्या व्यक्तित्वाची परिपूर्णता नाहीं. अपरंपार त्याग करावा लागेल; परंतु फळहि मोठें मिळेल. जसें मोल द्याल तसें फळ मिळेल. सर्व प्रकारच्या प्रगतींत खालचें सोडून वरचें घेणें हाच मार्ग आहे. क्षुद्राचा त्याग व उच्चाचा स्वीकार. अत्यंत क्षुद्र जंतूपासून तों आत्मार्थी पुरुषापर्यंत आपण पाहिलें तरी हें दिसून येईल. हेतुपुरस्सर क्रमवार अखंड प्रयत्न किडीपासून तों महात्म्यापर्यंतच्या सर्व जीवांचे चालले आहेत. सर्वांच्या समोर ध्येय असतें. प्रत्येकाचें कांहीं तरी गंतव्य-प्राप्तव्य असतें. त्या त्या ध्येयानुरूप आपण साधनें योजितों, प्रयत्न करतों. इतर सर्व प्राण्यांपेक्षां मनुष्याच्या प्रयत्नांत ही हेतुपुरस्सरता, जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची वृत्ति अधिक स्पष्टपणें प्रतीत होते.

मनुष्य परिस्थितीचा गुलाम नाहीं. ईश्वराच्या हातांतील बाहुलें नाहीं. परिपूर्णतेकडे जाणारी विश्ववृत्ति मनुष्यांत जागृत अशी असते. विश्वाचा स्वभावच परिपूर्णतेकडे जाण्याचा आहे. परंतु हा स्वभाव मानवांत आंधळा न राहतां डोळस होतो. तिर्यग्योनींत प्रगति घडते; परंतु मानव ती घडवितो. मनुष्य पुरुषार्थपूर्वक, प्रयत्नपूर्वक प्रगतीकडे पावलें रोवीत जातो. मनुष्येतर सृष्टींत अजाणतां फेरफार होतात. मानवी व्यवहारांत जाणीवपूर्वक हेतु असतो. मी आज असा आहें, परंतु मी तसा होऊं शकेन, अशा प्रकारची धडपड आणि या धडपडीमुळें वाटणारी अस्वस्थता हीं मानवांतच दिसून येतात. इतर प्राण्यांत व मनुष्यांत जर कोणता फरक असेल तर तो हा, कीं मनुष्य जीवनाचा कायदा शोधूं पाहत असतो, प्रगतीचें तत्त्व शोधूं पाहत असतो.

आपण स्वतःला बदलूं तर आपण जग बदलूं. स्वतःला सुधारूनच आपण जग सुधारूं शकूं. स्वतःला सुधारणें हा सुधारणेचा पाया आहे असें जें म्हटलें जातें तें अक्षरशः खरें आहे. नवीन संस्कृतीची उभारणी दैवावर सोंपविण्याची जरूर नाहीं. आपणहि कांहीं काम करूं शकूं. पुष्कळ करावयाचें आहे. कितीतरी बाबतींत हें जग अपूर्ण आहे. कितीतरी ठिकाणीं बांधकाम करायचें आहे. प्रगति झपाट्यानें करायची कीं मुंगीच्या पावलानें करायची हें आपणांवर आहे. उत्क्रान्तीची शिकवण स्पष्ट आहे. कांहीं ठराविक कार्यक्रमानुसार जीवन जात नसतें. प्रगतीचीं तीं तीं इच्छित शिखरें जीवन कधीं गाठूं शकत नाहीं. जीवनाची नदी कधीं सरळ जाते, कधीं वांकडी जाते. कधीं उथळ असते, कधीं

गंभीर असते. कधीं ती नदी वाळवंटांत लुप्त झाल्याप्रमाणें दिसते. जीवन कधीं इकडे जातें, कधीं तिकडे. कधीं कधीं प्रगति खुंटते व पुन्हां पूर्वपदावर गाडी येते. निसर्गाच्या कामांत हिशेबीपणा नाहीं. पुन्हां पुन्हां तेच तेच प्रयोग करावे लागतात. भूतकालीन इतिहास सांगतो कीं जरा जर चुकीचा मार्ग घेतला गेला, तर एकदम अदृश्यच व्हावें लागेल, जगांतून नष्ट व्हावें लागेल. आपणां-पैकीं प्रत्येकाला अधिक चांगलें जग निर्मिण्याच्या प्रयत्नांत भाग घेतां येईल. प्रत्येकाला कांहीं तरी करतां येईल. विश्वाचा हेतु जर आपण लक्षांत घेऊं व त्याच्याशीं एकरूप होऊं तर हें करतां येईल. प्रत्येक व्यक्तींत कांहीं तरी अपूर्वता असते. प्रत्येकाचे विशिष्ट गुणधर्म असतात. प्रत्येकाला जगाच्या कल्याणांत कांहीं विशेष भर घालतां येईल. ती शक्यता सर्वांच्या ठायीं आहे. स्वतःचा स्वधर्म ओळखणें हें सर्व परिपूर्णतेचें सार आहे. मी काय करूं शकेन, मला काय होतां येईल, माझें ईश्वरी देणें कोणतें हें कळणें म्हणजेच स्वतःच्या विकासाचें सूत्र हातीं येणें. जीवनाचा शांतपणें व स्थिरपणें विचार करून जीवनांतील आपलें स्थान आपण शोधू शकतों. जीवनाचा अर्थात् सर्वांगीण विचार केला पाहिजे. प्रत्येक मनुष्य म्हणजे कांहीं विवक्षित गुणांचा व घटनांचा गोळा असतो. प्रत्येकाच्या जीवनांतील मध्यबिंदु निरनिराळा असेल, कोणाचा खालीं, कोणाचा वर. त्या मध्यबिंदूवर आपलें चारित्र्य अवलंबून असतें. मनुष्य उथळ स्वभावाचा आहे कीं गंभीर वृत्तीचा आहे, हें त्याच्या जीवनांतील मध्यबिंदू-वरून दिसून येतें. कितीहि चुका झाल्या, तरी पण मध्यबिंदु जर काळजीपूर्वक घेतलेला असेल, तर आधार आहे. आपल्या सर्व जीवनांत एकसूत्रीपणा आहे. त्या मध्यबिंदूशीं साऱ्या अंतर्बाह्य क्रिया संबद्ध हव्यात. जीवनांतील एकसूत्रीपणा देणारा हा जो मध्यबिंदु तो आपण शोधून काढला पाहिजे, म्हणजे विश्वांतील आपलें विशिष्ट स्थान आपणांस कळेल. मग आपली भूमिका नीट पार पाडण्यास लागणारा उत्साह आपणांस मिळेल. ती भूमिका मग लहान असो वा अति कष्टाची, दगदगीची असो. यासाठीं शांतपणें चिंतन व मनन करण्याची, एकाग्र करणाऱ्या एकान्ताची आवश्यकता असते. त्यामुळें जीवनांत मेळ येतो.

नैतिक जीवनाला विशिष्ट अर्थ असतो व त्याला सार्वजनिक, सामाजिक महत्त्व असतें. ज्या क्रियेंत हेतुपुरस्सरता नाहीं, जी क्रिया सहजधर्म म्हणून

झाली, ती नैतिक म्हणतां येणार नाहीं. स्वाभाविक क्रिया, प्रतिक्रिया यांना नैतिक मूल्य नाहीं. ज्यांना आपण नैतिक क्रिया म्हणतों, त्यांतून कोणता तरी विचार प्रकट होत असतो. त्या क्रिया कोणत्या तरी उद्देशाला मूर्त करीत असतात. त्या क्रिया विशेष अर्थानें होत असतात म्हणूनच महत्त्वाच्या असतात. मानवी प्रकृति ओबडधोबड असते. तिला आकार द्यायचा असतो. आपल्या आडमुठ्या स्वभावाला वळण देऊन आध्यात्मिक ध्येयें मिळवायचीं असतात. आत्मोन्नतीचीं, आत्मप्राप्तीचीं साधनें आपल्याला या मातींतून घडवायचीं असतात. आपण वळण कोणतें देतों, आकार कसा देतों ही गोष्ट महत्त्वाची आहे. मानवी जीवनाचे सारे आविष्कार अर्थपूर्ण आहेत. प्रत्येकाची किंमत त्यांतील हेतूवरून, त्यांतील तत्त्वावरून होत असते. आपणांस एकच ठराविक ठसा किंवा सांचा मिळणें अशक्य आहे. प्रत्येक व्यक्ति अपूर्व आहे. प्रत्येकाचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन इतरांपेक्षां निराळा असतो. ध्येय कोणतेंहि असो; त्या ध्येयाचें स्वरूप काय, तें शक्य आहे कीं नाहीं, हें आधीं नीट लक्षांत घेणें जरूर आहे. नंतर त्या ध्येयप्राप्तीचा मार्ग नीट आंखून, कष्ट करीत हाल-अपेष्टा सोशीत, संकटांशीं झुंजत त्या ध्येयाला भेटण्यासाठीं निघालें पाहिजे. दुसरें असें कीं, आपली वर्तणूक नैतिक ठरण्यासाठीं ती सामाजिक हिताची असली पाहिजे. आपल्या वर्तनानें समाजाची सुस्थिति राहिली पाहिजे. समाजाची विघटना नाहीं होतां कामा. समाजाचें रक्षण झालें पाहिजे. आपल्या कर्मानें समाजांत मेळ राहील, अविरोध राहील असें झालें पाहिजे. समाजांत संगीत निर्माण करणें, समाजाचा विध्वंस होऊं न देणें हें उत्क्रांतितत्त्वाचें रहस्य आहे. मानवी जातीचें उच्चाटन करील असें कोणतेंहि कर्म नैतिक असूं शकणार नाहीं. समाजांत उगीच विरोध वाढवणारी कोणतीहि कृति नैतिक नाहीं. समाजांत उगीच आपला आणखी एक तिसरा सूर काढूं नये. विघटना नको, संग्राहक संघटना हवी. प्रत्येक व्यक्तीचें विशिष्टत्व आदरिणें म्हणजेच नैतिक जीवन. दुसऱ्यांच्या भावना, वृत्ती या तुच्छ नाहीं लेखतां कामा. दुसऱ्यांच्या मोठेपणाची जाणीव असणें, तो मोठेपणा कबूल करणें, त्यांच्याशीं संबंध जोडणें म्हणजेच सदाचार. अशानेंच खरोखर मानवी जीवन वैभवशाली होतें, विविध व श्रीमंत होतें. फोनिशियन माता स्वतःचींच मुलें खाऊं लागल्या. त्यांना मोलॉकनें प्रतिबंध केला. मोलॉकनें ती गोष्ट थांबविली नसती तर दुसऱ्या कोणत्या तरी देवानें

थांबविली असती. सारीं माणसें अपूर्व आहेत. एकजण दुसऱ्यासारखा नाहीं. ही अपूर्वाई, ही नवलाई हा आपला सर्वांचा विशेष धर्म आहे. या जागतिक उत्क्रांतीचें ध्येय काय? ध्येय हें कीं, सर्व विविधतेंतून एक सुंदर एकता निर्माण व्हावी. लहानमोठया अनेक शिखरांमिळून एक हिमालय शोभावा. प्रत्येकाच्या जीवनाचें विशिष्ट फूल फुलवें व विविध रंगांच्या व गंधांच्या फुलांचा एक भव्य ताटवा जगांत फुलावा व खुलावा.

जें आहे त्याचा स्वीकार करून त्यांतून सौंदर्य निर्मिण्यासाठीं प्रयत्नपूर्वक झटणें म्हणजेच नैतिक प्रगति. एकादी व्यक्ति घ्या. किती भिन्नभिन्न वृत्ती, प्रवृत्ती त्या व्यक्तीच्या ठायीं असतात! किती राग-द्वेष, किती वासना-विकार, किती चंचलता, किती लहरीपणा! परंतु अशांतूनच सौंदर्य निर्मावयाचें आहे. या मातींतूनच मांगल्याचा साक्षात्कार करून घ्यावयाचा आहे. हीच आपुली सामुग्री, हेंच साहित्य. एकादा नीतिशास्त्रज्ञ जर ही मिळालेली पुंजी भिरकावून देईल किंवा तिचा नाश करील तर तें योग्य नाहीं होणार. जें मिळालेलें आहे तें स्वीकारलें पाहिजे. आणि त्याच्या आधारावर उच्च इमारत बांधावयास हिमतीनें उभें राहिलें पाहिजे. जें आहे त्याचा स्वीकार करणें व त्याचीच नीट व्यवस्था लावणें एवढ्यानें मनुष्याला कधींहि समाधान नसतें. त्याला पुढें नेऊं पाहणारी, उच्चतर जीवनाकडे नेणारी एक अमर, प्रबळ प्रेरणा त्याच्या अंतरंगांत असते. ही प्रेरणा, ही आंतील ऊर्मि मनुष्याला स्वस्थ बसूं देत नाहीं. जें आहे तें सांभाळणें एवढेंच जीवनाचें साध्य नाहीं. जें आहे तें उदात्त करणें हा जीवनाचा अंतिम हेतु आहे. ही जीवनाची उदात्तता आहे. प्रत्येकाला अधिकाधिक अर्थ समजून घ्यावयाचा असतो. अधिकाधिक पूर्णपणें जगावें असें त्याला वाटत असतें. तो वाढत असतो, स्वतःच्या पलीकडे जातो. बीजाचा विशाल वृक्ष होतो. तो कांहींतरी होत जातो, बनत जातो, हेंच व्यक्तित्व; हेंच त्याचें विशेष अस्तित्व; हेंच विकसन. परिस्थितीशीं जमवून घेणें म्हणजे नैतिक जीवन असा जर आपण अर्थ केला, तर जोंपर्यंत परिस्थिति बदलत आहे तोंपर्यंत हें नैतिक जीवनहि थांबणार नाहीं. तेंहि बदलत राहील. आणि म्हणूनच जीवनाचीं जीं बाह्य रूपें प्राचीन काळांत दिसत तीं आज नाहीं दिसणार. जीवनाच्या त्या स्वरूपाची पुनरावृत्ति नाहीं होणार. तसेंच्या तसें भूतकालीन जीवन आजहि आम्ही जगूं असें म्हटलेंत व समजूं या कीं तें

शक्य झालें, तरी तें इष्ट होणार नाहीं. आजच्या काळीं पूर्वींचे रजपूत योद्धे किंवा मध्ययुगांतील वीरपुरुष शक्य नाहींत. ते नमुने आजच्या परिस्थितींत असंभाव्य आहेत. आणि परिस्थिति बदलतच नसेल तर? सदा सर्वदा तीच परिस्थिति सभोंतीं सर्वत्र असेल तर? तरीहि प्रश्न सुटत नाहीं. कारण आपलीं ध्येयें नेहमीं बदलत असतात. केवळ परिस्थितीशीं जुळवून घेण्यांत खरें नैतिक जीवन नाहीं. आपल्या ध्येयांना परिस्थिति अधिकाधिक अनुकूल करणें यांत खरोखर नैतिक जीवनाचा आत्मा आहे. परिस्थितीला असा आकार द्यायचा, कीं तिच्यांतून आपलीं ध्येयें उत्तरोत्तर अधिक प्रकट व्हावींत. जें आहे त्याचा नम्रपणें स्वीकार करणें, जी परिस्थिति आहे तिच्याशीं जुळवून घेणें, यांतहि एक प्रकारची शांति आहे; हीहि एक प्रकारची पूर्णता आहे. परंतु ही मानवी जीवनाची परिपूर्णता नव्हे, मनुष्यत्वाचा हा विकास नव्हे. ही शांति खरी आध्यात्मिक नव्हे. जें आहे तें घेऊन त्यांतून हिमतीनें नवीन निर्मिलें पाहिजे. जी परिस्थिति आहे, तिला आपल्या हेतूंच्या पूर्ततेसाठीं अनुकूल करून घेतलें पाहिजे. हा पुरुषार्थ आहे. एकाद्या गोगलगाईप्रमाणें कठिण कवच अंगावर घेत परिस्थितिशरण असें राहणें हें वीराचें काम नाहीं. जो जगाला वर उचलतो तो खरा वीर. जग ज्या तऱ्हेचें असावें असें आपणांस वाटतें, त्या तऱ्हेचें थोडेंफार करण्यासाठीं खटपट करणें हें मनुष्याचें खरें काम. जग आहे त्यापेक्षां अधिक चांगलें करणें, अधिक उच्च पातळीकडे तें नेणें यांत खरें भूषण. परिस्थितीशीं सम्यक् मेळ घालणें यांत सौंदर्य नाहीं असें नाहीं. परंतु बदलत्या व विविधतेनें नटलेल्या या बहुरूपी जगांत अशी सुंदरता फार वेळ टिकूं शकणार नाहीं. ती तडजोडहि टिकणार नाहीं. बालकाचें निष्पाप सौंदर्य तडफदार तारुण्याला जागा देतें. हें कर्मोत्सुक उत्साही तारुण्य पोक्त पावन वृद्धत्वाला वाव देतें. आणि असें हें सर्वत्र चाललें आहे. जीवनाच्या मार्गावर मुक्काम नाहीं. येथें विश्रांति नाहीं. एक संपलें कीं त्यांतूनच नवीनाचा आरंभ होतो. मरणांतून जीवनाची कळी वर येते.

स्वतःच्या जीवनाची पूर्णता हें जें परंपरागत ध्येय, त्याच्याशीं वरील विचारसरणीचा उघड विरोध दिसतो. पूर्वीं व्यक्ति आपल्या स्वतःच्या मोक्षाचा विचार करी. सामुदायिक मोक्षाचा विचार समोर नसे. व्यक्तीनें स्वतःचा उद्धार करावा, स्वतः मुक्त व्हावें, यावर भर दिला जात असे. धर्मामध्यें जी अधिकारवृत्ति शिरली

तिचा हा परिणाम असावा. चालीरीतींना, नाना पद्धतींना व प्रकारांना, नाना संस्थांना पाठिंबा देणारें एक साधन म्हणून, धर्म उपयोगिला जाऊं लागला. आणि ज्यांना अशा परिस्थितींत आत्मविकासास अवसर मिळेना ते रानावनांत गेले, गुहांतून वा गिरिशिखरांवर राहूं लागले. त्यामुळें समाजाची प्रगति खुंटली "अस्ति तत् समर्थमितव्यम्" हा न्याय रूढ झाला. अमुक धर्माच्या विरुद्ध आहे, तमुक धर्माच्या विरुद्ध आहे, असें सदैव सांगण्यांत येऊं लागलें. परंपरेला सांभाळणें म्हणजेच धर्म असें झालें. मग प्रगति कोठून होणार? कांहीं व्यक्ती मधुनमधून आपणांस दिसतात कीं ज्यांनीं पूर्णतेचें शिखर गाठलें. परंतु ह्या सर्वांना खरोखरची मुक्ति मिळाली असें म्हणतां येणार नाहीं. क्रोध व भय, दुःख व संकट यांच्यापासूनच मुक्त व्हायचें आहे असें नाहीं; तर अलग राहणें एकान्तवासांत राहणें, या वृत्तीपासूनहि मुक्त झालें पाहिजे. सर्व मानवांचा उद्धार झाला पाहिजे, सर्वांमध्यें ती शक्यता आहे, दिव्यता सर्वांच्या ठायीं आहे, असें ज्यांना प्रामाणिकपणें वाटत असेल, ते सर्व जगाचा उद्धार झाल्याशिवाय स्वस्थ बसणार नाहींत. सर्व खऱ्या धर्मांचा आत्मा एकच आहे. तो हा कीं, मनुष्य पूर्ण होणें शक्य आहे, मनुष्यामध्यें ईश्वरी अंश आहे, व त्या दिव्य आध्यात्मिक जीवनांत सारी मानवजात सारखी एकत्र उभी आहे. सारे मानवप्राणी दिव्य आध्यात्मिकतेनें रंगलेले प्रत्यक्ष येथें दिसत नसले, तरी त्या ध्येयभूत जीवनांत तसे दिसतात. जो जीव मुक्त झाला, ज्यानें देवाशीं सख्य जोडलें व म्हणूनच जो शक्तिमान् झाला, त्यानें स्वतःच्या समाधींतच डोलत राहूं नये; कर्महीन दशेंत कृतार्थता व समाधान मानूं नये. त्यानें प्रत्यक्ष सेवा केली पाहिजे. जोंपर्यंत जग दुःखीकष्टी आहे, जोंपर्यंत जग चिखलांत रुतलें आहे, तोंपर्यंत त्या मुक्त पुरुषाला तरी खरी शांति कशी लाभणार? तो का जगांतील ही आग व ही हायहाय स्मितमुखानें स्वस्थपणें पाहत बसेल? बाह्य जगाशीं नीट मेळ घातल्याशिवाय स्वतःच्या जीवनांतहि कोणाला मेळ घालतां येणार नाहीं. जोंपर्यंत पृथ्वीवर देवाचें राज्य आलें नाहीं, तोंपर्यंत संतांनीं आपलें सारें जीवन या बाह्य जगासाठीं सेवेंत ओतलें पाहिजे; तें देवाचें राज्य पृथ्वीवर यावें म्हणून हळुहळूं झेंडा फडकवीत त्यांनीं पुढें जात राहिलें पाहिजे, जगाला पुढें नेत राहिलें पाहिजे. जगाचा जोंपर्यंत बचाव नाहीं, तोंपर्यंत कोणाचाहि बचाव नाहीं. जग मुक्त नाहीं, तोंवर कोणीहि मुक्त नाहीं.

सद्‌गुण म्हणजे उत्तरोत्तर अधिकाधिक उच्चत्वाकडे जाण्याचा अव्याहत प्रयत्न. दुर्गुण म्हणजे अहंतृप्ति. ही अहंतृप्ततेची वृत्ति क्षुद्र मनाचें चिन्ह आहे. उदात्त ध्येयाची जाणीवहि नसणें याहून अधिक आपत्ति ती कोणती? जोंपर्यंत वर जावेसें वाटत आहे, तोंपर्यंत सुधारणेस वाव आहे. मग तो किती का पापी असेना. सदसद्विवेकबुद्धीची जोंपर्यंत टोंचणी आहे, तोंपर्यंत आशा आहे. ती टोंचणी थांबली म्हणजे सारें संपलें. मग जगत असलों तरी तें मरणच समजावें. तें मेल्याप्रमाणें जगणें. जितका अधिक विकास, तितकें अधिक असमाधान. ध्येयाची गाठ पडेपर्यंत कोठली शांति?

जेथें जेथें तुम्हांस अर्थपूर्ण वर्तन दिसेल, सामाजिक मूल्य दिसेल, तेथें तेथें नीति आहे असें समजा. मग त्या जीवनाचें स्वरूप कोणतें का असेना. मानवी जीवनाचा कोणताहि आविष्कार आपण नाकारूं नये. त्या विशिष्ट दिशेच्या ध्येयाची व्यवस्थित अनुभूति जोंवर नाहीं, तोंपर्यंत तरी कोणास नाकारूं नये. मानवी स्वभाव वैचित्र्यपूर्ण आहे आणि पूर्णताहि विविध रूपानेंच प्रकट होईल. पूर्णता म्हणजे मानवी जीवाची ध्येयभूत वस्तूशीं भेट. किंवा पूर्णता म्हणजे त्या ध्येयभूत वस्तूशीं मानवी जीवाचा संपूर्णपणें मेळ. ईश्वरी वैभव अनेक रूपांनीं व्यक्त होतें. पावित्र्य शतरूपांनीं प्रकट होतें. भगवद्‌गीता दहाव्या अध्यायांतील ४१ व्या श्लोकांत म्हणते, “जें जें भव्य आहे, वैभवशाली आहे, सुंदर आहे, सामर्थ्यसंपन्न आहे, तें तें मीच आहें असें मान. तें माझेंच स्वरूप. माझ्या दिव्यत्वाचेंच तें प्रकटीकरण.” प्लेटोच्या आदर्श जगांत पृथ्वीवरील प्रत्येक वस्तूचें एक आदर्श रूप आहे. पृथ्वीवरील सर्व वस्तूंचीं विवक्षित व परिपूर्ण रूपें त्या आदर्श सृष्टींत आहेत. त्या स्वर्गाच्या राज्यांत या अनंत आदर्शांसाठीं अनंत प्रासाद उभारलेले आहेत.

आपल्या वर जाण्याच्या धडपडीनें ध्येय नेहमीं हातीं येतेंच असें नाहीं. परंतु ध्येयाला हात न पोंचले म्हणून कष्टी होण्याची जरूर नाहीं. खेळ कसा खेळलों याला महत्त्व आहे. धांवा किती काढल्या ही गोष्ट महत्त्वाची नाहीं. कर्तव्य करणें हें आपलें काम. तें कोणाकडून करवून घेणें हें काम नाहीं.

असत् ही अ-करणात्मक वस्तु आहे. असत् म्हणजे कमी सत्. अमुक एक मनुष्य वाईट आहे याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच कीं त्याच्या ठिकाणीं चांगुलपणा तितकासा नाहीं. चांगुलपणानें त्याच्या जीवनांत फारशी

प्रगति केली नाहीं. सत् व असत् यांच्यांतील विरोध हा अंतिम नाहीं. जें असत् आहे तेंच सत् व्हावयाचें आहे. जो झगडा आहे तो सत् व असत् यांच्यांत नसून अधिक सत् व कमी सत् यांच्यामध्यें आहे; किंवा वाईट व अधिक वाईट यांच्यांत आहे. सत् व असत् असे भेद न करतां वरचें व खालचें, श्रेष्ठ व कनिष्ठ असे भेद करणें अधिक यथार्थ होईल. मोक्षाच्या शिडीवर सारेच चढणारे. कोणी वरच्या पायरीवर, कोणी तळच्या पायरीवर. आपलेंच घोडें नेहमीं पुढें दामटूं नये. दुसऱ्यांचाहि विचार करावा. प्रतिपक्षाला केवळ कचरा मानूं नये. त्याचेंहि म्हणणें सहानुभूतिपूर्वक समजून घ्यावें. आपल्या प्रियतम ध्येयांना विरोध सहन करणें कठिण असतें खरें. तो विरोध पुन्हां खेळीमेळीनें शांतपणें सहन करणें हें तर त्याहून कठिण. परंतु अशाच वेळीं तर आध्यात्मिक वृत्तीचा विजय असतो. येथेंच महात्मा इतरांपेक्षां उमटून पडतो व मात करतो. जग कसें असलें पाहिजे व कसें आहे, यांतील महदंतर पाहून आध्यात्मिक वृत्तीचा मनुष्य खवळून उठत नाहीं. कधीं सुधारणार हें जग, असें मनांत येऊन तो अधीर होत नाहीं, आदळआपट करीत नाहीं. तो जीवनाचा शांतपणें स्वीकार करतो, इतकेंच नाहीं, तर या जीवनाचा जे त्याग करितात, त्यांचाहि तो स्वीकार करतो. जीवनाचें हें असेंच स्वरूप असलें पाहिजे, दुसरें नाहीं असतां कामा, असें हटातटानें म्हणणारे जे उतावळे लोक, त्यांची निराशा व गडबड आध्यात्मिक वृत्तीच्या मनुष्याला ठायीं आढळणार नाहीं. सहानुभूतीचा अभाव म्हणजे अधर्म. मी जसा प्रामाणिक आहें, तसे दुसरेहि असतील, मला जितकी कळकळ व तळमळ आहे, तितकीच दुसऱ्यांनाहि आहे, असें आध्यात्मिक पुरुष मानतो. ज्यांचा देव राष्ट्रप्रिय किंवा युद्धप्रिय नाहीं, ज्यांचा देव प्रेमरूप आहे, विश्वरूप आहे, त्यांचा तर हाच धर्म ठरतो कीं, विरोधासमोर शांतपणें उभें राहणें. प्रेमस्वरूप परमेश्वराची उपासना करणारे विरोधकांजवळहि शांतीनें व सौजन्यानें वागतील. आपल्याला विरोध करणारांवरहि न रागावतां क्षमावृत्ति दाखवणें, त्यांच्याशीं सहनशीलपणानें वागणें हा त्यांचा धर्म आहे. जो जो आपल्या धर्माचा नाहीं तो नास्तिक व पाखंडी आहे असें मानण्याची एक सहजप्रवृत्ति आपणांत असते. जो आपल्याप्रमाणें ग्रहपूर्वग्रह करून घेणार नाहीं तो मूर्ख, दुष्ट व अडाणी! एकादी व्यक्ति अमुक एक मत कां धरते याचा उलगडा तेव्हां होईल, जेव्हां त्या व्यक्तीचा स्वभाव, तिच्या

भोंवतालची परिस्थिति, त्या व्यक्तीचें शिक्षण, त्या व्यक्तीच्या जीवनाची पार्श्वभूमि वगैरे आपण समजून घेऊं. दुसऱ्याचा दृष्टिकोन आपण नीट समजून घेतला तर त्याच्यावर आपण रागावणार नाहीं. त्याला त्याच्या मातविषयीं क्षमा करूं; एवढेंच नव्हे, तर त्याच्याविषयीं आपण सद्भाव धरूं, त्याची अधिक किंमत करूं, आणि अशा करण्यानें आपण त्याचें मन जिंकून घेऊन अधिक वरच्या दर्जाचा अविरोध निर्माण करूं. अधिक उच्च प्रकारचा मेळ घालूं शकूं, ऐक्य निर्मूं शकूं. हिंदूंच्या पुराणांत रावण व हिरण्यकशिपु केवळ पापमूर्ती असें मानिलें आहे. परंतु त्यांनाहि शेवटीं सद्गति मिळते. त्यांनाहि मोक्ष मिळवून घेण्याची पात्रता आहे. रावण व हिरण्यकशिपु स्वतःच्या पुरुषार्थाच्या व पराक्रमाच्या कल्पनांप्रमाणें वागतात. ते स्वतःशीं असत्यरूप होत नाहींत. जें त्यांना श्रेयस्कर असें वाटलें, त्याच्या पाठीमागें ते उत्कटपणें लागले. त्यांच्या जीवनांत तीव्रता व उत्कटता आहे. तिची दिशा निराळी होती एवढेंच. रावण वरून जरी लोखंडासारखा कठोर दिसला, सीतेचें हरण करण्यांत त्याची जरी प्रक्षुब्ध वासना दिसली, रामाला जिंकण्यासाठीं जरी तो धडपडत असला, तरी त्याच्या या सर्व हालचालींत मधुनमधून होणाऱ्या हळुवार प्रतिक्रिया, मधुनमधून स्फुरणारी क्षणिक उदात्तता दिसून आल्याशिवाय राहत नाहीं. सीतेच्या व्यक्तित्वाविषयीं त्याला अपार आदर वाटतो. तो रामाचा भयंकर शत्रु आहे, हाडवैरी आहे ही गोष्ट खरी. परंतु दुखावलेल्या मनांतूनच न शमणारा संताप जन्मत असतो. गाढ्या वैराच्या पाठीमागें तीव्र वेदना असते. मानवजातीचे कांहीं विशेष नमुने असतात. कांहीं कांहीं मोठ्या विवक्षित वृत्तींचीं माणसें असतात. त्यांचें स्वरूप समजून घेणें सोपें नसतें. आणि ज्यांचें जीवन समजून घेण्याची उत्सुकता आपण दर्शविलेली नसते, अशांजवळ आपण श्रेष्ठ आहोंत या गर्वानें फुगून कधीं वागूं नये. जीवनाची सर्जनशक्ति, अनंत रूपांनीं प्रकट होते. त्यांतील प्रत्येक रूपांत अपूर्वाई आहे. क्रियेच्या प्रत्येक प्रकारांत सत् व असत् दोन्ही आहेत. कोणतीहि गोष्ट असो; ती जशी चांगली तशी वाईटहि करतां येते.

ईश्वराच्या या जगांत केवळ दुष्ट असें कांहीं नाहीं. अमिश्र असत् या संसारांत नाहीं. म्हणून जेव्हां जेव्हां आपणांस वाइटाचा विरोध होतो तेव्हां रागावूं नये. असें रागावणें वाईट आहे. आपली वृत्ति जे जे विरोध होतील

त्यांनाहि शांतपणें सहन करून धैर्यानें पुढें जाण्याची असावी. त्या विरोधांचाहि स्वीकार करावा. प्रेमाचा आत्मा दुसऱ्याला समजून घेण्यांत आहे, दुसऱ्याविषयींहि संपूर्ण सहानुभूति दाखविण्यांत आहे. अशा निर्मळ व उदार प्रेमानें जगांतील दुष्टतेचा आपण धैर्यानें स्वीकार केला पाहिजे. असें करण्यांत आपण दया दाखवितों किंवा मोठी क्षमावृत्ति दाखवतों असें समजण्याचें बिलकुल कारण नाहीं. आपण केवळ न्याय दाखविला असें म्हणतां येईल. निरपेक्ष न्यायाची वृत्ति ही दया किंवा क्षमा यांच्याहूनहि थोर आहे. मनुष्य जसा आहे तसा पत्करून त्याच्यावर प्रेम करणें, त्याचा दुबळेपणा व त्याची शक्ति दोन्ही समजून घेणें, जग ज्याला अपराध किंवा पाप म्हणतें, तें करायला मूळचा सत्प्रवृत्तीचा असा हा मानव कां प्रवृत्त झाला तें समजून घेणें म्हणजेच खरोखर न्याय. नंदनवनांत ईव्हनें ॲडामला मोहांत पाडलें, त्याचे परिणाम पुढें अत्यंत दुःखद असे झाले; परंतु त्या ईव्हहून आपण नैतिकदृष्ट्या अधिक श्रेष्ठ आहोंत असें म्हणण्याचें धाष्टर्य आपल्यापैकीं कोणी तरी करील का? आपण जर त्या काळांत व त्या परिस्थितींत असतों, तर आपण निराळ्या तऱ्हेनें वागलों असतों असें वाटतें का? जगांतील दुष्टांतल्या दुष्टासहि स्वीकारणें, हाच एक अशक्य वाटणाऱ्या सहकार्याचा पाया होऊं शकेल. शत्रूवर विश्वास टाकणें हाच त्याच्याशीं वागण्याचा उत्तम मार्ग. जो खरोखर आध्यात्मिक वृत्तीचा पुरुष आहे त्याला ना भय, ना क्रोध. "शूरानें वस्तूचें स्वरूप नीट समजून घ्यावें; तो असें करील तर त्याला रागावण्याचें किंवा भिण्याचें कारणच उरणार नाहीं. त्यानें फक्त मग भलें करावें, आनंदांत रहावें. परंतु असें जीवन जगणें कष्टाचें आहे; ती तपश्चर्या आहे; आणि म्हणूनच असें जीवन दुर्मीळ आहे." हे शब्द एकाद्या हिंदु संन्याशानें नाहीं लिहिलेले. युरोपांतील एका थोर तत्त्वज्ञान्याचे हे शब्द आहेत. स्पिनोझा त्याचें नांव.

आणि हें पहा, उंचांतील उंच झाडालाहि आकाशाला स्पर्शतां येत नाहीं. तो एक श्लोक आहे ना :

*वाइटांतहि चांगलें असे*
*चांगल्यांतहि दुष्टता दिसे ॥*

ठेवणें कुणा नांव ना बरें
आज ना उद्यां जीव हा तरे ॥

अत्यंत चांगल्या माणसांतहि कांहीं दोष असतात. एकादा दुर्गुण असतो, एकादी उणीव असते, एकादी परंपरागत आलेली दुष्ट वृत्ति असते. एकादी चूक हातून होते. कधीं कधीं स्वतःच्या गुणांचें जोरदार समर्थन हाच दोष होतो. आणि जर विश्वाच्या शक्तीची इच्छा असली तर या अशा एकाद्या चुकीचेच घोर परिणाम होतात. आणि थोरामोठ्यांचीहि भग करुण अशी स्थिति होते. धर्मराजाला वनवास येतो. महान् प्रसंग, घोर आपत्ती ओढवतात. त्या नरवीरांची ती दशा पाहून आपण द्रवतों, हळहळतों. त्या थोरांचे दोष आपणांतहि असतात म्हणून आपणांस त्यांचेबद्दल हळुवारपणा व आपलेपणा वाटतो असें नाहीं. तर त्या महान् व्यक्तींच्या दोषांमुळें नव्हे, तर केवळ दुर्दैवामुळें त्यांच्यावर दुर्दशेचा फेरा आला, यामुळें अधिक वाईट वाटतें. ज्यांना ज्यांना जगानें पापाचे पुतळे म्हणून ठरविलें, ज्यांच्या उद्धाराची आशा नाहीं असें म्हटलें, अशांनीं कधीं कधीं इतकी उच्च साधुता जीवनांत प्रकट केली कीं, साऱ्या जगानें तोंडांत बोटें घातलीं. इतिहासांत अशीं उदाहरणें थोडीं-थोडकीं नाहींत. मोठे लोकहि पडतात व पापीहि चढतात. आणि हें लक्षांत ठेवून दुसऱ्यांना शिव्याशाप देतांना जरा सबूरी करावी, जरा सावधगिरी राखावी. पुष्कळ गुन्हेगारांची गुन्हेगारी अभिजात नसून सामाजिक परिस्थिती-चा तो परिणाम असतो. समाजांतील विषमतेला जरी वैयक्तिक रीत्या आपण प्रत्यक्ष जबाबदार नसलों, तरी आपण सारेच ती वाढवीत असतों. समाजां-तील गुंतागुंती, नाना परस्परविरोधी शक्ती यांमुळें पाप वाढतें, गुन्हे घडतात. महान् कलावान् आपणांस दाखवीत असतात कीं, पतन अपरिहार्य आहे. ऑथेल्लोसारखे आपण सारे आहोंत. आणि पुष्कळशा गोष्टी, ज्या हातून व्हायला नको असतात त्या अविचारानें होतात, हृदयशून्यतेमुळें नव्हे. विचारांत चूक होते व कांहींतरीच आपण करतों. त्याचा अर्थ हृदयांत सद्भाव नव्हता असा नाहीं. एकाद्याला बहिष्कृत करणें, एकाद्याला सर्वस्वीं टाकाऊ समजणें हें बरें नव्हे. अशानें कांहीं उपयोग होत नसतो. वरच्या स्वभावाखालीं खोल आपले नाना वासना-विकार दडलेले असतात; आपल्या

विकृती लपलेल्या असतात; आपली विचारशून्यता असते; परंतु या सर्वांवर एकच उपाय आहे. तो म्हणजे शिक्षणाचा. हळुहळूं आपण आपला सर्व स्वभाव ताब्यांत आणूं शकूं. आपल्या सर्व वृत्तींना वळण लावूं शकूं. नवीन दृष्टि येते, नवीन मूल्यें, नवीन ध्येयें दिसतात. नवीन व्यवस्था निर्मिता येते.

आज परंपरागत नीतिविरुद्ध बंड पुकारण्यांत आलें आहे. जागृत सद्-सद्विवेकबुद्धीचें हें चिन्ह आहे. कांहीं थोड्याशा व्यक्ती उभ्या राहतात व त्या नीतींत बदल घडवून आणतात. हे निर्भय पुरुष पूर्वग्रह फेकून देतात व खरें काय आहे तें बघतात. आपल्या परंपरेला जें सत्य दिसत असे, एवढेंच काय तें सत्य, याहून दुसरें सत्य नाहीं असें भासविण्याचा परंपरेकडून जो प्रयत्न केला जात असे, अशा त्या परंपरादर्शित सत्याहून अधिक व्यापक असें सत्य या सत्यार्थी वीरांना आढळतें. नीतिशास्त्रांत क्रांति घडवणारा प्रत्येक सुधारक हा प्रथम पाखंडी मानला जातो. सनातनी लोक त्याला धर्महीन मानतात. या सनातनींना कोणताहि बदल नको असतो. डोळस आचाराची त्यांना भीति वाटते. परंपरागत चालत आलेल्या नीतीच्या आरामदायी आलस्यांत पडून रहावें असें त्यांना वाटतें. चालू रूढीचा शिक्का असणें म्हणजेच नीतिमय असणें आणि त्याच्या विरुद्ध जो वागेल तो अर्थातच नीतिहीन! परंतु आजचा हा पाखंडी उद्यांच्या पिढीचा देव होतो. उद्यांच्या परंपरेचा तो आचार्य होतो. कोणताहि काळ घ्या, त्या त्या काळीं कांहीं लोक अत्यंत प्रगत अशा जीवनाच्या कल्पनेहूनहि पुढें गेलेले आढळतील; कांहीं त्या प्रगत कल्पनेच्या बरेच मागें असलेले आढळतील; आणि बहुजनसमाज त्या प्रगत कल्पनेच्या आजुबाजूस असलेला आढळेल. पुढें जाणारे ते बंडखोर असतात, मागें पड-णारे गुन्हेगार असतात, आणि बाकीचे यथातथा असतात. जगांतील सारी प्रगति त्या बंडखोरांमुळें होते. गतानुगतिक वृत्तीचे लोक कोणत्याहि विचारांचें परीक्षण करणार नाहींत. जसें आले असेल तसेंच पुढें चालविणें यांतच त्यांचें समाधान असतें. दुसऱ्यांच्या कुटाळक्या करीत ते आपला काळ दवडतात. दुसऱ्यांविषयीं वाईटसाईट गोष्टी ऐकण्यांत त्यांना मजा वाटते. जेठे मारून बसतील व साऱ्या गांवाच्या उठाठेवी करतील! दुसऱ्यांच्या ज्या गोष्टी ते ऐक-तात त्या गोष्टी कांहीं साध्या नसतात. जीवनाची कांहींतरी गुंतागुंत त्यांत असते. सामाजिक रचनेचे दुष्परिणाम त्यांतून दिसत असतात. परंतु त्या जड

जरठांना त्याचें काम होय? सद्‌गुणांचे स्वतःला पुरस्कर्ते समजणारे सनातनी जगांतील अन्याय दूर करण्यासाठीं मात्र कधीं उभे रहात नाहींत. अशा सनातनींचा काय उपयोग? केवळ यांत्रिक जीवन जगणें म्हणजे खडकाळ भूमीवर भटकणें होय! तेथें हिरवळ नाहीं, हळुवारपणा नाहीं, कोमलता नाहीं, सौंदर्य नाहीं. परंपरागत नीतिशास्त्राला चिकटून बसणें वाईट आहे असें नाहीं. परंतु त्याच्याविषयीं हट्ट धरणें मात्र वाईट. परंपरेपासून आपण कांहीं शिकूं. आपणांस मार्गदर्शन होईल, कांहीं प्रकाश मिळेल. परंपरेच्या खांद्यावर उभें राहून आपण अधिक दूरचें बघूं शकूं. परंतु परंपराच आपल्या डोक्यावर बसली तर प्रगतीच खुंटली. परंपरेचा परमेश्वर नका करूं. तसें कराल तर दृष्टि अंध होईल. आणि आंधळेपणानें वागाल तर अनीतीच्या चिखलांत रुताल. कोणतेहि नीतिनियम अविचल व अभंग मानाल तर प्रगति अशक्य होईल. जीवन म्हणजे महान् प्रस्थान; जीवन म्हणजे एक मोठें साहसाचें काम. जीवन म्हणजे अज्ञाताचा शोध, सत्याचे प्रयोग. जीवन म्हणजे ठराविक पद्धति नव्हे. चार रूढींची चाकोरी नव्हे. जीवनाचा खेळ असा आहे कीं, त्याचे सारे नियम संपूर्णपणें नीट समजणें अशक्य आहे. कोणतेहि वस्तुस्थितिनिरक्षेप असे नियम सुंदर जीवन कसें जगावें तें आपणांस सांगणार नाहींत. त्यांची मदत आपणांस होणार नाहीं. आपण प्रत्यक्ष जगूं या. विश्वाचा हेतु ध्यानांत धरून, उत्क्रान्तीचे नियम व ध्येयें लक्षांत घेऊन त्यांच्याशीं आपल्या जीवनाचा मेळ घालीत पुढें जाऊं या. अशानेंच प्रगति होईल. जीवनांत राम वाटेल. आज समाजांत अशांति कां आहे? वाढतें ज्ञान, नीतिशास्त्राचें ऐतिहासिक दृष्ट्या सम्यक् पर्यालोचन, आजच्या सामाजिक संस्था, यामुळें ही अशांति आहे. सुशिक्षित लोक म्हणतात "सदसद्विवेकबुद्धीची आज्ञा आम्ही मानतों, परंतु तिच्यावर आमचा भरंवसा तर नाहीं. कर्तव्यकर्म आम्ही पार पाडतों, परंतु त्यांत कांहीं अर्थ आहे असें वाटत तर नाहीं." नैतिक जीवनाची रूढ कल्पना ते धाब्यावर बसवितात. नवीन आरोग्यदायी सुंदर प्रघात निर्माण व्हावेत असें त्यांना वाटतें. एकादा नवीन प्रघात पडतांच सर्वसामान्य लोकांच्या मनाला धक्का बसतो. त्यांना कसेसेंच वाटतें. परंतु कसेसेंच वाटणें म्हणजे कांहीं सबळ कारण नव्हे. आपल्या पूर्वजांपेक्षां आपण जरा शिथिल बंधनाचे झालों आहोंत असें जर कोणी म्हटलें, तर

त्यांचें तें म्हणणें सत्यार्थानें घेतलेंच पाहिजे असें नाहीं. आणि त्यांच्या म्हणण्याचा बाऊ करण्याचीहि जरूर नाहीं. त्यांनीं असें म्हटलें म्हणून आपला मोठा अपमान झाला असें वाटून घेऊं नये. कितीतरी गोष्टी अशा आहेत कीं, ज्यांना हे गतानुगतिक लोक बऱ्या म्हणत, त्यांना आपण आज रद्दी समजत आहोंत. आपली रुचि बदलली आहे. आवडीनावडी बदलल्या आहेत. दृष्टि बदलली आहे. एक काळ असा होता कीं भार्या विकली जात असे व त्यांत कांहीं अब्रह्मण्यं आहे असें वाटत नसे. तो रोमन मुत्सद्दी सेनेका सौम्यमूर्ति होता. परंतु गुलामांना क्रॉसवर चढविण्याचें त्याला कांहीं विशेष वाटत नसे. आपलें गेलें महायुद्ध सीझरच्या युद्धांपेक्षां जरी कमी भीषण नसलें, तरी सीझर जितक्या सहजतेनें युद्धाचें समर्थन करी, तितक्या सहजतेनें आज युद्धाचें समर्थन कोणी करीत नाहीं. नीतीच्या क्षेत्रांतील तारे स्थिर नसतात. ते भ्रमण करीत असतात. नीतीच्या प्रांतांतील प्रकाश अंधुक असतो. परंतु एका दृष्टीनें पूर्वजांपेक्षां आपण नक्की घसरलों आहोंत. आपण एकाद्या ठरीव सांच्याप्रमाणें वागत नसलों तरी त्याचें दुःख नाहीं. दुःख आहे तें हें कीं, आपण फारच उथळ झालों आहोंत. एक प्रकारचा फाल्तूपणा सर्वत्र दिसून येत आहे. आणि धोका आहे तो येथेंच. आपल्या विचारांत, आपल्या आचारांत एक प्रकारचा थिल्लरपणा आला आहे. जीवनांत जणुं मूल्यच राहिलें नाहीं. जीवन म्हणजे एक गंमत. आजच्या जीवनाचा रोग आहे तो हा क्षुद्रपणाचा रोग. या रोगांतून मुक्त व्हायचें असेल तर एकच उपाय आहे. कोणतेंहि ध्येय निवडा, कोणताहि मार्ग घ्या; परंतु उत्कटपणें तदर्थ अहोरात्र झिजा. वीर व्हा. झुंजार व्हा. त्या त्या ध्येयासाठीं आटापिटी करणारे कर्मवीर व्हा. वीरता हवी असेल तर तपश्चर्या हवी; निग्रह, संयम, विलासविन्मुखता यांची जोड हवी. एक प्रकारची कणखर वृत्ति हवी. गुळमुळित व मुळमुळित असून भागणार नाहीं. तसेंच दुसऱ्याविषयीं सहानुभूति, उदारता, माणुसकी यांचीहि जरूर आहे. म्हणजेच जें आहे त्याचा स्वीकार करून, नवीन उभारण्यासाठीं हिंमतीनें उभें राहिलें पाहिजे.

## कौटुंबिक जीवन

मानवी जीवनाचीं विविध रूपें आहेत. शारीरिक, मानसिक, भावनात्मक, कलात्मक, नैतिक, आध्यात्मिक, कितीतरी प्रकार. हे सारे प्रकार पवित्र आहेत.

कारण दिव्यतर जीवनाकडे जाण्याचीं तीं साधनें आहेत. देहाची वा आंतरमनाची कशाचीहि उपेक्षा करूं नका. देहाला जपा, प्राणांची काळजी घ्या. आपण विशाल जीवन हें ध्येय करूं या. जीवनाच्या पैलूपैलूला पूर्णत्व देऊं या. कोणत्याहि अंगाची उपेक्षा नको. सर्वांगीण वाढ, सर्वांगीण विकास. त्या त्या बाबतींतील जी परमोच्च स्थिति ती ती प्राप्त करून घेऊं या. लैंगिक वृत्तीचाहि स्वीकार करूं या. विवाहसंस्थेच्या साहाय्यानें या आपल्या विकारात्मक वृत्तींमधूनच अधिक उच्च असें जीवन उभारूं या. कोणत्याहि इच्छेला बळी पडणें म्हणजे अव्यवस्थितपणा व गोंधळ माजविणें होय. लहरीला शरण जाण्यानें आपण जीवनाला कोणताच आकार देऊं इच्छीत नाहीं, जीवनाला महत्त्व देत नाहीं असें होईल.

दोन जीवांचें लग्न लागतें. रतिक्रिया म्हणजे एक प्रतीक आहे, चिन्ह आहे. आंतरिक ऐक्याची ती बाहेरची खूण. तें बाह्य शरीरमीलन मनोमीलनाचें दर्शक आहे. ती मनोमय सुभगता, प्रसन्नता व एकता त्या बाह्य क्रियेनें प्रतीत होते. असें असेल तरच तें खरें लग्न. प्रेमाची वेल चढण्यासाठीं समान ध्येयाची सुंदरशी कमान हवी. या ध्येयाच्या कमानीखालीं दोघांचें जीवन वाढेल. त्या ध्येयासाठीं दोघें आपलीं जीवनें अर्पितील. पति-पत्नी एकमेकांचा स्वीकार करून, परस्परांच्या विविधतेंतून एक नवीन सुंदर अशी एकता निर्माण करतात. परस्परांनीं खरोखरचें नातें निर्मिण्यासाठीं सहकार्यानें प्रयत्न केला पाहिजे. ज्या ज्या अडचणी येतील, त्यांच्या परिहारार्थ उभयतांनीं झटलें पाहिजे. दोघांनीं सहनशीलता दाखविली पाहिजे; अधीर होतां कामा नये. संयम, क्षमा, उदारता, दया या गुणांनीं संपन्न असें उभयतांनीं असलें पाहिजे. दोघांनीं सावध व दक्ष असावें. अशा रीतीनें तीं वागतील तर संसार सुंदर होईल. विवेकानें व विचारानें विकारांना जरी सौम्य करण्यांत आलें, तरी या कर्मांत संपूर्ण सिद्धि कधींच मिळत नसते. अगदीं चांगलें उदाहरण घेतलें तरीहि आपणांस असेंच म्हणावें लागेल कीं, विचाराचें डोळस जीवन जगण्याचा सतत प्रयत्न करणारा प्राणी म्हणजे मानव. मनुष्य म्हणजे 'विचारात्मक प्राणी' असें म्हणण्याऐवजीं 'वैचारिक जीवनाकडे जाण्यासाठीं धडपड करणारा प्राणी' असें म्हणणेंच अधिक युक्त होईल. विवाहाचा जो प्रकार आहे तो आनंदमयहि आहे व दुःखमयहि आहे. विवाह म्हणजे सदैव मधुचंद्र अशी भ्रामक कल्पना करून घेणारीं जोडपीं,

सुखाला जरा अडथळा येतांच हें वैवाहिक बंधन नको असें म्हणूं लागतात व काडीमोड करून घेतात. पुष्कळशा काडीमोडी पतिपत्नी परस्परांशीं एकनिष्ठ नव्हतीं, किंवा संभोगसुखांत कांहीं चुका झाल्या, म्हणून होतात असें नाहीं. परस्परांचे स्वभाव जुळत नाहींत, परस्परांच्या आवडीनिवडी निराळ्या असतात, यामुळेंच बरेचसे घटस्फोट होत असतात. लग्नसंस्था दोन जीवांच्या विकासार्थ आहे ही गोष्ट जर आपण मान्य केली, तर मग कितीहि अडचणी येवोत वा विघ्नें येवोत, त्यांतून पलीकडे जाण्यासाठीं दोन्ही जीवांनीं झटणें हेंच कर्तव्य ठरतें. प्रत्येक येणारी अडचण म्हणजे पुढें जाऊं पाहणाऱ्या त्या दोन जीवांना आव्हान असतें. त्या अडचणींना शरण जाऊन काडीमोड करून घ्यावयाचा, कीं त्या अडचणी जिंकून दोघांनीं अधिक उत्साहानें पुढें जावयाचें? परस्परगैरसमज होतांच एकमेकांचा त्याग न करतां, एकमेकांस चिकटून राहणें यांतच कृतार्थता आहे. एकमेकांच्या लहरी एकमेकांनीं सांभाळल्या पाहिजेत. कोणाला कधीं काय वाटेल, कोणाला कोणती हुक्की येईल त्याचा काय नेम सांगावा? कोणाची कोणती मनःस्थिति असेल, कशी असेल, तें नीट पाहून वागलें पाहिजे. परस्परांच्या भिन्न आवडीनिवडी असल्या, एकमेकांचे कांहीं विशिष्ट स्वभाव असले, तरी त्यामुळें कंटाळून जातां कामा नये. अशा परिस्थितींतच आपल्या चिकाटीची, सहनशीलतेची कसोटी. अशांतूनच सुंदर सहकार्य निर्मावयाचें. एकमेकांच्या आधारानें परस्परांनीं विकास करून घ्यायचा. एकमेकांनीं कांहीं पापें केलीं तरीहि एकमेकांनीं एकमेकांस सोडूं नये असें मी म्हणेन. घटस्फोट कितीहि म्हटलें तरी खालीं नेणारे. दुबळे व अविकसित जीवच घटस्फोटाचा आश्रय करतात. आरोग्य व सुख हेंच काय तें मानवी जीवनाचें साध्य असें त्यांस वाटतें. स्वतःची आंतरिक वाढ त्यांच्या डोळ्यांसमोर कधींहि नसते. ज्यांची थोडीफार आंतरिक वाढ झालेली आहे, ज्यांच्या जीवनाचा थोडाफार विकास झाला आहे, असे लोक तीव्र वेदना झाल्या, जखमा झाल्या तरी त्या दुःखाचा स्वीकार करतात. त्या दुःखानें त्यांचा आत्मा दुबळा न होतां उलट अधिक बलवान् होतो. परंतु स्वार्थीवृत्तीनें आत्मा कधींहि उन्नत होत नाहीं, शक्तिशाली होत नाहीं. पुरुषांपेक्षां स्त्रियांनींच अधिक सोशिकता व क्षमावृत्ति दाखविली आहे. पुरुषांचे अपराध व चुका त्या पोटांत घालतात. कारण त्यांच्यावर त्या प्रेम करतात. स्त्रियांमध्यें

एक प्रकारची विशेष विकसित अशी सुंदर आध्यात्मिकता असते. ती पुरुषांनींहि संपादण्याचा निश्चय केला तर बरें.

उच्चतर जीवनाकडे जाण्यासाठीं लहान मुलें मदत करतात. आईबापांना मुलांबद्दल उपजत प्रेम असतें; आणि मुलांजवळ वागतांना साहजिकच आईबाप समान भावनांचा अनुभव घेतात. नकळत उभयतांचें सहकार्य होतें; सखीभाव वाढतो. परंतु अलीकडे आईबाप मुलांकडे काडीमात्र लक्ष देत नाहींत. तीं आपल्याच सुखांत दंग असतात. मुलांबद्दलचें आपलें कर्तव्य काय, याचा विचारहि त्यांना शिवत नाहीं. आतां सरकारनेंच बालसंगोपनगृहें स्थापिलीं आहेत. परंतु हीं गृहें कधींहि लोकप्रिय होणार नाहींत. मुलांच्या नानाविध विकासांसाठीं आईबापांच्या प्रेमाची व समजूतदारपणाचीच जरुरी आहे. आईबापांची जागा कोणीहि भरून काढूं शकणार नाहीं. आईबापांचें आध्यात्मिक जीवन जितकें खोल असेल, तितकें मुलांपासून दूर व्हावें असें त्यांना कमी वाटेल. घटस्फोटांचा नीट अभ्यास केला तर असें दिसेल, कीं बहुतेक घटस्फोट मुलांबाळांविरहित दांपत्यांनीं केले. बहुतेक स्त्रियांना मूलबाळ व्हावें अशी उत्कट इच्छा असते. त्यांना तसें आंतून वाटत असतें. पुरुषांनाहि तशीच इच्छा असते. आणि जोंपर्यंत ही आंतर इच्छा मेली नाहीं, जिवाची ही भूक नष्ट झाली नाहीं, तोंपर्यंत लग्न म्हणजे आजन्म सख्य, मरेपर्यंत भागीदारी, असाच अर्थ राहील.

अर्वाचीन अशांतता आपणांस बजावते कीं, सद्गुण हे पद्यांत वाढत नाहींत. जे सद्गुण सक्तीनें, बाह्य दडपणानें आणले जातात, जे सद्गुण विचाराची निर्मिति नसून अज्ञानानें व गतानुगतिकत्वानें म्हणून येतात, ते सद्गुणच नव्हत. निराधार व अगतिक वाटल्यामुळें स्त्रिया पतिनिष्ठ रहात असतील, कुटुंबांत कशा तरी मारून मुटकून समाधानानें नांदत असतील, तर त्याला का आपण सद्गुण म्हणूं? ज्ञानपूर्वक येणारा संयम हा थोर आहे. अज्ञानानें सहजासहजीं आपण निष्पाप राहिलों तर त्यांत पुरुषार्थ नाहीं. नीति म्हणजे वैचारिक प्रक्रिया. लक्षावधि स्त्रियांना जर रतिहीन रहावें लागत असेल तर, किंवा वेश्यांचा धंदा स्वीकारावा लागत असेल तर, अर्वाचीनांनीं एकपत्नीत्वाच्या नियमाचा फिरून विचार केला पाहिजे. विवाहसंस्था अनिर्बंध होणें जसें अहितकारक आहे, तसेंच ती संस्था अपरिवर्तनशील व संकुचित

होणेंहि हानिकारक. अति सैल नको, अति ताणहि नको. स्त्रिया काय किंवा पुरुष काय, उभयतांना एकच नीति असावी. त्यासाठीं खालीं येण्याची जरूर नाहीं, उलट वरच जावें लागेल. स्त्रियांनीं पुरुषांच्या दर्जाला खालीं येण्यापेक्षां, पुरुषांनीं स्त्रियांच्या दर्जाला वर चढावें. युगानुयुगें ज्या शिक्षा स्त्रियांवर लादल्या जात होत्या, त्यांपासून आज नवीन ज्ञानामुळें स्त्रिया मुक्त झाल्या आहेत. परंतु हें नवीन ज्ञान व स्त्रियांना मिळालेलें हें नवीन स्वातंत्र्य यांची भीति वाटायला नको. जोंपर्यंत श्रद्धेनें व धैर्यानें आपण परिस्थितीला तोंड देत आहोंत, तोंपर्यंत नाव आपटण्याची भीति नाहीं. संक्रमणावस्थेंत कांहीं कांहीं व्हायला नकोत अशाहि गोष्टी घडतात, त्याला उपाय नसतो. पूर्वीच्या पिढीपेक्षां आजच्या शिकणाऱ्या मुली लैंगिक जीवनाचे बाबतींत अधिक जागृत व विकसित असतात. त्या मुलीहि म्हणतात कीं, "आम्ही कांहीं त्रेतायुगांतील नाहीं. आम्ही आजच्या आहोंत. आम्ही अशा वागणारच." त्यामुळें सनातन्यांना धक्का बसतो. शाळा-कॉलेजांतून सहशिक्षण असतें त्यामुळें असभ्य वर्तनाला थोडी चेतना मिळते.

स्त्रियांमध्यें जी अशांतता आहे, तिचें मुख्य कारण म्हणजे आज त्यांचें जीवितकार्यच त्यांना मिळत नाहीं. त्यांना चुकल्याचुकल्यासारखें वाटत आहे कवि बायरन म्हणत असे "प्रेम ही पुरुषांच्या जीवनांतील एक वस्तु आहे; तो एक कप्पा आहे, तो एक भाग आहे. परंतु प्रेम म्हणजे स्त्रियांचें सारें जीवन, सारें अस्तित्वच." सर्वसाधारणपणें आपण असें समजतों कीं, स्त्रियांची जागा म्हणजे घरांत. गृहिणी घरांतच शोभते. परंतु गृहिणीचें गृह आहे कोठें? आज घरेंच नाहींशीं होत आहेत! यंत्रांमुळें घरांतील कामधाम कमी झालें आहे. उपाहारगृहांनीं घराला उध्वस्त केलें आहे. यामुळें स्त्रियांजवळ भरपूर उत्साह व शक्ति शिल्लक उरतात. हा उत्साह कशांत ओतावयाचा? शक्ति कशांत खर्चायची? पति तर पूर्वीपेक्षां अधिकच कार्यव्यापृत झाला आहे. त्याला क्षणाची फुरसत नसते. मग पत्नीनें वेळ कसा दवडायचा? ज्यांत मन लागेल, लक्ष लागेल, असें काम नसल्यामुळें स्त्री दुःखीकष्टी होते. ती असमाधानी होते, अस्वस्थ होते. तिच्या जीवनांत अर्थ राहत नाहीं, हेतु राहत नाहीं. तिचें जीवन म्हणजे का कचरा? स्त्रियांना मग मानसिक रोग जडतात. त्यांना फेफरें वगैरे येऊं लागतें. कधीं कधीं वेडहि लागतें. अशा परिस्थितींत स्त्रियांनीं काय

करावें? जवळ पैसा असेल व वेळ असेल, तर एखादी स्त्री आपला हा रिकामा वेळ भरून काढण्याची खटपट करते. ती करते मग गंमत, करते मजा! वेडेंवांकडेंहि जरा वागते. कांहीं स्वतःच्या अतृप्त भुका ती शमवूं पाहते, कांहीं सुख भोगते. तिचें पूर्वीचें घरकाम नाहींसें झालें आणि नवीन तर आलें नाहीं. लग्न कांहीं सर्व दिवसभर काम देत नाहीं. पुरेसें काम देत नाहीं. विवाहित स्त्रियांची जर ही कहाणी, ही दुर्दशा, तर मग अविवाहित स्त्रियांची, किंवा मूलबाळ नसलेल्या विधवांची, किंवा ज्या विधवांचीं मुलें वयांत येतांच किंवा विवाहित होतांच त्यांना सोडून जातात त्यांची काय बरें मनःस्थिति होत असेल? सर्व दुःखाचें कारण एक आहे, कीं पुरेसें काम करायला नाहीं. वेळ जायला साधन नाहीं. जीवनांतील हा रिकामेपणा स्त्रियांना अनैसर्गिक व अस्वाभाविक मार्गांकडे न्यायला कारणीभूत होतो. कुटुंबांतच त्यांना काम मिळेल अशी योजना करणें, त्यांच्या स्वभावास अनुरूप व अनुकूल असा उद्योग त्यांना देणें हें कर्तव्य आहे, ही न्याय्य अशी गोष्ट आहे.

शारीरिक आनंदाचें स्तोम माजविणें चुकीचें आहे. विचाराच्या व बुद्धीच्या नियंत्रणाशिवाय केवळ भावनेच्या उद्रेकानें कर्में करणें म्हणजे पुन्हां तिर्यक्-योनीकडे जाणें होय; पुन्हां पशुत्वाकडे जाणें होय. वासनांनीं बुद्धीच्या नियंत्रणाची जागा घेऊं नये. आत्म्याचें प्रकटीकरण म्हणजे वासना-विकारांचें प्रदर्शन नव्हे. सुखासक्ति म्हणजे आत्म्याचा आविष्कार नव्हे. जीवनांत मोकळे-पणा हवा व जीं बंधनें स्वतःच्या जीवनांतून, स्वतःच्या इच्छेंतून निर्माण झालेलीं नाहींत, तीं स्वीकारणें योग्य नव्हे असें म्हणण्यांत येतें. विचारदृष्ट्या हें म्हणणें कितीहि रास्त असलें, तरी अप्रगल्भ अशा तरुणांनीं अशा रीतीनें वागणें धोक्याचें आहे. तसें त्यांना वागूं देणें हितावह होणार नाहीं. बाह्य बंधनां-तूनच आंतरिक बंधनें उत्पन्न होतात. बाह्य शिस्त पाळून मग स्वतःची आंतरिक शिस्त येते. बाह्य बंधनांची ज्यांना अतःपर जरूर नाहीं, अशांनाच तीं बंधनें झुगारण्याचा अधिकार आहे; त्यांना आज्ञा मोडण्याचें स्वातंत्र्य आहे. परंतु असें हें स्वातंत्र्य मिळविण्यापूर्वीं व्यक्तीनें स्वतःला शिस्त लावून घेतली पाहिजे. संयमी राहण्यास शिकलें पाहिजे. व्यक्तीला एक दिवस पूर्ण स्वातंत्र्य मिळावें यासाठीं आज संयमी जीवन जगायला आपण तिला मदत केली पाहिजे. जे तरुण आहेत, अद्याप पोरवयाचे आहेत, त्यांनीं स्वतःची इच्छा

प्रमाण असें म्हणून चालणार नाहीं. आपण म्हणूं तो कायदा असें त्यांनीं करणें योग्य नाहीं. कसें तरी लहरीप्रमाणें वागणें, मनांत येईल त्याप्रमाणें संगति जोडणें, संबंध जोडणें हें बरें नव्हे. लग्न म्हणजे गंमत होऊं नये; खेळ होऊं नये. लग्नासंबंधीं भ्रामक कल्पना व भ्रामक ध्येयें असणें बरोबर नाहीं. लग्न म्हणजे गंभीर पवित्र वस्तु आहे. कोणी कोणी अत्यंत अर्वाचीनलेले घटकाभर राहणाऱ्या लग्नालाहि "कायदेशीर" म्हणून संबोधतात. लग्न म्हणजे का इतकी हास्यास्पद वस्तु? कोणी कोणी प्रायोगिक तात्पुरत्या लग्नांची प्रथा सुचविली आहे. पुढें जमलें तर खरें लग्न लावावें. परंतु हीं प्रायोगिक लग्नें म्हणजे सदर परवाना असलेला व्यभिचारच म्हणायचा! अशा गोष्टींचे पुरस्कर्ते भूत-काळाकडेच लक्ष देत नाहींत असें नव्हे, तर मानवजातीच्या भवितव्याकडेहि ते दुर्लक्ष करतात. लग्न म्हणजे लैंगिक वासना तृप्त करण्याचें एक साधन या-पलीकडे अधिक अर्थ हे लोक लग्नाला देऊं इच्छीत नाहींत. लग्नांतून शेवटीं स्वतःचा विकास व्हावा, आध्यात्मिक साक्षात्कार व्हावा, उच्चतर जीवनाकडे जाण्याचें तें एक साधन व्हावें, नाना गुण अंगीं यावे, लहर थोडी कमी व्हावी, उच्छृंखलता नष्ट व्हावी अशी दृष्टीच या अर्वाचीनांजवळ नाहीं. तारुण्याच्या उन्मादांत, त्या पहिल्या नव्या नवतीच्या भरांत सारीं बंधनें झुगारून युव-युवती परस्परांस मिठ्या मारतील, मनसोक्त वागतील; परंतु ज्यावेळेस जीवनांत परिपक्वता येईल, प्रौढपणा येईल, त्या वेळेस त्यांना आढळून येईल, कीं स्वैरा-चारानें आध्यात्मिक व सामाजिक हानि तर होतेच, परंतु जें सुख त्यांना पाहिजे असतें तें सुखहि अशानें नीट मिळत नाहीं.

## आर्थिक संबंध

एकाद्या वस्तूचा दुरुपयोग केला जातो, एवढ्यावरून तिचा नीट उपयोग करून घेऊं नये असें नाहीं. अग्नीनें कोणी आगहि लावील; म्हणून का आपण स्वयंपाक करण्याचेंहि बंद करायचें? सृष्टि कधीं कधीं उग्र स्वरूप धारण करते. सृष्टीच्या अशा उग्र रूपापासून मानवजातीला वांचवायचें असेल, तर शास्त्र मदत करूं शकेल. शास्त्रांची वाढ होत आहे. उत्तरोत्तर अधिकाधिक शक्ति मानवाच्या हातीं येत आहे. नाना साधनें मिळत आहेत, उपलब्ध होत आहेत. त्या सर्वांचा नीट बुद्धिपूर्वक उपयोग करूं तर कल्याण होईल. प्राचीनकाळीं

ग्रीक लोक कांहींना गुलाम ठेवीत व मग स्वतःची सुधारणा करीत! दुसऱ्यांना राबत ठेवून स्वतः मोकळे रहात व सुख-संस्कृति भोगीत. तशी आज जरूर राहणार नाहीं. शास्त्रांच्या सदुपयोगानें मानवी शक्ति वांचेल; सुखाची व संस्कृतीची सर्वांना संधि मिळेल. गिरणींतील कापडापेक्षां हातसुताची खादी अधिक पवित्र, मोटारीपेक्षां बैलगाडी अधिक श्रेष्ठ असें धर्म सांगत नाहीं. जपायचें तें इतकेंच, कीं यंत्रांची गुलामगिरी वाढूं नये. मनुष्यांना धुरकटलेल्या शहरांत व घाणेरड्या अंधारमय तुरुंगांत यंत्रांनीं डांबू नये. हिरवीं शेतें दृष्टीस पडणार नाहींत, निळें आकाश दिसणार नाहीं, असें यंत्रांनीं करूं नये.

श्रम व फुरसत असे शब्द आपण कां वापरतों? आपल्या कामांत आपणांस आनंद वाटत नाहीं म्हणून निराळ्या फुरसतीची जरूर वाटते. आपल्या कामांत आपलें मन नसतें, म्हणून तें काम आनंददायी वाटत नाहीं. तें काम जणुं बोजा वाटतें. समाजाला आवश्यक वस्तू पुरवण्यासाठीं असें कंटाळवाणें काम आपण करतों. कामगारांना कामांतच आनंद वाटेल असें केलें पाहिजे. कारखान्याच्या सर्वसाधारण व्यवस्थेंत कामगारांनाहि आपलेपणा वाटेल असें केलें पाहिजे. हा कारखाना आपला असें त्यांना वाटेल, तरच त्या कामांत आनंद येईल. अशी आपुलकीची भावना त्यांच्यांत उत्पन्न केली पाहिजे.

मनुष्याच्या गरजा दोन प्रकारच्या असतात. कांहीं आर्थिक व भौतिक असतात. पैसा, सुख, सत्ता, प्रतिष्ठा वगैरे या प्रकारांत येतात. दुसरा प्रकार म्हणजे सामाजिक व आध्यात्मिक गरजांचा. उदाहरणार्थ सचोटी, ज्ञान, न्याय, खेळीमेळीनें वागणें, सहानुभूति, दुसऱ्याचें नीट समजून घेणें, निःपक्षपातीपणा, सेवा वगैरे. कामाकडे केवळ धंदा या दृष्टीनें बघतां कामा नये. धंदा म्हटला म्हणजे तो बाजारभावानुसार नियमित करावा लागतो. आपण आपल्या कामाकडे अशा दृष्टीनें बघावें कीं यामुळें मी समाजाच्या गरजा पुरवीत आहें. समाजसेवेचें साधन म्हणून हें माझें काम आहे. कामगारांनींहि इकडेतिकडे वारेमाप न जातां आपण एकाच जिवंत संघटनेचे घटक अशा रीतीनें बंधुभाव वाढवावा. त्यांची संघटना एकजीवी झाली पाहिजे. आज कोणी कोणाचें म्हणणें नीट समजूनच घेत नाहीं. परस्पर समजूतदारपणा वाढला पाहिजे. सामुदायिक जीवनांत व वैयक्तिक जीवनांत आपण एक व्यापक व जिवंत अशी माणुसकीची व आध्यात्मिकतेची भावना निर्माण केली पाहिजे.

काम करणाऱ्या निरनिराळ्या घटकांत एक प्रकारची सामुदायिक भावना उत्पन्न झाली पाहिजे. आपण परस्परावलंबी आहोंत ही वृत्तीहि अशा सामुदायिक भावनेंत अवश्य हवी.

पैसा म्हणजेच सर्व कांहीं नाहीं. उत्कृष्ट वस्तू पैशानें विकत घेतां येत नाहींत. मनाचें व हृदयाचें समाधान, सुख व शांति, सद्भाव व सदिच्छा या वस्तू बाजारांत मिळत नाहींत. धनाच्या राशी ओतल्या तरी लाभत नाहींत. आणि याच वस्तू सर्वांना हव्या असतात. सर्वांना यांची इच्छा असते. जीवनांत केवळ उपयुक्ततावाद नाहीं. माणसें म्हणजे का संपत्ति निर्मिणारे? माणसें म्हणजे का केवळ हमाल व मजूर? आपण आधीं मनुष्य आहोंत, मानव आहोंत. आणि म्हणूनच सौंदर्याचें प्रेम, मनाचा विकास वगैरे गोष्टी आपणांस ओढतात. जोंपर्यंत मनाचें समाधान नाहीं, मनाचें स्वातंत्र्य नाहीं, तोंपर्यंत बाह्य सोंगेंढोंगें काम कामाचीं, बाहेरचे रागरंग काय किंमतीचे? मनुष्याचें भौतिक जीवन सुधारण्यासाठीं आपण हपापलें आहोंत. आणि म्हणून आज बदलत्या संस्थांवर आपलें सारें लक्ष केंद्रित झालें आहे. अर्वाचीन जीवन यंत्रमय व गुंतागुंतीचें झालें आहे; आणि त्यांतच आपण गुरफटलों आहोंत. त्यांत कशी सुधारणा करायची? या बदलत्या काळांत कसें सुखसमाधान निर्मावयाचें? काय फेरफार हवेत? जोंपर्यंत मनुष्याच्या गरजा वाढत नाहींत, त्या गरजांचें स्वरूप बदलत नाहीं, तोंपर्यंत सामाजिक संस्थांत व यांत्रिक संघटनांत कितीहि सुधारणा केल्यात तरी उपयोग नाहीं. भौतिक व आर्थिक गरजा, सामाजिक व आध्यात्मिक गरजा जोंपर्यंत नीट भागविल्या जात नाहींत तोंपर्यंत काय? जीवनांतील रामरगाड्यापासून शास्त्र मुक्त करील. जीवनांतील ओसाडपणा, भकासपणा शास्त्रामुळें दूर होईल. शास्त्रामुळें रिकामा वेळहि मिळेल. परंतु आपल्या रिकाम्या वेळाचा सदुपयोग करण्यासहि शिकूं या. नीट शिक्षण दिलें तर हें होईल.

## राजकारण

लोकशाहीचा अर्थ काय? समाजानें आपला कारभार स्वतः हांकणें म्हणजे लोकशाही. समाजाचें स्वराज्य म्हणजे लोकशाही. सर्वांत चांगली राज्यपद्धति कोणती? जी कमींत कमी राज्य करते ती. मनुष्यस्वभाव मूळचा चांगला आहे अशी ध्येयवादी दृष्टि जे घेत नाहींत, ते शासनपद्धतीची अधिक सत्ता

असावी असें प्रतिपादितात. सक्तीनें मनुष्यस्वभाव दबला जाईल, असें मनुष्य-स्वभावाची ज्याला कांहीं प्रतिष्ठा वाटते असा मनुष्य तरी म्हणणार नाहीं. मनुष्य म्हणजे रानटी पशु असें ज्याला वाटत असेल तो मात्र म्हणेल कीं, जरब दाखविली कीं सारें ठीक होईल. कोणत्याहि राज्यशासनाचा हेतु असा असावा, कीं शेवटीं मनुष्य एक दिवस स्वयंशासित होईल.

लोकशाही म्हणजे बहुजनसमाजाची इच्छा. ती इच्छा सार्वभौम समजायची. परंतु विशिष्ट तांत्रिक गोष्टी बहुजनसमाजाच्या इच्छेला झेंपणार नाहींत. हिंदुस्थानची राज्यघटना कशी असावी, आयातनिर्यात करांतील सुधारणा, अशासारखे प्रश्न तज्ज्ञांसमोरच ठेवावे लागतात. बऱ्याचशा देशांत लोकशाही यशस्वी झाल्यासारखी दिसते, कारण ती खरी लोकशाही नाहीं म्हणून ! लोकशाही अद्याप कोठेंच नाहीं. तें अद्याप दूर असलेलें अप्राप्त असें ध्येयच आहे. परंतु एक चालचलाऊ तत्त्व म्हणून लोकशाहीचा आपण आधार घेतों. लोकशाहीतत्त्वाचा आपण स्वीकार करतों. याचा अर्थ इतकाच कीं मनुष्याच्या व्यक्तित्वाचे कांहीं जन्मजात हक्क आहेत. या हक्कांचे दुसऱ्यांशीं वागतांना कधींहि अपहरण होतां कामा नये. हे हक्क सदैव आदरिले गेले पाहिजेत. मग ते हक्क स्त्रीचे असोत वा पुरुषाचे असोत. स्त्री-पुरुष हा भेद येथें नाहीं. व्यक्ति कोणता धंदा करते, त्या गोष्टीलाहि येथें महत्त्व नाहीं. व्यक्तित्व पवित्र आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या विशिष्टत्वाचा विकास करायला वाव असला पाहिजे. जें जें उत्कृष्टत्व मिळविण्याची प्रत्येकांत पात्रता असेल, त्या त्या उत्कृष्टत्वाच्या जवळ जाणें मनुष्यास शक्य असलें पाहिजे. तें तें पूर्णत्व त्याला मिळवतां येईल असें करतां आलें पाहिजे. लोकशाहीचा असा अर्थ नव्हे, कीं तत्त्वज्ञान साहित्य, कला, शास्त्र, कायदा, राजकारण यांतील मूल्यांचा निर्णय करण्याची पात्रता सर्वांजवळ सारखी आहे. कमीअधिक सर्वांजवळ असते. कोणाचा कोणत्या बाबतींत अधिक विकास असतो, कोणाचा कमी असतो. प्रत्येकाचे प्रयत्न निराळे, गुणधर्म निराळे. आइन्स्टिनचा शोध बरोबर कीं चूक हें आपण सर्वांचीं मतें घेऊन ठरवूं शकणार नाहीं. मनुष्य म्हणजे विचार करणारा प्राणी अशी जरी व्याख्या असली, तरी सारे बुद्धीचा उपयोग करतातच, विचारपूर्वक वागतातच असें नाहीं. आणि त्यांची बुद्धि सर्वच क्षेत्रांत अकुंठितपणें चालेल असेंहि नाहीं. लोकशाहीचा असा अर्थ नाहीं, कीं आपण सर्व बाबतींत समान

आहोंत. मनुष्यांत असमानता सदैव राहणारच. कोणी लठ्ठ असतील, कोणी काटकुळे असतील; कोणी उंच असतील, कोणी बुटबैंगण असतील; कोणी मोठे असतील, कोणी छोटे असतील. भेद कधींहि नष्ट करतां येणार नाहींत. त्याचप्रमाणें कोणत्याहि सामाजिक संस्थेला वस्तुनिरपेक्ष अशी सर्वांना अगदीं समान संधि कांटेकोर तंतोतंत अशी देतां येणें शक्य नाहीं. मनुष्य कोणत्या सामाजिक स्थितींत अहे, त्या स्थितीची त्याच्यावर क्रिया-प्रतिक्रिया काय झाली आहे, होत आहे, या सर्वांवर दिलेल्या संधीचा तो कितपत उपयोग करून घेईल तें अवलंबून राहील. संधि मिळणेंहि या अशा अनेक गोष्टीं-वर अवलंबून असतें. 'परंतु सर्वांना समान संधि' हें सामाजिक ध्येय निर्दोष आहे. अज्ञानाचे व दारिद्र्याचे अडथळे आपण दूर केले पाहिजेत. थोर कला व वाङ्मय यांना मनुष्यांच्या हृदयांत खोल जाण्यास अवसर दिला पाहिजे. त्यांचीं पाळेंमुळें खोलवर जातील असें केलें पाहिजे. देशाचा सांस्कृतिक दर्जा आपण वाढविला पाहिजे. प्रत्येकाला स्वतःचें स्व-स्वरूप पाहतां येईल, स्वतःचा विकास करून घेतां येईल असें केलें पाहिजे. प्रत्येकाच्या जीवनांत भावना, विचार व कृति यांची एकता राहील असें वाता-वरण निर्मिलें पाहिजे. लोकशाही म्हणजे कांहीं सहजस्थिति नव्हे. हें ध्येय आहे; आणि हें ध्येय प्रयत्नानें व शिक्षणानें साध्य करायचें आहे. राजकीय दृष्ट्या लोकशाही आज तितकीशी यशस्वी नाहीं. याचें मुख्य कारण मतदार आपलें मत विचारपूर्वक व प्रामाणिकपणें देत नाहींत हें आहे. मतदारांची बुद्धि वाढली पाहिजे व पुढाऱ्यांचा प्रामाणिकपणा वाढला पाहिजे. असें होईल तर लोकशाही अधिक यशस्वी होईल. ध्येयभूत पूर्णतेच्या दृष्टीनें आजची लोकशाही जरी हिणकस ठरली, तरी भूतकालीन राज्यपद्धतींपेक्षां ती शतपटीनें बरी. अर्थात् कांहीं अनियंत्रित राजे असेहि झाले कीं, जे अति उदार होते. ज्यांच्या कारकीर्दींत लोकांना सुख व शांति यांचा लाभ झाला. परंतु ते अपवाद आपण सोडून देणें बरें. लोकशाहींत सार्वजनिक शांति व सुस्थिति अधिक राहते. कारण मतदारांना राज्यकारभाराला दिशा दाखवण्याची जी सत्ता असते, तीमुळें ते आपलें असमाधान प्रकट करतात. मनांतील कुरबुरी, असंतोष चर्चेच्या वेळेस प्रकट होतात. मनांतील सारें ओकलें जातें. मनांतील जमलेल्या वृत्तींना व विचारांना हा जो प्रकट होण्यास वाव मिळतो, त्यानें

सार्वजनिक आरोग्य राहायला मदत होते. समाज नीटनेटका व जरा सुखासमाधानानें राहतो.

## आंतरराष्ट्रीय संबंध

सर्व राष्ट्रांचा एक जागतिक संघ व्हावा व गुण्यागोविंदानें सर्वांनीं रहावें, असें तोंडानें केवळ म्हणून कांहींएक निष्पन्न होणार नाहीं. ओठांवर सुंदर व उदात्त शब्द खेळविल्यानें ध्येयाचा साक्षात्कार होत नसतो. अशीं मोठमोठीं ब्रीदवाक्यें उच्चारणें आजकालची पद्धतच झाली आहे! परंतु त्या शब्दांत आत्मा नसतो. सर्व जगाचें एक कुटुंब व्हावें यासाठीं जगांतील मालमत्ता सर्वांची, असें होण्यासाठीं आधीं बंधुभाव वाढवला पाहिजे. राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य वाढलें पाहिजे. आज तर सर्वत्र गैरसमज माजले आहेत. देशभक्तीच्या नांवानें सर्वत्र विनाश होत आहे. ज्या राष्ट्राचे आपणांस ज्ञान नसतें त्या राष्ट्राचा आपण द्वेष करतों. एकमेकांस नीट समजून घेऊं या. न्यूमननें एक अनुभव सांगितला आहे: त्या वेळेस इंग्लंडचें नेपोलियनशीं सारखें युद्ध सुरू होतें. लंडन शहरांतून एकदां फ्रेंच कैदी जात होते. इंग्रज लोकांची गर्दी झाली होती. ही गर्दी त्या अभागी फ्रेंचांना पाहण्यासाठीं झाली होती. फ्रेंच लोक कसे असतात, कसे दिसतात, तें सर्व साधारण इंग्रजांना कोठें माहीत होतें? आणि त्या गर्दींतील कांहीं इंग्रज अगदीं गंभीरपणें हळूंच फ्रेंच कैद्यांचे कोट पाठीमागून उचलीत व त्यांना शेपूट वगैरे आहे कीं काय तें पहात! फ्रेंच म्हणजे माकडें असें खरोखरच इंग्रजांना वाटत होतें. आज आपण आपल्या शत्रूंत शेपटें नाहीं पाहणार, परंतु दुसरें कांहीं विशेष गुणधर्म पाहूं. आपले शत्रू म्हणजे मूर्तिमंत सैतान असें आपण म्हणूं. हिंदुस्थानसंबंधीं असेंच एक पुस्तक कांहीं दिवसांपूर्वी लिहिलें गेलें. साऱ्या राष्ट्राची त्यांत नालस्ती केलेली होती. हिंदुस्थान परसत्तेखालीं आहे तें योग्यच आहे असें त्यांत म्हटलें होतें. पृथ्वीवरून तो अजिबात नष्टच व्हावा असें म्हटलें नाहीं हें भाग्य! कार्लाईल संतापानें म्हणत असे कीं, राष्ट्रें कुत्र्यांप्रमाणें एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठींच बहुधा जवळजवळ येत असतात. कुत्रीं जवळ येतात व एकमेकांच्या अवयवांचा वास घेतात. दुसऱ्याला भोगण्याचीच फक्त इच्छा! दुसऱ्याला लुटावें, दुसऱ्याचें मालक व्हावें, स्वामी व्हावें यासाठींच त्याच्या जवळ जायचें! कार्लाईलचें म्हणणें तिखट असलें तरी तें आजहि खरें आहे. लेखी करारांवर, कागदी

समजुतींवर, जगाची शांति उभारतां येणार नाहीं. आर्थिक तह व राजकीय गट करून ही शांति निर्मितां येणार नाहीं. विचाराची व ज्ञानाची देवाण-घेवाण अधिक झाली पाहिजे. एकमेकांचीं ध्येयें एकमेकांस अधिक कळलीं पाहिजेत. कल्पना, विचार, ध्येयें यांचा व्यापार वाढूं दे. या वस्तू जगभर जाऊं देत. एकमेकांची ओळख एकमेकांस होऊं दे. जगांतील सुसंस्कृत लोकांचीं मनें जवळ आलीं पाहिजेत. त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीहि जवळ आल्या पाहिजेत. जोंपर्यंत भौतिक भरभराटच फक्त डोळ्यांसमोर असते, व्यापारी वैभवावर डोळे खिळलेले असतात, तोंपर्यंत शेजाऱ्याशीं आपले भेद आहेत असेंच दिसतें. परंतु आत्म्याच्या वैभवाकडे जर वळूं व बघूं, भागीदारीनें जे आनंद कमी न होतां उलट वाढतात असे जे मानसिक आनंद, त्यांच्याकडे जर आपण दृष्टि देऊं तर सर्वत्र एकच मानवी स्वभाव नाचत आहे, एकच नाडी, एकच हृदय आहे असा साक्षात्कार होईल. हें आत्म्याचें वैभवच एक दिवस तारील. आर्थिक झगड्यांतील कटुता या आत्मदर्शनानेंच कमी होईल. जगाच्या शांतीसाठीं व सांभाळासाठीं लागणारी जी व्यापक सहानुभूति व समजूत, ती अशा वृत्तीनेंच येईल.

आपण एक आहोंत, मानवी हृदय व मन एक आहे, ही भावना ज्याप्रमाणें वाढली पाहिजे, त्याप्रमाणेंच युद्धासंबंधीं जी एक राष्ट्रीय अशी मनोवृत्ति निर्माण करण्यांत येते, तिच्यांतहि बदल झाला पाहिजे. हें राष्ट्रीय मानसशास्त्र फिरून लिहिलें पाहिजे. मानवजात आजपर्यंत लढत आली व पुढेंहि लढतच राहील असें संशयात्म्याप्रमाणें आपण मानलेंच पाहिजे असें नाहीं. राक्षसीवृत्तीचे पुरस्कर्ते, मनुष्यभक्षक लोकहि असेंच एके काळीं म्हणत असत. मनुष्यानें आजपर्यंत मनुष्याला खाल्लें आहे व पुढेंहि खाईल. गुलामांच्या व्यापाराचे पुरस्कर्ते, द्वंद्वयुद्धांचे पुरस्कर्ते, सारे आपापलीं तुणतुणीं अशींच वाजवीत. पूर्वीं असें होतें म्हणून पुढें असेंच असणार, हाच एक त्यांचा सनातन मुद्दा असे. परंतु मनुष्याचें मन हळुहळू बदलतां येतें. युद्धविन्मुखता, शांतिवाद, आंतरराष्ट्रीय भावना या गोष्टी म्हणजे कांहीं बिनतारायंत्र नव्हे. या गोष्टी म्हणजे टेलिफोन नव्हे, कीं रेडिओ नव्हे. आपलें एकदम जगांत सारें गेलें. असें झटपट रंगाऱ्याचें हें काम नाहीं. येथें धीर धरायला हवा. हें फार नाजुक रोपटें आहे. तें वाढायला बराच वेळ लागतो. क्षमा व सहनशीलता,

परस्पर समजुतदारपणा, परस्परांबद्दल आदराची भावना यांचें खत घालूं तर हें रोपटें झपाट्यानें वाढेल. 'मानवजात सारी एक' हा मंत्र बाळपणापासून कानां-वर जायला हवा. शांतता स्थापण्याची वृत्ति त्यांच्यांत रोविली पाहिजे. आम्ही जगांत खरी शांति आणूं असा संकल्प त्यांचेसमोर ठेवला पाहिजे. युद्धानें मानवजातीचे तुकडे तुकडे केले आहेत, हें स्वतः स्वतःशीं भांडण्याप्रमाणें आहे, ही गोष्ट त्यांच्या मनावर बिंबविली पाहिजे. निसर्गानें तुम्हांस एक होण्या-साठीं निर्मिलें. परंतु हीं युद्धें खोटे भेद निर्माण करून माणसामाणसांस अलग करतात. तुम्ही जर भाऊभाऊ आहांत, तर एकमेकांचा कां नाश करतां? युद्धाची वृत्ति ही मानवजातीच्या बाल्यावस्थेंत शोभली. आज ती शोभत नाहीं. परंतु या युद्धवृत्तीभोंवतीं भ्रामक भव्यता निर्माण करतात. तिच्याभोंवतीं भावनांचें तेजोवलय निर्मितात. परंतु या युद्धानें काय साधतें? थोड्यांची चंगळ होते, परंतु लक्षावधींना हायहाय करीत बसावें लागतें. प्राण ही पवित्र वस्तु आहे. कोणाचीहि हत्या होणें म्हणजे देवाचा अपराध आहे. जीवनाची पवित्रता सर्वांच्या मनावर सारखी बिंबविली पाहिजे. युद्धामुळें आपणांस हिंसेची संवय होते. ज्या द्वेषमत्सरांना संस्कृति गाडूं पाहाते, त्यांनाच युद्धें पसरवितात. मनुष्याच्या हृदयांत तीं द्वेषाचीं बीजें पेरलीं जातात. कोट्यवधि लोकांच्या मनांत परस्परद्वेषांचे गराळे पुन्हां निर्मिले जातात. अत्याचार— मग तो शारीरिक असो किंवा अन्य प्रकारचा असो—क्षुद्र वृत्तींतून जन्मत असतो. आपला जो स्वार्थमूल स्वभाव आहे त्यांतून हिंसा जन्मते. कामांतून क्रोधाचा संभव, स्वार्थांतून संहार. अशा या हिंसेंत ना तथ्य, ना महत्त्व! सर्व सामाजिक मूल्यांचा विनाश अशा स्वार्थमूल हिंसेनें होत असतो.

ज्या देशभक्तीला प्रथम, शेवटीं, नेहमीं स्वतःच्या देशाशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं, ती देशभक्ति मानवजातीच्या उच्च ध्येयाची दृष्टि आपणांस देऊंच शकत नाहीं. देशभक्तीनें आपण एक प्रकारें आंधळे होतों. जणुं डोळ्यांवर एक प्रकारची झांपड येते. निशा चढते. "शिकागो ट्रिब्युन" या नांवाचें एक अमेरिकन पत्र आहे. त्याच्यावर कोणतें ब्रीदवाक्य आहे, माहीत आहे?

> "माझा देश! दुसऱ्या राष्ट्रांशीं व्यवहार करतांना माझा देश नेहमीं बरोबर असूं दे. त्याच्या हातून चूक न होवो. परंतु शेवटीं चूक होवो कीं न होवो; माझा देश तो माझा देश!"

स्वतःच्या राष्ट्राबद्दल योग्य तो अभिमान नसावा असें नाहीं. परंतु दुसऱ्यां-बद्दल तुच्छता दाखविणें यांत धोका असतो. अभिमान असू दे, घमेंड नको. स्वतःची प्रतिष्ठा ठेवा परंतु दुसऱ्याची अप्रतिष्ठा करूं नका. आपलें तें सारेंच चांगलें, आपलें सारें बरोबर, आपल्या कृत्यांचें नेहमीं समर्थन करणें, ही भ्रामक देशभक्ति होय. नैतिक कायद्याचे डोक्यावर राष्ट्राला बसवूं नये. राष्ट्रीय सरकार हें सर्वतंत्र-स्वतंत्र असतें अशी एक विचारसरणी निघाली आहे. राष्ट्रीय सरकार कधीं चूक करूं शकतच नाहीं, त्याच्यावर टीका करतां येत नाहीं, त्यानें केलेलीं युद्धें हीं नेहमीं न्याय्यच असतात, अशी ही विचारसरणी म्हणजे शुद्ध अधर्म आहे. परंतु हा अधर्मच अर्वाचीन जगाचा धर्म झाला आहे. आणि हा धर्म आपल्या अनुयायांपासून काय काय तरी अपेक्षितो! कोणत्याहि धर्मानें असा एकजात अकारण मानवजातीचा संहार करायला लावलें नाहीं; परंतु हा आजचा राष्ट्रधर्म, तो अशा निष्कारण कत्तली आपल्या अनुयायांपासून अपेक्षितो. बोल्शेव्हिक लोक सर्व मानवजातीचा उद्धार करूं बघत आहेत. ते वंश किंवा राष्ट्र हें बघत नाहींत. रशियाकडेहि राष्ट्र या दृष्टीनें ते बघत नाहींत. रशिया म्हणजे नव श्रद्धेच्या प्रसाराचें एक साधन. अंध देशभक्तीला बोल्शे-व्हिक चाट देतात हें ठीक. त्या बाबतीपुरतें त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. लेसिंग हा जर्मन तत्त्वज्ञ म्हणाला होता, 'देशभक्ति म्हणजे दुबळेपणा आहे. या दुबळेपणांत दिव्यता असली तरी शेवटीं दुबळेपणाच तो. हा दुबळेपणा दूर केला तर बरें.' दंडुक्यापेक्षां श्रेष्ठतर असा दुसरा कायदा आहे; देशभक्तीच्या अहंकाराहून श्रेष्ठ असें दुसरें प्रेम आहे. देशप्रीति सर्व मानवजातीच्या प्रीतीशीं अविरोधानें राहूं शकेल. दोघांत विरोध येण्याची जरूर नाहीं. मानवजातीवर प्रेम करूनहि देशावर तें करतां येईल. देशावर प्रेम करूनहि मानवजातीवर प्रेम करतां येईल. राष्ट्रें म्हणजे तरी मानवजातीचेच घटक ना? प्रत्येक राष्ट्राला त्याच्या त्याच्या विशिष्ट ऐतिहासिक परंपरेंतून एक प्रकारची प्रेरणा मिळत असते. प्रत्येकाचा विकास त्या त्या परीनें होईल. परंतु म्हणून प्रत्येकानें इतरां-पासून अहंकारानें अलग राहण्याची जरूर नाहीं. माझीच प्रेरणा काय ती खरी, माझीच दिशा बरोबर असें म्हणण्यानें सारें बिघडतें. आत्मश्लाघा ज्याप्रमाणें आपण गर्ह्य मानतों, त्याप्रमाणें स्वतःच्या राष्ट्राची स्तुति करीत बसणेंहि मानलें पाहिजे. फिरस्ते आपल्या मालाची स्तुति करीत हिंडतात, त्याप्रमाणें आपल्या

संस्था, आपलीं मतें यांची स्तुति करीत बसणें बरें नव्हे. तें हीनतेचें, दुरभिरुचीचें लक्षण समजावें. वृथा गौरव, आत्मश्लाघा, दुसऱ्यांस तुच्छ लेखणें म्हणजे राष्ट्रधर्म नव्हे.

जागतिक ऐक्याचे दोन मार्ग आहेत. जागतिक सत्ता किंवा जागतिक राष्ट्रसंघ. एकाचीच सत्ता सर्व जगावर होणें हें अशक्य आहे. कारण राष्ट्रवाद हा नेहमीं आडवा येणार. तसें करूं पाहणें म्हणजे रक्तमांसाच्या चिखलांतून सदैव जाणें. अशा मारणमरणाच्या लढायांत मानवजातच कदाचित् नष्ट व्हायची, जगाचाच अंत व्हायचा. एकाद्या मानववंशाची सर्वश्रेष्ठता सिद्ध व्हावी म्हणून इतर जगाचा कां बरें नाश व्हावा ? आजकालचीं युद्धेंहि महाग होत आहेत; भीषण होत आहेत. कोणत्याहि एका साम्राज्यांत इतर सर्व जग पादाक्रांत करण्याची शक्ति नाहीं. आणि ईश्वरानें का मानवजात एका ठशाची निर्मिली आहे ? नाना जातीजमातींचीं, नाना वंशांचीं, नाना राष्ट्रें त्यानें निर्मिलीं आहेत. जागतिक ऐक्याचा दुसरा एक सुकर मार्ग आहे. आपण आपल्या राष्ट्रवादास थोडी मुरड घालून उच्चतर अशा एकीकरणाचा, आंतरराष्ट्रीय सहकार्याचा प्रयत्न करूं शकूं. आशिया युरोपचें यशस्वी अनुकरण करूं लागला, आपली आर्थिक पिळवणूक बंद करूं लागला, दुसऱ्यांची सत्ता रोखूं लागला तर युरोपच्या स्थितीला धोका आहे, असें म्हणणें म्हणजे मोठें चमत्कारिक व विचित्र तर्कशास्त्र आहे. आमचा देशाभिमान दैवी, इतरांचा मात्र आसुरी ! आजचें चाललेलें आर्थिक शोषण, त्याला जर कोणत्या देशानें विरोध केला तर संकट आलें, असें आम्ही ओरडूं लागतों ! कांहीं राष्ट्रांना गुलाम ठेवून जगांत शांति नांदवूं पहाल तर तें शक्य नाहीं. सर्वांचें स्वातंत्र्य यांतच जगाचें रक्षण आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य होण्यासाठीं प्रत्येक राष्ट्र आधीं स्वतंत्र होणें आवश्यक आहे. त्याशिवाय सारें फोल आहे. प्रत्येक राष्ट्राच्या विशिष्टत्वाला मान दिला पाहिजे. प्रत्येकाची अपूर्वता मान्य केली पाहिजे. सर्व राष्ट्रांना आम्ही स्वातंत्र्य देऊं अशा प्रकारचें ध्येय व अशा प्रकारचा प्रयत्न सर्व जगाचा असला पाहिजे. जगांतील कांहीं भाग इतरांपेक्षां मागासलेले असतील. परंतु त्यांचा दुबळेपणा म्हणजे आमची संधि असें नाहीं होतां कामा. एकाद्या मनुष्यानें दुबळ्या शेजाऱ्याला दरडावणें, किंवा त्याच्या दुबळेपणाचा फायदा घेणें हें जितकें वाईट, तसेंच एकाद्या प्रबळ राष्ट्रानें दुसऱ्या दुबळ्या राष्ट्राला

घशांत घालूं पाहणें वाईट. सर्व प्रामाणिक माणसें असेंच म्हणतील. व्यक्तींप्रमाणें राष्ट्रांनाहि सहानुभूतीची जरुरी असते. परंपरागत चालत आलेल्या पूर्वग्रहां-पासून, रूढींपासून, बौद्धिक गुलामगिरीपासून मुक्त होण्यासाठीं जीं राष्ट्रें धड-पडत आहेत, त्यांना सहानुभूति दाखविणें, त्यांना त्यांच्या त्या कर्मांत मदत करणें हें सुधारलेल्या राष्ट्रांचें कर्तव्य आहे. त्या धडपडणाऱ्या राष्ट्रांवर उडी घालून त्यांचे धनी होऊं नका; किंवा त्यांना आपल्या पंखाखालीं घेऊं नका. पौर्वात्यांची जागृति म्हणजे युरोपला संकट नव्हे. चीन धडपडत आहे, तेथें उलथापालथ होत आहे. हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हें थोड्या कालावधीचा प्रश्न आहे. तुर्कस्थान, इराण, अफगाणिस्थान झपाट्यानें अर्वाचीन व अद्ययावत् होत आहेत. हें तर सारें जगाच्या बऱ्यासाठींच आहे. दुसऱ्यांचा विचार न करतां कोणाहि राष्ट्रास जगतां येणार नाहीं. राष्ट्रांचें परस्परावलंबन प्रत्यहीं वाढत आहे. आणि जेथें जेथें अन्याय व जुलूम असेल त्यांच्याशीं झगडावयास मानवजातीच्या ध्येयावरील अढळ श्रद्धेच्या जोरावर आपण उभें राहिलें पाहिजे. पेटूं दे ती मानवजातीच्या श्रद्धेवरील मंगल ज्योत सर्वांच्या हृदयांत, व होऊं दे सारें दास्य-दारिद्र्य खाक.

केवळ थोर ध्येयें ठेवून भागत नाहीं. त्या ध्येयांना प्रत्यक्ष सृष्टींत आणण्या-साठीं साधनें हवींत. कांहींतरी एकादें नवीन चालचलाऊ तंत्र निर्मायला हवें. बहुजनसमाजाला शिक्षण देण्यासाठीं म्हणून राष्ट्रसंघ किंवा केलॉग करार अशा गोष्टी उपयोगाच्या असतात. परंतु राष्ट्रसंघाविषयीं खोल गेलेला असा संशय सर्वांच्या मनांत आहे. जगांत आज जी स्थिति आहे ती कायम ठेवण्या-साठीं निर्माण केलेलें एक साधन म्हणजे हा राष्ट्रसंघ. दोस्त राष्ट्रांच्या हातांतील राष्ट्रसंघ म्हणजे एक बाहुलें. सर्व राष्ट्रांना संरक्षण व स्वातंत्र्य देण्या-साठीं हा संघ अवतरला आहे असें कोणाला फारसें वाटत नाहीं. आणि केलॉग कराराचें महत्त्वहि नष्ट झाल्यासारखेंच आहे. कारण ज्यानें या कराराला जन्म दिला, तो म्हणाला "स्वसंरक्षणार्थ शेवटीं युद्धाशिवाय गत्यन्तर आहे कीं नाहीं हें ठरविण्यास तें तें राष्ट्रच अंतीं अधिक समर्थ असणार." जगांत केवळ न्याय्य असें युद्ध कधीं असूंच शकत नाहीं. राष्ट्राराष्ट्रांतील प्रश्न सोड-विण्याचें साधन म्हणून अतःपर युद्ध स्वीकारूं नये. युद्धाचा मार्ग सोडूनच द्यावा. युद्ध हा खरा उपाय नव्हे. स्वसंरक्षणार्थ म्हणूनहि अंगीकारलेल्या युद्धाचें समर्थन आपण करूं नये. स्वसंरक्षण म्हटलें म्हणजे कोठून धोका येणें शक्य

आहे तेंहि आलें, तो धोका टाळण्यासाठीं अमुक एक प्रदेश जिंकून घेणें हेंहि आलें, आणि मग स्वसंरक्षणाच्या नांवाखालीं दुसऱ्यावरची ही स्वारीहि समर्थनीय ठरायची! जेथें सारेंच अंधुक आहे, तेथें प्रकाश व अंधार यांत फरक कोठें काढणार? आणि हिंसेवर प्रतिहिंसा ठेवलेलीच. त्यामुळें सत्याला विजयी होण्यास वेळच नसतो. जोंपर्यंत राष्ट्रें स्वतःच्याभोंवतींच फिरत राहणार तोंपर्यंत सदैव विग्रह राहणार, युद्धें राहणार. प्रत्येकाला नवीन बाजारपेठा हव्यात. त्या धुंडतांना एकमेकांच्या गांठी पडायच्या व शेवटीं युद्धाची ठिणगी पडायची. परंतु कलागती विवेकानें शांतवूं या. शक्तीनें प्रश्न सोडवूं पाहणें माणसास शोभत नाहीं. सर्वांना बंधनकारक असें जागतिक कायदेशास्त्र निर्मूं या. सर्व जगाचें असें एक सर्वश्रेष्ठ न्यायमंदिर स्थापूं या. तेथील निकालांना सर्व मानतील असें करूं या. त्या निकालांची अंमलबजावणी करण्यासाठीं पोलीस नेमूं या. परंतु जोंपर्यंत मोठीं राष्ट्रें थोडेंहि सोडावयास तयार नाहींत, आपल्या साम्राज्यसत्तेला जराहि धक्का लावूं द्यावयास तयार नाहींत, तोंपर्यंत आशा नाहीं. जोंपर्यंत साम्राज्य-सरकारें आपापलीं साम्राज्यें तरवारीनें सांभाळण्यासाठीं सदैव उभीं आहेत, तोंपर्यंत हे राष्ट्रसंघ, हे केलॉग करार म्हणजे थट्टा आहे. केवळ वंचना आहे.

जगांत शांतता स्थापण्यासाठीं एकच साधन आहे. तें म्हणजे धर्ममय ध्येयवाद. हेंच खरें राजकीय साधन. या साधनांतच आशा आहे. हें आमचें कर्तव्य, हे आमचे हक्क ही भाषा जोंपर्यंत आहे, तें पर्यंत परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालतां येणार नाहीं. तह व मुत्सद्दयांचीं परस्पर समझौता करणारीं कारस्थानें, यांनीं क्षणभर प्रक्षोभ शांत होईल. परंतु पुन्हां भडका उडेल उसळलेल्या व पेटलेल्या भावना तहांनीं तात्पुरत्या शमतात, परंतु कायमच्या विझत नसतात. मानवजातीविषयीं प्रेम सर्वांच्या हृदयांत भरेल तरच आधार आहे. तें प्रेम जगांत भरूं दे. असे धर्मात्मे, महात्मे आज हवे आहेत, कीं जे सर्व जगाच्या सुधारणेची वाट न पाहतां "पृथ्वीवर एक कुटुंब, वसुधैव कुटुम्बकम्" हें तत्त्व जरूर पडली तर स्वतःच्या आत्मसमर्पणानें सिद्ध करतील; असे महात्मे व वीर पाहिजे आहेत, कीं जे म्हणतील: "आम्हांला फळाची आशा नाहीं, प्रयत्न करणें हें आमचें काम; कोणी सुधारतील कीं नाहीं या आशेनें आम्ही कर्मप्रवृत्त होत नसतों. आम्हांला राहवत नाहीं म्हणून आम्ही उद्योग आरंभितों."

REFBK-0006364